मूल्य ३० रु. / पृष्ठे १०४ / जून २०१९ / वर्ष १२ वे / अंक ७

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## अनुक्रमणिका


**4**
सुरुवातीचे– राजाच भ्रष्टाचारी निघतो तेव्हा...
– जयंत पाटील

**5**
प्रबंध संपादकीय– सत्य जनतेत जाऊन सांगा
– दिलीप वळसे पाटील

**6**
संपादकीय– घंटानाद, घोटाळ्यांचा, फसवणुकीचा.... – डॉ. सुधीर भोंगळे

**10**
राष्ट्रवादी काँग्रेस २० वा वर्धापनदिन, भाषणे
पक्ष विस्तारासाठी मतभेद विसरून एकदिलाने काम करा...
- शरद पवार –१०
राष्ट्रवादीची सत्ता आणण्यासाठी अथक प्रयत्न करूयात
– जयंत पाटील– १८
राज्यात आघाडीची सत्ता आणायची आहे
– अजित पवार– २४
लोकसभेच्या पराभवाचा बदला घ्यायचा आहे
– धनंजय मुंडे – २७
लाटेपेक्षा विकासाच्या वाटेवर निवडून येऊ
– सचिन अहिर – ३०
राष्ट्रवादीचे धर्मनिरपेक्ष विचार घराघरांत पोहोचवा..
– चित्रा वाघ – ३२
फुले, शाहू, आंबेडकर विचाराने लढाई जिंकायची
– नवाब मलिक – ३४
पवारसाहेबांना ऐंशी आमदारांची भेट देऊ...
– माजिद मेमन – ३६
भाजपला अडवा आणि शिवसेनेची जिरवा
– प्रकाश गजभिये – ३८







**42**
देशापुढची आव्हाने कोणती आणि चर्चा कशाची? –आकाश

**48**
चव्हाटा
– घंटाकर्ण





**56**
राष्ट्रवादीची लोकसभा अधिवेशनातील कामगिरी
- अमोल कोल्हे – ५६
- सुप्रिया सुळे – ६२
- सुनील तटकरे – ६३





**64**
लोकशाही संस्था आणि कायद्यांची विधळवाट...
– तथागत

**70**
राजकारणात कुणीच कायम शत्रु किंवा मित्र नसतात
– अवलोकितेश्वर





**76**
धुगधुगीला आलेली मराठी भाषा
– हेमंत टकले





**84**
राष्ट्रवादी काँग्रेसची विधीमंडळ अधिवेशनातील कामगिरी, भाषणे
- अजित पवार – ८४
- जयंत पाटील – ९०

**102**
शेवटचे पान–
महिला धोरणाची पंचविशी...
– हेमन्त टकले





संचालक
हेमन्त टकले

प्रबंध संपादक
दिलीप वळसे पाटील

संपादक
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय पत्रव्यवहार
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ०३८
०२२–३०२३५५३०/५५/५६

कला निर्देशन
धनंजय सस्तकर

सजावट व मांडणी
दिलीप रोडे

छायाचित्रे
प्रशांत चव्हाण

वर्गणीचे दर–
वार्षिक रु. ५००/–

वर्गणीचा धनादेश
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

मुद्रक, प्रकाशक
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने
मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३,
सेक्टर–३,आरएससी–२८, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट,
मुंबई–४०००२० येथून
अंक प्रकाशित केले.

संपादक–
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

# राजाच भ्रष्टाचारी निघतो तेव्हा...

केंद्र आणि राज्यातील भाजपा-सेना युती सरकारचे सुरुवातीपासूनच खायचे आणि दाखवायचे दात वेगवेगळे आहेत हे आता तरी भोळ्याभाबड्या व सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या लक्षात यायला हवे. 'सबका साथ सबका विकास', 'न खाऊँगा न खाने दूँगा', 'देश भ्रष्टाचारमुक्त करणार, काळा पैसा संपुष्टात आणणार, समांतर चालणारी अर्थव्यवस्था मोडून काढणार' किती म्हणून घोषणा मोदींनी केल्या. त्यांच्याच पाऊलांवर पाऊल टाकून फडणवीसही निघाले. मोदी-फडणवीस जोडगोळीने घोषणा व खोट्या आश्वासनांचा प्रचंड पाऊस पाडून जनतेच्या डोळ्यात मोठी धूळफेक चालविलेली आहे. जनता आशेवरच्या झोपाळ्यावर झुलते आहे. 'खोटं बोल पण रेटून बोल' हा या दोघांचा आणि भाजप नेत्यांचा पहिल्यापासून एककलमी कार्यक्रम आहे. इतिहासापासून अर्थशास्त्रापर्यंत आणि धर्मकारणापासून सर्जिकल स्ट्राईकपर्यंत सगळ्या विषयांवर खोटं बोलण्याची जणूकाही भाजप-शिवसेनेमध्ये स्पर्धाच लागली आहे. शिवसेनेचे सर्वेसर्वा असलेले उद्धव ठाकरेही यात मागे नाहीत. भाजपच्या नेत्यांना रोज शिव्या घालायचे नाटक करायचे आणि भेटल्यानंतर एकाच ताटात जेऊन एकमेकांना गोड घास भरवायचे व सरकारमधून जेवढे फुकटात पदरात पाडून घेता येईल तेवढे जमा करायचे हा धंदा सध्या उद्धवजींनी चालविलेला आहे. शेतकऱ्याची संपूर्ण कर्जमाफी, विमा या व यांसारख्या अनेक विषयांवर उद्धवजींनी मागील चार-पाच वर्षांत जी काही मुक्ताफळे उधळली त्यांचे अवलोकन केले आणि भाजप नेत्यांनी सेनेला दिलेल्या उपमा पहिल्या तर दोन्ही पक्षांची युती टिकूच शकणार नाही असे सर्वसामान्य जनतेला वाटण्याची दाट शक्यता आहे. पण इथेच खरी जनतेची फसवणूक आहे. दोघे मिळून राज्य लुटताहेत. प्रचंड भ्रष्टाचार चालू आहे. मंत्र्यांच्या एजंटांचा सुळसुळाट झालेला आहे. पंकूताईच्या चिक्की घोटाळ्यापासून महसूल मंत्री चंद्रकांत दादांच्या देवस्थान जमीन बेकायदा हस्तांतरीत करण्याबाबतची शेकडो भ्रष्टाचाराची प्रकरणे आम्ही विरोधी पक्षांनी शोधून काढून सभागृहाच्या वेशीवर टांगली. जाहीरपणाने त्याबद्दल आरोप केले. कागदोपत्री पुरावे दिले. मंत्र्यांच्या या भ्रष्टाचारामुळे राज्याचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. लाखो कोटी रुपये या मंत्र्यांनी पक्षफंडाच्या नावाखाली गोळा करुन खिशात घातले, स्वतःची घरे भरली. निवडणुकीत पैशाचा पाऊस पाडला. उमेदवार आणि मतदारही काही ठिकाणी विकत घेतले. जळगाव, धुळे नगरपालिकेच्या निवडणुकीत तर पोलिसांच्या उपस्थितीत वे देखरेखीखाली पैशाचे वाटप झाल्याचे आपण सर्वांनी पाहिले व ऐकले आहे. निवडणुकीत हजारो कोटी रुपये वाटायला हा पैसा भाजपकडे आला कोठून? मोदी-फडणवीस जोडीचा या भ्रष्टाचाराला आतून प्रचंड पाठिंबा आहे. त्यामुळे मंत्री फुकट काम करीनासे झाले आहेत. समोर येणाऱ्या प्रत्येक फायलीतून कोणती, किती व कशा प्रकारची फळे मिळतील याचाच शोध ते सातत्याने व अव्याहतपणे घेत आहेत. जून 2019 या महिन्यात मंत्रीमंडळाची फेररचना झाल्यानंतर नव्याने खातेवाटप जाहीर झाले. काही मंत्र्यांनी लगेच दुसऱ्या दिवसापासून निवडणुकीसाठी किती दिवस शिल्लक राहिले आणि आचारसंहिता लागायला किती दिवस बाकी आहेत हे त्वरेने मोजून शासकीय यंत्रणेला खाऊ लवकर गोळा करुन आम्हांला आणून द्या असे सांगून तसा तगादा स्वीय सहाय्यक, ओएसडी, पीए यांच्यामार्फत सुरु केला आहे. आता जुलै आणि ऑगस्ट हे दोन महिने मंत्र्यांना चरण्यासाठी मुक्त ठेवण्यात आले आहेत जेवढे हाणता येईल तेवढे हाणा अशा सूचना वरिष्ठांनीच दिल्यामुळे भाजप-सेनेचे मंत्री, आमदार मोकाट सुटले आहेत. मुख्यमंत्र्यांनी तर सर्वांना क्लिन चीट देण्याचेच धोरण स्वीकारलेले असल्यामुळे आपल्या सर्व काळ्या कृत्यांना व भ्रष्टाचाराला फडणवीसांचा पाठिंबा आहे हे त्यांना कळून चुकले आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांची, चंद्रकात पाटील यांची भ्रष्टाचाराची व राज्य सरकारचा हजारो कोटी रुपयांचा महसुली उत्पन्न बुडविणारी कितीतरी प्रकरणे कागदोपत्री पुराव्यांसह आम्ही बाहेर काढली. ती सभागृहापुढे ठेवली. पण निष्पन्न काय झाले? भ्रष्टाचाराबद्दल जो न्याय आणि निकष एकनाथ खडसे, प्रकाश मेहता, दिलीप कांबळे, विष्णू सावरा या मंत्र्यांना लावला तो उर्वरीत मंत्र्यांना व चंद्रकांतदादा पाटील यांना का लावला नाही, असा प्रश्न आता केवळ आम्हालाच नाही तर भाजप-सेनेच्या इतर आमदारांनाही पडलेला आहे. शिवसेनेत तर मंत्रीपदे कशी दिली जातात हे तान्हाजी सावंत यांनाच विचारा असे दस्तुरखुद्द शिवसेनेचे आमदार म्हणू लागले आहेत. थोडक्यात अळीमिळी गुपचिळी असे देवेंद्र -उद्धव जोडीचे सूत्र आहे. राज्याची पार वाट लावून ठेवली आहे. पाच लाख कोटींचे कर्ज राज्यावर झाले आहे. तरीदेखील खोटे आकडे दाखवून खोटा अर्थसंकल्प सादर करण्यापर्यंत या सरकारची मजल गेली आहे. आणखीन खोटेपणाचा कळस कुठवर जाणार आहे हे पुढील दोन महिन्यात पाहायला मिळेल. आमची सर्व कार्यकर्ते व वाचक जनता यांना एवढीच विनंती आहे की या खोटारड्या सरकारच्या भ्रष्ट कारभारावर आपण योग्य वेळ येताच जोरदार फटक्याचा आसूड ओढा आणि या सरकारला येत्या विधानसभा निवडणुकीत सत्तेवरुन खाली खेचा. हे मोठे पुण्याचे काम ठरेल व राज्याची विस्कटलेली घडी पूर्णपणे उध्वस्त होण्याचे वाचेल ! देवांचा राजा इंद्र. त्याचेच दुसरे नाव देवेंद्र. हा राजाच भ्रष्टाचाराला पाठिंबा देणारा, त्याचा पुरस्कार करणारा निघाला तर जनतेने राजाकडून कसली व कोणती अपेक्षा ठेवायची?

## सुरुवातीचे



# सत्य जनतेत जाऊन सांगा

येत्या ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणुकांना आपल्याला सामोरे जायचे आहे. सप्टेंबर महिन्यात निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर आचारसंहितेचा अंमल सुरु होईल. प्रचाराला प्रारंभ होईल. म्हणजे प्रचार सुरु होण्यास आता फक्त दोन महिन्यांचा अवधी उरला आहे. हे साठ दिवस कसे झटकन् निघून जातील हे कळणारदेखील नाही. म्हणून कार्यकर्त्यांनी वेळीच सावध होऊन प्रचाराची रणनीती आखली पाहिजे व घरोघरी मतदारांपर्यंत जाऊन पोहोचले पाहिजे. 1999 ते 2014 या 15 वर्षांच्या काळात आपल्या आघाडी सरकारने काय कामे केली, कोणते निर्णय घेतले त्याचा समाजाला कसा फायदा झाला हे लोकांना समजून सांगितले पाहिजे. त्याच वेळी 2014 पासून भाजप-शिवसेनेचे युती सरकार सत्तेवर आहे. या सरकारने सत्तेवर येण्यापूर्वी कोणकोणती आश्वासने दिली होती आणि सत्तेवर आल्यानंतर कोणती आश्वासने दिली व ती कशी पूर्ण केली नाहीत हेही लोकांना समजावून सांगितले पाहिजे. थोडक्यात, युती सरकार अत्यंत खोटारडे आहे, फसवे आहे, प्रचंड भ्रष्टाचारी आहे, घोटाळेबाज आहे, आपल्या काडीच्याही कामाचे नाही, शेतकरी, कामगार, मजूर यांच्या विरोधी आहे आणि मूठभर धनिक, भांडवलदार व उद्योगपतींचे घर भरणारे व हित करणारे आहे हे लोकांना आपल्याला अनेक उदाहरणांनी पटवून देता येईल. नोटाबंदी, जीएसटी यांसारखे अत्यंत चुकीचे निर्णय करुन देशातला प्रत्येक माणूस या सरकारने संकटाच्या खाईत लोटला आहे. देशोधडीला लावला आहे. त्यांच्या या निर्णयांमुळे महागाईचा आगडोंब ऊसळला असून जे पेट्रोल 35-40 रु. लिटरने व जे डिझेल 30-35 रुपये लिटरने मिळायला पाहिजे होते ते 70-80 रुपये दराने म्हणजे दुप्पट भावाने लोकांना खरेदी करावे लागते आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पेट्रोल-डिझेलचे भाव प्रचंड उतरलेले असतानाही, सरकारने दरवर्षी तीन लाख कोटी रुपये जनतेच्या खिशातून जास्तीचे काढून भाव जाणीवपूर्वक कमी होऊ दिले नाहीत. त्यामुळे सर्वच मालाच्या किंमती वाढून महागाईची झळ जनतेला पोहोचली आहे. नोटाबंदीने तर शेतकरी पूर्ण उध्वस्त झाला. त्याच्या मालाला कोणी गिऱ्हाईक भेटेना. त्यामुळे अनेकांना हा नाशवंत माल एकतर शेतात तसाच सोडून द्यावा लागला किंवा काढून उकिरड्यावर, शेताच्या बाजूला फेकून द्यावा लागला. काही जणांनी तो मातीमोल किंमतीने विकला. शेतकरी प्रचंड कर्जबाजारी झाला. तेव्हांपासून बाजारात जी मंदीची लाट आली आहे ती अजून गेलेली नाही. कारण शेतकऱ्यांकडे माल खरेदीसाठी पैसाच नाही. सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या या युती सरकारच्या काळात झाल्या आहेत. आपण अनेकदा सरकारकडे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी. त्यांचा सातबारा पूर्णपणे कोरा करावा अशा प्रकारची मागणी केली. त्यासाठी परिवर्तन संघर्षयात्रा काढली. विधान भवनात धरणे धरुन सभागृहाचे कामकाज बंद पडले. 19 आमदारांना तर सरकारने या कर्जमाफीच्या प्रश्नावरुन निलंबित केले. मग आम्ही संपूर्ण कामकाजावर बहिष्कार घातला. परंतु सरकार इतके निर्दयी आणि मुर्दाड त्यांनी काही शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी दिली नाही. दीड लाखापर्यंतची कर्जमाफी देऊ म्हणाले पण ती ही देताना त्यांचा हात थरथरला. सरसकट कर्जमाफी दिली नाही. 35 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देऊ असे सुरुवातीला म्हणाले होते. प्रत्यक्षात 18294 कोटी रुपयांची कर्जमाफी दिली. 50 लाख खातेदार शेतकरी वाऱ्यावर सोडून दिले. कर्जमाफीसाठी अनेक जाचक अटी घातल्या. शेवटी शेतकरी वैतागून गेला आणि कर्जमाफीचा नाद त्याने सोडून दिला.

मागील पाच वर्षांत सरकार जनतेशी उभा दावा असल्यासारखे म्हणजे वैऱ्यासारखे वागले. आपल्याकडून जे जे काढून घेणे शक्य होते ते कराच्या रूपाने काढून घेतले. आपल्याला सरकारमधून मात्र काहीच न देता फक्त आश्वासनांची व खोट्या घोषणांची म्हणजे गाजराची पुंगी दिली. सरकारचे हे जनतेशी वागणे अत्यंत बेजबाबदार व बेमुर्वतखोरपणाचे होते. जनतेच्या प्रश्नांबाबत काडीचीही सहानुभूती नसणाऱ्या या सरकारची पाच वर्षातली सगळी कृत्ये सत्यपणाने तुम्ही जशी घडली तशी जनतेसमोर मांडा. त्यांनाही सरकारचे चटके आणि फटके अंगावर बसलेलेच आहेत. तुम्ही फक्त घरोघरी जाऊन त्यांना या फटक्यांची आठवण करुन द्या. हे फटके सरकार सत्तेवरुन खाली खेचायला निश्चित मदत करतील. या कामात कार्यकर्त्यांनी कुठेही कमी पडू नये. आपापसातले मतभेद, गटबाजी विसरुन एकदिलाने व विश्वासाने खांद्याला खांदा लावून काम करावे, एवढीच विनंती.

## प्रबंध संपादकीय



# घंटानाद घोटाळ्यांचा, फसवणुकीचा

महाराष्ट्रात भाजप-सेना युतीचे सरकार 2014 मध्ये सत्तेवर आले. पाच वर्षांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार सत्तेवर आहे. ऑक्टोबर 2019 मध्ये पुन्हा विधानसभेच्या निवडणुका होतील. या निवडणुका आता अगदी जवळ येऊन ठेपल्या आहेत. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात निवडणुकांच्या तारखा घोषित होऊन आचारसंहिता लागू होईल असा अंदाज सर्वत्र व्यक्त होत आहे. याच वेळी भाजपच्या काही अती उत्साही मंडळींकडून (म्हणजे जे दाबून पैसे खातात, प्रचंड भ्रष्टाचार करतात आणि हेच पैसे निवडणुकीत वाटून निवडणूक जिंकण्याची कला आम्हालाच अवगत आहे असा दावा करतात) 220 ते 230 जागा युती जिंकणार अशा प्रकारची भाकिते व वल्गना केल्या जात आहेत. त्यामुळे सत्तेवर येण्यासाठी भाजपवाले ईव्हीएम मशिन मॅनेज करतात हा जो जनतेच्या मनात काहीसा संशय आहे तो वाढीला लागतो आहे. तो वृद्धींगत होण्यास हातभार लागतो आहे. विरोधकांना मशीन मॅनेज करुन हरविण्यापेक्षा फडणवीस सरकारने आपल्या पाच वर्षाच्या कामाचा लेखाजोखा जनतेसमोर प्रामाणिकपणे सादर करुन केलेल्या कामाची शाब्बासकी, पोचपावती म्हणून मतदान मागितले तर त्यात गैर काहीच नाही. ते लोकशाहीला धरुन आहे. त्यांचा तो हक्कही आहे. पण तसे न करता काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस मधून माणसे फोडून आपल्याकडे घ्यायची, त्यासाठी त्यांना पैसा, पदे, सत्ता यांची लालूच दाखवायची; भ्रष्टाचाऱ्यांना व गैरव्यवहार करणाऱ्या संस्थानिकांना अभय द्यायचे, त्यांनी आमच्या पक्षात यावे अन्यथा जेलमध्ये घालू, संस्थेवर प्रशासक नेमू अशी धमकी देऊन चौकश्यांचा ससेमिरा मागे लावायचा व त्यांना आपल्या कळपात ओढायचे यामुळे पक्ष फार बलवान व मोठा होतो असा जर राज्यकर्त्यांचा विचार व तदनुषंगिक कृती असेल तर या देशाला व राज्याला फार उज्वल भवितव्य आहे असे म्हणण्याचे धाडस कुणी करु शकेल असे वाटत नाही. ही खरी लोकशाही देखील नाही. हा लोकशाहीचा तमाशा आहे. वरुन किर्तन आणि आतमध्ये गणगौळण असाच काहीसा हा प्रकार आहे. त्यामुळे सध्या भाजपाचे काँग्रेसीकरण चालू आहे.

**लुटारू संस्थाचालकांना अभय**

निवडणुका जिंकण्यासाठी म्हणून भाजप-सेना सरकारने ज्या साखर सम्राट, दूधसंघवाले, वाळूमाफिया, टँकर लॉबीवाले, बँका लुटणारे, शिक्षणसम्राट सरकारी योजनांमध्ये प्रचंड घोटाळे करुन स्वतःचे खिसे भरणारे व सरकारी तिजोरीवर डल्ला मारणाऱ्यांनी कोट्यावधी सर्वसामान्य माणसांना फसवून, लुटून त्यांच्या अन्नात माती कालविण्याचे काम केले आहे. अशा नेत्यांना सरकार अभय व संरक्षण देणार असेल तर या आयाराम-गयारामांना जनतेने कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता व खोट्या प्रचाराला भीक न घालता या दलबदलूंना घरीच बसविण्याची काळजी यावेळी घेतली पाहिजे. शेतकऱ्यांनी कारखान्याला ऊस घातला. एफआरपी सोडा, पेमेंटच नाही, कष्टाने घाम गाळून पैसा बँकेत ठेव म्हणून ठेवला. बँकांच्या संचालक व पदाधिकाऱ्यांनी खोटीनाटी नावे टाकून पैसा काढून घेतला आणि आता गरजेच्या वेळी (उदा. मुलामुलींचे लग्न, घरखरेदी, आजारपण, ऑपरेशन, परदेशी शिक्षण वगैरे) ठेवीदाराला स्वतःचे पैसे देखील मिळत नाहीत. काय त्या ठेवीदारांचा जीव जळत असेल? यात काही तर वृद्ध, निराधार, पेन्शनर आहेत. त्यांचे कोण वाली आहे? मतांवर प्रभाव टाकणाऱ्या या लुटारू संस्थाचालकांनी सर्वसामान्य गोरगरीब कष्टकरी जनतेची जी प्रचंड लूट व सत्यानास केला त्याची भरपाई कोण करुन देणार? आदर्श तत्वे आणि मूल्ये यांचा डांगोरा पिटणाऱ्या तत्त्ववादी भाजपनेदेखील सगळा सत्यवादी व्यवहार सोडून देऊन डोक्याचे मुंडासे कमरेला गुंडाळले असेच समजायचे का?" गावावरुन ओवाळून टाकलेली पोरं म्हणजे शिवसेना," असे मा. केशवराव धोंडगे एकदा विधानसभेत म्हणाले होते. शिवसेनेचा आजपर्यंतचा सगळा प्रवास आणि व्यवहार पाहिला तर ठाकरे कुटुंबाचे घर भरणारी आणि त्यासाठी मरमर करणारी निष्ठावंत कार्यकर्त्यांची टोळी असेच तिचे स्वरुप राहिले आहे. प्रबोधनकार ठाकरे यांचे विचार, वारसा यांची जपणूक करुन तो समाजात रुजविण्याचे काम शिवसेना व ठाकरे कुटुंबियांनी कधीही केले नाही. त्यामुळे शिवसेनेकडून फार मोठ्या तत्त्व व मूल्याधिष्ठित राजकारणाची कुणी आजपर्यंत तरी अपेक्षा केली नाही आणि पुढेही करतील असे वाटत नाही. पण त्या भरकटलेल्या दिशाहीन नौकेत तत्त्वनिष्ठ मूल्यांचा व बांधिलकीचा आव आणणाऱ्या भाजपने सत्ताप्राप्तीसाठी लोचटपणे व लाचारी पत्करून जाऊन बसावे हे न उलगडणारे कोडे आहे. सत्तेसाठी भाजप इतकी हपापलेली असेल तर त्यांनी खुलेपणाने तसे सांगावे. पण 'मी नाही बाई त्यातली कडी लावा आतली' या

## संपादकीय



म्हणीप्रमाणे वागू नये. खोटं बोलून जनतेची दिशाभूल करु नये.

**खोटं बोल पण रेटून बोल**

मुख्यमंत्री ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वारसा सांगतात आणि जो संघ स्वामी विवेकानंद यांना दैवताप्रमाणे मानतो ते विवेकानंद म्हणाले होते, "मला गरीबांमध्ये परमेश्वर पाहता आला पाहिजे. माझ्या मोक्षप्राप्तीकरिता मी त्यांच्याकडे जाऊन त्यांची पूजा केली पाहिजे. गरीब आणि दुःखी लोक हे मुक्तीकरता आहेत. रुग्ण, कुष्ठपिडित आणि पतित यांच्या रुपाने आपल्याला ईश्वराची सेवा करण्याची संधी आली आहे. अधिकाराने या गोष्टी होत नसतात. अंकुराला वाढविण्यासाठी माती, हवा, पाणी लागते तसे समाज संपन्न करण्यासाठी सेवा, ज्ञान, भक्ती, अभ्यास लागतो. यातून विश्वात ज्ञानाचा प्रकाश पसरवता येतो. लक्षात ठेवा, तुम्हाला कर्म करण्याचा अधिकार आहे. त्याच्या फळावर तुमचा अधिकार नाही. तुम्हा अशा रितीने कर्म करा की, जेणेकरुन तुम्हाला त्याचे फळ भोगावे लागणार नाही. पण याचबरोबर तुम्ही कर्मत्यागही करु नका" (तरुणांना आवाहन. स्वामी विवेकानंद, आ. 8 पृष्ठ 96). स्वामी विवेकानंदांच्या आत्मज्ञानाच्या अभ्यासाचा महत्त्वाचा भाग म्हणजे, माणसाने आपले अंतरंग शांत, स्वच्छ, शुद्ध व अलिप्त ठेवावे. राज्यकर्ता तर असाच असला पहिजे. त्याने कृतीशील अंगांनी स्वतःला वाचावे. विश्वात कार्य घडविण्याची ईच्छा करावी. कार्यशक्ती उच्च पातळीवर न्यावी. त्यातून गोरगरीब, रंजले-गांजलेले, अडले-नडलेले, पिळवणूक झालेले यांची सेवा करुन त्यांच्याशी एकरूप व्हावे. म्हणजे आत्मभानाची समर्थ जाणीव निर्माण होते. माणूस आणि समाज घटक या नात्याने विशिष्ट कर्तव्य करण्यासाठी बांधलेला असतो. कर्तव्य त्याला सतत आठवण देते.

मुख्यमंत्री स्वामी विवेकानंदाचा हा उपदेश सोयीस्करपणे विसरले. त्यांनी गोरगरीब, रंजले-गांजलेले म्हणून विजयसिंह मोहिते पाटील, रणजितसिंह मोहिते पाटील, अनिल भोसले, संजय काकडे, रणजितसिंह निंबाळकर, बबनराव पाचपुते, राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. विजयकुमार गावीत, पृथ्वीराज देशमुख, राम कदम या व यांसारख्या अनेक गुणवंत गरिबांना व ज्ञात-अज्ञातांना मदत करण्याचे कर्तव्य केले. त्यातून गोरगरीबांच्या पदरी काय पडले? त्यांना न्याय आपण दिला का? आणि राज्याचा प्रमुख म्हणून निःपक्षपातीपणे वागून आपण सर्वसामान्यांच्या कितपत उपयोगी पडलो याचा त्यांनी अंतर्मुख होऊन विचार करावा. मनाची स्पंदने नीट जाणून घ्यावीत. मनातून येणारे विचार अनुभवावर स्वच्छ घासून पाहिले तर मंत्र्यांचा राजा 'देवेंद्र' याला हे लक्षांत येईल की आपण न्यायाने वागलो नाही. चोरांची पाठराखण केली. खरं तर कृतीशील मनातून महान सत्ये ही सरळ आणि सोपी निघतात. कारण ती सर्वत्र लागू पडतात. सत्य नेहमी सरळ आणि सुबोध असते. माणूस अज्ञानामुळे त्याची गुंतागुंत करतो. त्याचे स्वतःच्या सोयीप्रमाणे अर्थ लावतो. वास्तविक मनाने आणि वागण्याने सशक्त असणे हे निरोगीपणाचे लक्षण असते. तरच चांगल्या वाईटाचा निवाडा योग्य मनाने करता येतो. मगच बुद्धी आत्मनिष्ठ जाणवते. मन बुद्धीच्या आधीन असणे हे साधनेचे मर्म आहे. ते 'राजा' विसरलेला दिसतो. कठोपनिषदात आत्मज्ञान घेण्याला सद्‌बुद्धी हवी असे म्हटले आहे. बुद्धी सर्वांनाच असते. परंतु सद्‌बुद्धी मोजक्यांना असते. अभ्यासाचा उपयोग अंतरंग शुद्ध करण्याबरोबरच निःपक्षपाती व सद्‌सद्‌विवेकीरीतीने निर्णय करण्याकरिता व्हावा. ही सद्‌बुद्धी कठिण असते. हे राजांच्या वागण्यावरुन आपल्या लक्षांत आले असेल.

पाच वर्षे ते सतत खोटे बोलत राहिले. एकाही आश्वासनाची पूर्ण पूर्तता केली नाही. शेतकऱ्याचा सातबारा कोरा करु. त्याला संपूर्ण कर्जमाफी देऊ. त्याचे उत्पन्न 2022 पर्यंत दुपटीने वाढवू. किती म्हणून घोषणा व आश्वासने दिली. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या पाऊलांवर पाऊले टाकून देवेंद्रजी जनतेला पाच वर्षे फसवित आले. 'खोटं बोल पण रेटून बोल' हा भाजप नेत्यांचा गुण त्यांनीही अंगी चांगलाच मुरवून घेतला. त्यामुळे काही नेत्यांनी फडणवीसांचे नामकरण 'फसवणीस' असे केले. पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाला आरक्षण देतो असे म्हणाले होते. गेल्या पाच वर्षात शेकडो कॅबिनेट झाल्या. धनगर समाजाच्या तोंडाला मुख्यमंत्र्यांनी पाने पुसली. हातात धतुरा दिला. आणि म्हणाले, अर्थसंकल्पात एक हजार कोटीची तरतूद धनगर समाजासाठी केली आहे. त्यातून गावोगावी समाजमंदीरे, हॉल बांधा. घोंगड्या अंथरा, कपाळी भंडारा लावा आणि निवांत झोपा. धनगर समाज मागतोय काय आणि आपण देतोय काय याचे जरा सुद्धा भान मुख्यमंत्री आणि सरकारला कसे राहिले नाही. धनगर समाजही मुस्लिमांप्रमाणेच शिक्षण आणि नोकऱ्यात मागासलेला आहे. यासाठी त्यांना आरक्षण हवे आहे. ते द्यायचे सोडून हजार कोटी दिलेत. म्हणजे रोग रेड्याला आणि औषध पखालीला अशीच सरकारची कृती आहे. ती अनवधानाने किंवा कळत-नकळत झालेली नाही. ती जाणीवपूर्वक हेतुतः करण्यात आली आहे हे न करण्याइतका धनगर समाजही आता अज्ञानी व मागास राहिलेला नाही. निवडणुकीतील मतांकरिता भाजपने आपल्याला कसे वापरुन घेतले व गोड बोलून कसे फसविले हे धनगर समाजाच्या जाणकार नेत्यांच्या नजरेत आल्यावाचून राहिले नाही. म्हणूनच ते एकजुटीने मुख्यमंत्र्यांकडे गेले आणि "आम्हाला हजार कोटी नकोत. आम्हांला आमच्या हक्काचे आरक्षण हवे आहे" असे त्यांनी खडसावून सांगितले. मुस्लिमांना आरक्षण द्यायला तर युती सरकारचा सुरुवातीपासूनच

विरोध आहे. मुस्लिम द्वेष हाच भाजप-सेनेच्या राजकारणाचा पाया आहे. धर्माच्या आधारावर आरक्षण देता येत नाही असे सांगून मुस्लिम समाजाला जाणीवपूर्वक विकासापासून वंचित केले जात आहे. आघाडी सरकारने मुस्लिमांना दिलेले पाच टक्के आरक्षणही सरकारने रद्द केले. निदान शिक्षण आणि रोजगारात तरी त्यांना हे आरक्षण द्यायला हवे. हा समाज आपल्याच देशात व राज्यात राहणार आहे. त्याची सुधारणा केली नाही तर देश व राज्य विकासात पुढे जाऊ शकणार नाही. सतत विचित्र परिस्थिती उद्‌भवत राहिल आणि ती दुरुस्त करण्यातच आपला वेळ व पैसा खर्च पडेल. तेव्हा या समाजालाही विकासाच्या प्रवाहात कसे नेता येईल याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. जात, धर्म याच्या पलिकडे जाऊन हे काम करावे लागेल. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघ आणि भाजपने केलेल्या संघर्ष व त्यागापेक्षा मुस्लिम समाजाने केलेला संघर्ष व त्याग कितीतरी मोठा आहे हे इतिहासाचे अवलोकन केल्यानंतर निश्चितपणे समजू शकेल.

**जलयुक्त शिवार-अशास्त्रीय योजना**

सत्तेवर येण्यापूर्वी महाराष्ट्र टँकरमुक्त करु, दुष्काळ कायमचा नाहिसा करु. प्रत्येक गावाला नळ योजनेद्वारे पिण्याचे पाणी पुरवू. सिंचनात वाढ करु. बाईच्या डोक्यावरची हंडा उतरवू किती म्हणून घोषणा केल्या होत्या. प्रत्यक्षात काय झाले? जलयुक्त शिवार ही योजना हे या पाणी टंचाई प्रश्नावरचे उत्तर आहे असे गृहीत धरुन मुख्यमंत्र्यांनी दिसली जमीन की खोद खड्डा या न्यायाने सगळ्या जमिनींवर मोठमोठे खड्डे खोदून ठेवले. या खड्ड्यात पावसाचे पाणी साचेल. ते भूगर्भात मुरेल आणि त्यातून विहिरी व बोअरवेल्स यांचे पुनःर्भरण होईल. त्यात पाणी येईल असा आशावाद सरकारने बाळगला. गेल्या पाच वर्षात 18 हजार गावांमध्ये सुमारे आठ ते नऊ हजार कोटी रुपये खर्च करुन या योजनेची मोठ्या कौतुकाने वाजतगाजत अंमलबजावणी केली. पक्षाच्या कार्यकर्त्यांना फॉकलंड, जेसीबी, ढंपर यांसारखी मोठमोठी मशिनरी लावून खड्डे खोदण्याचे व नदी-नाले, ओढे यांचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याचे कंत्राट दिले. कार्यकर्त्यांना जगविण्यासाठी योजनेचा वापर करण्यात आला. हजारो कोटींचा भ्रष्टाचार योजनेत झाला. 1300 योजनांमध्ये गैरव्यवहार झाला असून आणखीन योजनांची तपासणी चालू आहे असे जलसंधारण मंत्री तान्हाजी सावंत यांनी नुकतेच विधानपरिषदेत एका चर्चेला उत्तर देताना कबूल केले आहे. आमदार हेमंत टकले आणि धनंजय मुंडे यांनी हा भ्रष्टाचाराचा विषय सभागृहात लावून धरल्यानंतर सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांनी आता थेट या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. भ्रष्टाचारापेक्षा देखील अधिक महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे या खोदलेल्या जमिनींचे कायमचे नुकसान होणार आहे. वरचा मातीचा थर काढून टाकल्यामुळे तो पावसाच्या पाण्याने वाहून जाणार आहे. ही माती धरणे, बंधारे, तलाव यात जाऊन साठल्याने त्यांची साठवण क्षमता कमी होणार आहे. चार-पाच वर्षानंतर पुन्हा हे खड्डे गाळाने भरुन पूर्वपदाला येणार आहेत. सगळे तज्ज्ञ आणि भूजल यंत्रणेतले लोक मुख्यमंत्र्यांसह सरकारला सांगत होते की जलयुक्त शिवार योजनेने महाराष्ट्राचा पाणीप्रश्न सुटणार नाही. टँकर बंद होणार नाही. पण मुख्यमंत्री ऐकायलाच तयार नाही. आपलं लाडकं बाळ म्हणून त्यांनी योजनेचे जे कोडकौतुक केले, थोडे स्पष्ट शब्दांत सांगू का फाजिल लाड केले त्यामुळे महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे आणि ते कधीही भरुन येणारे नाही.

जलयुक्त शिवारला आवडत्या बाळाची आणि जलसंपदा विभागाच्या मोठ्या व मध्यम प्रकल्पांना नावडत्या बाळाची वागणूक गेली पाच वर्षे सातत्याने दिली गेली. पहिली तीन-चार वर्षे तर प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यताच दिली नाही. त्यामुळे सर्व प्रकल्पांची कामे बंद पडली. सरकारनेच जलसंपदा विभागाच्या कामांना कुलूप घातले. अधिकारी हातावर हात ठेवून फुकटचा पगार खात बसले. चौकशीचा ससेमिरा नको आणि घोटाळ्यात अडकलो म्हणून तुरुंगवासही नको अशी भूमिका घेऊन अधिकाऱ्यांनी मंत्र्यांचे एजंट म्हणून काम करण्यास नकार दिला. गेल्या पाच वर्षात सिंचनाचा कार्यक्रम किती वेगाने पुढे गेला हे सांगण्याचे धाडसही सरकारला आज होत नाही. त्यामुळे मागील काही वर्षात अर्थसंकल्पात व आर्थिक पाहणी अहवालातही राज्याचे सिंचन नेमके किती झाले याचा आकडा सरकार प्रसिद्ध करीत नाही. वास्तविक पंढरपूरला वारकरी खांद्यावर भगवी पताका घेऊन जसा जातो तसा सरकारने सिंचनाचा कार्यक्रम खांद्यावर वाहून न्यायला हवा होता. पण सिंचन घोटाळ्याच्या नावाखाली सगळे सिंचनवाढीचे कार्यक्रम बंद पाडून राज्य व शेतकरी प्रगतीपासून सरकारने वंचित केला आहे.

**महाराष्ट्राचे पाणी गुजरातला**

तेलंगणासारखे नव्याने निर्माण झालेले राज्य सिंचनात किती वेगाने प्रगती करते आहे हे आपण तर पाहतोच. पण हे पाहायला स्वतः मुख्यमंत्री फडणवीस गेले होते. 300 ते 400 मिटर उंचीच्या उपसा जलसिंचन योजना करुन तेलंगणा आपल्या पाण्यावर प्रचंड वेगाने प्रगती करतो आहे. आपले मुख्यमंत्री मात्र नार-पार आणि दमणगंगा पिंजाळचे पाणी गुजरातला देण्यातच धन्यता मानून महाराष्ट्राचे कायमचे नुकसान करीत आहेत. वास्तविक दमणगंगा खोऱ्यातून प्रवाही पद्धतीने सव्वा टीएमसी तर उपसा पद्धतीने सुमारे 32.95 टीएमसी पाणी गोदावरी व गिरणेत स्थलांतरित करता येईल असे चितळे आयोगाने 1999 साली अहवालात नमूद करुन ठेवले आहे. 1958 साली एम.एस.तिरुमला अय्यंगार

समितीने तापी नदीच्या पाण्याचे जसे वाटप करुन दिले तसे पाणीवाटप नारपार व दमणगंगा पिंजाळचे अद्याप झालेले नाही. आज हे सगळे पाणी गुजरातला जाते आहे. मुख्यमंत्री महोदयांनी अगोदर या पाण्याचे वाटप करुन घ्यावे. क्षेत्राच्या प्रमाणात पाणीवाटप केल्यास गुजरात राज्याचा पार तापी नर्मदा शृंखलेतला वाटा 130 टीएमसी आहे. त्यात क्षेत्राच्या प्रमाणापेक्षा 106 टीएमसी जास्त पाणी यापूर्वी दिलेले आहे. त्यामुळे आता गुजरात राज्यास तापी खोऱ्यातील उकई धरणस्थळी उपलब्ध होणाऱ्या जास्तीच्या 105 टीएमसी पाण्यातून काहीही पाणी देण्याची आवश्यकता नाही. या 105 टीएमसी पाण्यातून मध्यप्रदेशासाठी 5.26 टीएमसी पाणी आरक्षित करुन उर्वरित शंभर टीएमसी इतके पाणी महाराष्ट्राच्या वाट्याला येऊ शकेल असे चितळे आयोगानेच लिहून ठेवलेले आहे. तेलंगणातील उपसा योजनांच्या उद्घाटनाला जाणाऱ्या आमच्या लोकप्रिय मुख्यमंत्र्यांना अशा योजना महाराष्ट्रात तातडीने कराव्यात व ज्या योजना अनेक वर्षांपासून निधीअभावी रखडल्या आहेत त्या पूर्ण कराव्यात असे का वाटत नाही?

**मंत्र्यांचे घोटाळे – भ्रष्टाचाराचे थैमान**

मागील पाच वर्षात फडणवीस सरकारच्या काळात त्यांच्याच संमतीने मंत्र्यांनी प्रचंड भ्रष्टाचार केला. त्यांच्याच संमतीने म्हणतो याचे कारण असे की विरोधी पक्षाने हा सर्व भ्रष्टाचार उघडकीला आणून कागदोपत्री पुरावे सादर केले. सभागृहात भ्रष्ट मंत्र्यांच्या चौकशीची व राजीनाम्याची मागणी केली. त्यासाठी आमदारांनी विधानभवनाच्या दारात धरणेही धरले. परंतु मुख्यमंत्र्यांनी श्री. एकनाथ खडसे वगळता सर्व मंत्र्यांचा भ्रष्टाचार खपवून घेतला, पोटात घातला इतकेच नव्हे तर त्या सर्व मंत्र्यांना क्लीन चिट देऊन त्यांच्या काळ्या कृत्यांवर समर्थनाची भरजरी पैठणी घातली. पंकजा मुंडे यांच्या चिक्की घोटाळ्यापासून ही सुरुवात झाली. 206 कोटी रुपयांच्या या घोटाळ्याची निव्वळ घोषणा झाली यालाही आता 4 वर्षे होऊन गेली. अद्याप कारवाईचा अहवाल देखील आला नाही. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्यावर 191 कोटी रुपयांचा अग्निशमन यंत्र खरेदी आणि 114 कोटी रुपयांचा राष्ट्रपुरुषांच्या तसबिरी व अर्लिरिडर बुक खरेदी भ्रष्टाचाराचा आरोप झाला. अग्निशमन यंत्र खरेदी व्यवहाराची चौकशी करण्याची घोषणा झाली पण फाईल आणि चौकशीचा अहवालच गायब झाला. तुरडाळ भरडाई घोटाळ्यात पणन मंत्री सुभाष देशमुख यांच्यावर दोन हजार कोटी रु. भ्रष्टाचाराचा आरोप झाला. चौकशीची घोषणा होऊन अहवालही आला पण कारवाई झाली नाही. याच देशमुखांकडे नोटबंदीच्या काळात 92 लाख रुपयांच्या बेहिशोबी नोटा सापडल्या. नाही कारवाई झाली. यापेक्षाही आणखीन गंभीर प्रकार म्हणजे सोलापूर महापालिकेचे आरक्षण असलेला 81 गुंठ्याचा भूखंड विकत घेऊन त्यातल्या 20 गुंठे भूखंडावर श्री. देशमुख यांनी स्वतःचा बेकायदेशीर बंगला बांधला. आरक्षण उठविलेले नव्हते. तत्कालिन महापालिका आयुक्त श्री. अविनाश ढाकणे यांनी हा बंगला पाडावा अन्यथा मंत्र्यांनी साडे आठ कोटी रु. भरावेत किंवा 810 चौ. मी. जागा महापालिकेला वर्ग करावी आणि 12 मिटर रस्त्याकरिता लागणारी जागाही द्यावी असा आदेश दिला होता. आदेशाला मुख्यमंत्र्यांनी केराची टोपली दाखवून ढाकणे यांची आयुक्त पदावरुन उचलबांगडी करुन त्यांना जळगावचे जिल्हाधिकारी करुन टाकले. श्री. दिपक सावंत यांचा औषध खरेदीतला 217 कोटींचा घोटाळा विधानमंडळात प्रचंड गाजला. उद्योगमंत्री सुभाष देसाई यांचा एमआयडीसी मधील 50 हजार एकरहून अधिक जमिनी डी-नोटीफिकेशन करण्याचा घोटाळा असाच दाबला गेला. नुसती चौकशीची घोषणा झाली. लाळ्या खुरकत लस खरेदीतला 70 कोटींचा घोटाळा मंत्री महादेव जानकर यांनी तर डाळ खरेदीतला 2500 कोटींचा घोटाळा मंत्री गिरीश बापट यांनी मुख्यमंत्र्यांच्या आशीर्वादाने सहजपणे पचविला. महसूलमंत्री चंद्रकात पाटील यांनी तर भूखंडांचे इतके गैर व्यवहार केले आहेत त्याची कागदपत्रे गोळा केली तर ती ट्रकभर होतील. आमदार जयंत पाटील यांनी चंद्रकांतदादांची भ्रष्टाचाराची जवळपास 8-10 प्रकरणे शेवटच्या अधिवेशनात सभागृहात कागदपत्रांच्या पुराव्यानिशी मांडली. चंद्रकांत पाटील यांच्यावर आरोप होताना मुख्यमंत्री सभागृहात हजरच नव्हते. त्यातून अनेकांना संशय आला की या प्रकरणांमागे मुख्यमंत्रीच आहेत की का? ते असो, नाही तर नसो. आजपर्यंत जी अनेक प्रकरणे उघडकीस येऊनही मुख्यमंत्र्यांनी काहीही कारवाई केली नाही ते आता शेवटच्या क्षणी काही कारवाई करतील अशी अपेक्षा बाळगणेच चूक आहे. उघड कारवाई करुन सत्याला सामोरे जाण्याची हिंमत मुख्यमंत्र्यांमध्ये नाही. त्यामुळे त्यांनी याही घोटाळे व भ्रष्टाचारावर मऊ मुलायम रेशमी शाल पांघरली तर त्याबद्दल नवल वाटायला नको! 2 जुलैला शेवटच्या अधिवेशनाचा समारोप होत असताना जनतेची सेवा करण्यासाठी पुन्हा मुख्यमंत्री म्हणून येईन अशा प्रकारची भाषा फडणवीस यांनी केली. त्यांनी तशी आशा व्यक्त करायला हरकत नाही. लोकशाहीत तो त्यांचा अधिकार आहे. पण त्यासाठी जनतेचे पाठबळ हवे आणि तुमचा कारभारही स्वच्छ, पारदर्शक, लोकाभिमुख व भ्रष्टाचारमुक्त हवा. तसा तो आहे का? या प्रश्नाचे उत्तर इतरांनी कुणी देण्यापेक्षा तुम्ही तुमच्या मनाला व आतल्या आवाजाला विचारा. ते उत्तर होकारार्थी असेल तर आणखीन पुढची शंभर वर्षे तुम्हीच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहा. यासाठी आम्ही तुम्हांला शुभेच्छा देतो!

# पक्ष विस्तारासाठी मतभेद विसरून एकदिलाने काम करा



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विसावा वर्धापनदिन 10 जून रोजी मुंबईत साजरा झाला. दुष्काळामुळे महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, माणसे, जनावरे यांना पिण्याचे पाणी कोठून द्यावयाचे असा प्रश्न सरकारपुढेही उभा राहिला आहे. या पाण्याच्या प्रश्नाकडे राज्य शासनाने जेवढ्या गांभीर्याने पाहणे आवश्यक होते व वेळीच उपाययोजना करणे गरजेचे होते, ते न केल्यामुळे राज्यातील जनतेचे या पाण्याच्या प्रश्नावरून प्रचंड हाल झाले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने विसाव्या वर्धापनदिनानिमित्त महाराष्ट्रातील पाणी प्रश्नाबाबत जनतेमध्ये जागृती करण्याचा निर्णय घेतला. त्यानिमित्ताने पक्षाच्या वतीने राज्यातील सर्व महत्त्वाच्या शहरांमध्ये व जिल्ह्यांमध्ये पाणी प्रश्नासंबंधी चर्चासत्रे, व्याख्याने, परिसंवाद, जलदिंडी, भित्तीपत्रके, निबंध व वक्तृत्व स्पर्धा असे विविध उपक्रम राबविण्यात आले. पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त मुख्य कार्यक्रम मुंबईतील राष्ट्रवादी भवन व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये झाला. याप्रसंगी शरद पवार यांनी केलेले मार्गदर्शन...



आजचा दिवस आपण 20 वर्षे पूर्ण करून एकविसाव्या वर्षात पदार्पण करण्याचा आहे. या दिवशी आपण 20 वर्षांपूर्वी षण्मुखानंद सभागृहामध्ये जमलेलो होतो. त्या सभेचे अध्यक्षस्थान सन्मानीय छगन भुजबळ यांनी घेतलेले होते. त्या बैठकीमध्ये आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना, घटना या संबंधिचा निर्णय घेतला आणि जी सर्वसाधारण सभा म्हणून जी असते, ती आपण जाहीर सभा शिवाजी पार्कमध्ये घेतली. आणि अक्षरशः तीन ते साडेतीन लाख कार्यकर्ते महाराष्ट्रातून आणि महाराष्ट्राच्या बाहेरून आले. षण्मुखानंदमध्ये घेतलेल्या निर्णयांना त्यांनी मान्यता दिली. पक्ष म्हणून आपण दुसऱ्या दिवसापासून काम करायला सुरवात केली. 20 वर्षे होऊन गेली. स्थित्यंतरे बरीच झाली. राज्यमध्ये आपण सत्तेत आलो. त्याचवेळी आपण गोव्यामध्ये सत्तेत होतो. त्याचवेळी आपला मंत्री केरळच्या मंत्रीमंडळामध्ये होता. त्याचवेळी आपल्याला नॉर्थ ईस्टमध्ये काम करण्याची संधी मिळाली. असं कधी घडलेले नव्हते, की जो पक्ष स्थापन झाला, आणि दीड ते दोन महिन्यामध्ये त्यांना देशातील तीन ते चार राज्याच्या सरकारमध्ये त्यांना काम करण्याची संधी लोकांनी दिली. हे जे काही झालं, ते लोकांचे प्रेम होतेच, पण तुमच्यासारख्या हजारो कार्यकर्त्यांचे कष्ट होते, त्यामुळे ते घडले. महाराष्ट्रामध्ये अधिक पाठिंबा मिळाला. 50 टक्के सत्तेमध्ये तुम्ही भागीदार झालात. अनेक जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आपले झाले. 80 ते 90 नगरपालिकांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते झाले. महिला पदाधिकाऱ्यांबाबतचा विक्रम त्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसने केला. आणि या पक्षाचा पाया भक्कम करण्याची भूमिका तुम्ही लोकांनी घेतली. काही महापालिकांमध्येही महापौरपदाची जबाबदारी आपल्या पक्षाकडे पडली. एका बाजूला आपण सत्तेचा विस्तार करत होतो, आणि दुसऱ्या बाजूला राज्याच्या मंत्रीमंडळात आपले जे सहकारी काम करत होते, ते लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सत्तेचा वापर करत होते. त्यावेळी संयुक्त सरकार होते, पण लोकांची मानसिकता होती की, काम करायचे असेल तर राष्ट्रवादीच्या मंत्र्यांकडे जाऊ. ठिक आहे, सत्तेचा तो कालखंड आता निघून गेला. 14-15 वर्षांपर्यंत आपण सत्तेत होतो, देशातही काम करण्याची संधी आपल्याला मिळाली, पण 14 सालापासून देशातील चित्र बदलल्याचे आपल्याला दिसत आहे. आणि आपण सातत्याने ज्या विचारधारेला विरोध केला, ती लोकं आणि ती विचारधारा आज सत्तेत आलेली आहे.



आपल्या सगळ्या विचारांचा गाभा हा गांधी- नेहरूंच्या विचारांशी सुसंगत आहे. गांधी, नेहरू, फुले, आंबेडकरांनी समतेचा, विषमतेच्या विरोधात जाण्याचा आणि व्यापक देशहिताचा विचार मांडला. स्वातंत्र्य चळवळीत लक्षावधी तरुण त्यामध्ये सहभागी झाले. आणि स्वतंत्र भारत हे जे स्वप्न होते, ते आपल्याला बघायला मिळाले. त्यानंतरच्या काळात त्या विचारातून पुढे जाण्याचा प्रयत्न सुरू होता, पण त्यात काही संघर्ष झाले, मतभेद झाले, आणि आपण एक स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला. आणि आपण आपले एक धोरण पक्कं केलं, आपण तरुण आहोत, जसा काँग्रेसला 125 वर्षांचा कालखंड मिळाला, किंवा भाजपला 50 वर्षांपेक्षा जास्त कालखंड मिळाला. तसा कालखंड आपल्याला मिळाला नाही. मिळो न मिळो, आपल्या कार्यकर्त्यांनी त्याचा कधी विचार केला नाही. हा पक्ष मजबूत करायचा, त्याचे अस्तित्व स्वतंत्र ठेवायचे, त्यात कधी तडजोड करायची नाही. ही भूमिका घेऊन आपण सगळे वेगवेगळ्या ठिकाणी काम करत आहोत.

एका बाजूला मी गांधी- नेहरू विचारांची भूमिका सांगत आहे. आज देशामध्ये काय दिसत आहे, संपूर्ण देशामध्ये काही राज्ये सोडली तर सांप्रदायिक विचार दिसत आहे. दिल्लीमध्ये आहे, संसदेमध्ये आहे. केंद्र सरकारमध्ये आहे, देशातील अनेक राज्यांमध्ये आहे. संसदेमध्ये आम्ही बघतो की, एका कोपऱ्यामध्ये भगवे कपडे घातलेले लोक असतात. त्यात स्त्री असतात, पुरुष असतात, ते फारसे भाग घेतात, असं दिसत नाही. पण, त्यांची कामाची पद्धत वेगळी आहे. सरकार चालविण्याची जबाबदारी काही घटकांवर, आणि आपल्या सरकारचा लाभ घेऊन समाजाला एकसंध न ठेवण्याची जी आपली विचारधारा आहे, तीची खबरदारी घेण्याची जबाबदारी हा तो वर्ग घेत आहे, तो संसदेमध्ये आपल्याला फार मोठ्या प्रमाणावर बघायला मिळाला. त्यामध्ये काही

काही असे आहेत, की ज्यांच्यावर खटले आहेत. गंभीर खटले असलेली एक व्यक्ती मध्यप्रदेशमधून निवडून आलेली आहे. मालेगाव बाम्बस्फोटामध्ये तिचे नाव आहे. एक जोशी नावाच्या मध्यप्रदेशमधील कार्यकर्त्याच्या खूनाचा खटला आहे. असे गंभीर खटले असलेल्यांना तिकीट देणे, ही गोष्ट राजकीय पक्षाला आणि लोकशाहीला न शोभणारी आहे. कधीही राजकीय पक्ष असे करत नाही. खटले दोन प्रकारचे असतात. म्हणजे तुम्हाला तिकीट द्यायचे नाही, असं नाही. पण, बघायला पाहिजे की, खटले कशा प्रकारचे आहेत. मघाशी तुम्ही मोर्चा काढला, तुमच्यावर खटला भरणार. हे खटले काही गंभीर नाहीत, हे खटले लोकांच्या प्रश्नांची मांडणी करण्यासाठी आहेत. तुम्ही सरकारने काढलेल्या आदेशाचा भंग केला, म्हणून तो खटला आहे. हे एका कार्यकर्त्यांच्या दृष्टीने सन्मानचिन्ह आहे. तो खटला










लोकांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासंबंधीचा आहे. मालेगावमध्ये बॉम्बस्फोट झाला, त्यात इतके इतके लोक मृत्यूमुखी पडले, त्याला जबाबदार आहे म्हणून खटला भरला. मोठी गमतीची गोष्ट आहे की, याची तपासणी सुरू झाली आणि पहिल्यांदा अल्पसंख्यांक समाजाची मुले पकडून आणण्यात आली. माझ्या वाचनात आले आणि मी कुठे तरी म्हणालो की, ही चूक माझ्या मनाला पटत नाही. कोणती गोष्ट, बॉम्बस्फोट कधी झाला मालेगावला, एका शुक्रवारी झाला. कुठे झाला, मशिदीमध्ये झाला. कधी झाला, ज्यावेळी मशिदीमध्ये प्रार्थनेसाठी लोक एकत्र जमतात, त्यावेळी झाला. त्यावेळी मी म्हणालो की, मला हे पटत नाही की, कुठलाही मुस्लीम शुक्रवारी जुम्मा के दिन मशिदीत जाऊन बॉम्बस्फोट करेल, यावर माझा विश्वास नाही. जे काही पकडले गेले, त्याऐवजी योग्य तपास केला पाहिजे. सुदैवाने त्यावेळेला काही उत्तम अधिकारी होते, त्याच्यामध्ये करकरे नावाचा अधिकारी होता. त्याची हत्या झाली. करकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्याच्या खोलात जाऊन काही लोकांना अटक केली. त्यामध्ये राष्ट्रपतींच्या अभिभाषणावेळी आमच्यासोबत ज्या भगिनी येऊन बसतील, त्यांचा समावेश आहे. अशांना आता प्रतिष्ठा मिळू लागली आहे. असे एक नाहीत, अनेक आहेत. मंत्रीमंडळामध्ये एख मंत्री आहेत, काहीही सांगतात. कोणी मुस्लीम कार्यकर्ता काही बोलला तर पाकिस्तानला जायला सांगतात. एकदा संसदेत चहा प्यायला बसलो असताना तिथे अशीच एका चर्चा झाली. त्यावेळी ते म्हणाले, उनको भेज दो वहा. त्यांना सांगावे लागले की, हा देश तुमच्या बापजाद्यांची प्रॉपर्टी नाही. हा देश सगळ्यांचा आहे. ह्यांना पाठवून द्या, त्यांना पाठवून द्या, हा अधिकार काही तुम्हाला नाही. लोकशाहीत तुम्हाला सत्ता मिळाली, याचा अर्थ तुम्हाला वाटेल त्या पद्धतीने सत्तेचा वापर करता येईल, असं नाही. पण, ते अखंडपणाने अशा गोष्टी बोलत असतात आणि त्यांना पुन्हा एकदा मंत्रीमंडळात स्थान मिळाले. याचा अर्थ नेतृत्व मिळालेल्यांना समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन हा देश पुढे न्यायचा आहे. या संकल्पनेला तिलांजली देऊन,

आम्ही म्हणून त्याच विचारधारेने देश चालवणार, हे चालले आहे.

तुम्ही जवाहरलाल नेहरू पाहिले नसतील, मी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना नेहरू पंतप्रधान होते. त्यावेळी नेहरू पुण्याला यायचे, तेव्हा आम्ही तासनतास रस्त्यावर थांबायचो त्यांना बघायला, त्यांचा आणि आमचा काही संबंध आला नाही. शास्त्रींचाही नाही आला, पण त्यानंतर जे काही पंतप्रधान झाले, त्यांचा संपर्क आला. इंदिराजी असतील आणि बाकीच्या प्रधानमंत्र्यांसोबत काम करण्यांची संधी मिळाली. पण असं कधी पाहिले नाही, नरसिंहराव होते रोज त्यांच्या घरात पूजाअर्जा चालायची, तो त्यांचा व्यक्तीगत प्रश्न आहे, मुस्लीम असेल तर तो नमाजला जाईल. इसाई असेल तर तो प्रार्थनेला गेला आणि हिंदू असेल तर तो गया, काशिला गेला, तर तो त्याचा अधिकार आहे. त्याबाबत काही तक्रार नाही. पण तुम्ही त्या सत्तेचा वापर धार्मिक विचाराच्या प्रचारासाठी करणार असाल, तर ते योग्य नाही. कारण, या देशाला घटनेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी विचारधारा दिली, आणि ती देशाने स्वीकारली, त्या चौकटीमध्ये हे बसत नाही. आणि हे आजचे राज्यकर्ते त्याचा विचार करत नाहीत. आपण पाहिले की, देशाचा प्रधानमंत्री गुहेत जाऊन बसतो. आणि हे देशाला दाखवतो, हे वेगळे चित्र आपल्याला आज बघायला मिळत आहे. अशी स्थिती ज्यावेळी येते, त्यावेळी लोकशाही, सर्वधर्म समभाव, विज्ञानाला सामोरे जाणे, या सगळ्या गोष्टी जर चिरंतर टिकवायच्या असेल, तर या सगळ्या गोष्टींना मजबुतीने तोंड देण्यासाठी उभे राहिले पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा लहान असेल, पण त्याचा कार्यकर्ता





गुहेत जाऊन बसला. प्रधानमंत्र्यांना एक तास काय अर्धा तास महत्त्वाचा असतो. पण, ते त्या ठिकाणी जाऊन बसले. काय संदेश त्यांनी दिला. आज आधुनिकता नवीन पिढीमध्ये दिली जाते, पण ती आधुनिकता, विज्ञान सोडून आमचा प्रधानमंत्री त्या

हा चिवट आहे. त्यासाठी तुम्हाला आणि आम्हाला फार जागरूक रहावे लागेल.

आज मुंबईच्या संघटनेने ही बैठक आयोजित केली. मी







सचिन अहिर आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना धन्यवाद देतो. महाराष्ट्राच्या अध्यक्षांनी जलदिंडीची संकल्पना पाण्याचे महत्त्व हे जनसामान्यांमध्ये प्रसूत करण्यासाठी कार्यक्रम घेतला. एक आगळा कार्यक्रम आपण या ठिकाणी घेतला, त्यांचे मी अभिनंदन करतो.

मुंबईमध्ये आपल्याला आपल्या कामाचा विस्तार वाढवायचा आहे. आपण मुंबईत कमी आहोत, हे मान्य केले पाहिजे. माझ्यासह सर्वांची त्याबाबत जबाबदारी आहे की, आपण राष्ट्रवादीचा चेहरा हा ग्रामीण चेहरा केला आहे. ते चुकीचे नाही, योग्य आहे. पण, ही गोष्ट करून चालणार नाही की, महाराष्ट्रामध्ये 50 टक्के लोकसंख्या नागरी आहे. आज मुंबईसारखे शहर, ठाण्यासारखे शहर, नागपूरसारखे शहर, पुण्यासारखे शहर, पिंपरी चिंचवडसारखे शहर, ही तर आहेतच, पण तुम्ही प्रत्येक तालुका पहा, आज तुम्ही पेणला जर गेलात तर, ते शहरामध्ये येते की, नाही यासंबंधीची चर्चा होऊ शकते. पण, पेणमध्ये नागरिकरण झालेले आहे, मोठ्या प्रमाणावर. प्रत्येक तालुक्यामध्ये नागरिकरण झालेले चित्र आपल्याला पहायला मिळेल. तालुक्याच्या व नगरपालिकेच्या ठिकाणी 10 टक्के किंवा 20 टक्के असं शहरीकरण झालेले चित्र आपल्याला दिसते. म्हणजे ज्या राज्याची 50 टक्के लोकसंख्या शहरामध्ये वास्तव्य करते, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आपण सबंध राज्यामध्ये यशस्वी होऊ शकत नाही. आजच्या दिवशी निर्धार करूयात की, नागरी परिसरात पक्षाची व्याप्ती कशी वाढेल. मग शहराचे प्रश्न असतील, पाण्याचे प्रश्न असतील, झोपडपट्टीचे प्रश्न असतील. बेरोजगारीचा प्रश्न असेल, दळणवळणाचा प्रश्न असेल, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न असेल, आपण यात फारसे लक्ष घालत नाही. महानगरपालिका हे महत्त्वाचे स्थान आहे, पण दुर्दैवाने आपल्या संख्या त्या ठिकाणी जास्त नाही. मात्र, त्या त्या भागामध्ये जिथे लोकांवर अन्याय होतो, जिथं दुर्लक्ष होतं, तिथे लोकांसोबत उभे राहण्याला आपल्याला अशक्य नाही. नाही सत्ता आपल्याकडे महानगरपालिकेची, पण ज्यांच्याकडे आहे, त्यांच्याकडून दुर्लक्ष केले जात असेल, तर त्यांना जाब विचारण्यासाठी नागरिकांना एकत्रित करणे, आणि प्रयत्न करणे व जनमानस तयार करणे, ही गोष्ट तर आपल्याला करता येईल. आणि ती गोष्ट करण्याची खबरदारी आपल्याला करावी लागेल. दुसरी गोष्ट अशी की, महाराष्ट्र आणि त्याचा नागरी प्रश्न इतर राज्यांपेक्षा वेगळा आहे. तुम्ही केरळमध्ये गेला, तर 90– 95 टक्के लोकं एका भाषेमध्ये बोलणारे असतात. तमीळनाडूमध्ये गेलात, तर त्रिचूर, कोईमतूर, चेन्नईसारखे शहर असेल, तिथे विविध भाषा बोलणारे लोक नाहीत. एकाच भाषेचा प्रभाव त्या ठिकाणी पहायला मिळतो. महाराष्ट्रात तसं नाही. मुंबईचे ठिक आहे, ती कास्मोपोलिटीन आहे. आज तुम्ही नागपूर, चंद्रपूरला गेला तरी तिथे 30 ते 40 टक्के लोकं हिंदी बोलत असतील. आज आम्ही गोंदियाला जातो प्रफुल्लभाईंकडे तिथे 50 टक्क्यांपेक्षा जास्त लोक हिंदीमध्ये बोलतात. अशी अनेक शहरे आहेत. त्याचे कारण, महाराष्ट्र विविध समाजाच्या लोकांना बरोबर घेऊन सन्मानाने



त्यांना जगण्याचे साधन तयार करणारा प्रदेश आहे. त्यामुळे लोकं इथं विश्वासाने येतात आणि त्यामुळे त्याचा सामाजिक चेहरा, भाषिक चेहरा, हा इतर राज्यांपेक्षा आपल्याला वेगळा पहायला मिळतो. आणि मुंबई हे त्याचे आगर आहे. मुंबई सगळ्या भाषेचे आणि सगळ्या राज्यांचे लोक राहतात. कालच मला सचिनभाऊंच्या नेतृत्वाखाली तेंदू समाजाचे शिष्ठमंडळ भेटले. तेंदू समाजाचे काय प्रश्न आहेत, त्याची मांडणी त्यांनी केली. ते मला समजून सांगत होते. कारण, मी मुंबईत लक्ष देत नाही, असा समज आहे. आणि मी त्यांना बोलता बोलता सांगितले की, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राचे जे पहिले स्पीकर झाले, ते तेंदू होते. महाराष्ट्रात काँग्रेसचे एक मोठे पुढारी होते. त्यांचे नाव लिंगाअण्णा पुजारी, ते तेंदू होते. मग मी त्यांना महाराष्ट्रात पहिले महापौर तेंदू झाल्याचे सांगितले. तसेच, आणखी आठ- दहा नावे सांगितले. मग त्यांना आश्चर्य वाटले. हे महाराष्ट्रामध्ये घडले आणि ते लोकांनी मुंबईमध्ये आनंदाने स्वीकारले. एक काळ असा होता की, मुंबईचे नेतृत्व काँग्रेसचे एक नेते होते, त्यांचे नाव स. का. पाटील, ते मुंबईचे अनभिषिक्त राजे म्हणून त्यांची ओळख होती. आणि त्यांनी समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन मुंबईचा कास्मोपोलिटन हा चेहरा जाणीवपूर्वक जोपासला. अनेक समाजातील लोकं त्यांनी वाढवली. मराठी भाषिक लोकं वाढवली. आमच्या पुणे जिल्ह्यातील मुकुंद ठकुजी पाटील एक शेतकरी माणूस. हे भायखळा मार्केट येथे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा माल विक्रीसाठी मदत करणारा गृहस्थ. ते मुंबईचे काँग्रेस संघटनेचे प्रमुख होते. स. का. पाटील अशा लोकांना महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील लोकांना मुंबईत आणून आपण सन्मानाने मुंबईकर आहोत, मुंबईत आपले स्थान आहे, आपण परके नाहीत. या प्रकारची स्थिती त्यांनी या ठिकाणी केलेली होती. म्हणून मुंबईचा कास्मोपोलिटीन चेहरा आपल्या सगळ्यांना जोपासायचा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये त्या सगळ्या घटकांना स्थान आहे, त्याच व्यापक पाया मुंबईमध्ये कसा करता येईल, याची काळजी आपल्याला घ्यायची आहे.

आपण आघाडीत आहोत. जागा ठरवायच्या आहेत. ते सचिनभाऊ, प्रांताध्यक्ष हे बसून ठरवतील. मागच्या वेळी सात जागा आपण लढवल्या होत्या. आजही काय स्थिती आहे, ते पाहून तुम्ही निर्णय घ्या. पण, आज इथंपर्यंत ठिक आहे, पण उद्या महानगरपालिकेची निवडणूक येईल, त्यावेळी अधिकाधिक कार्यकर्त्यांना संधी देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महानगरपालिका लढणारा उदयाचा तिथला नेता होणार आहे. त्यामुळे मुंबईत नगरसेवक पदाचा उमेदवार हा देशातील विधानसभा सदस्यापेक्षा जास्त प्रभावीपणे काम करू शकतो. त्यामुळे ही संधी आपल्या अनेकांना कशी मिळेल, याची तयारी करा. विधानसभेच्या निवडणुकीवेळी लक्ष महानगरपालिकेवर असले पाहिजे. उद्या महानगरपालिकेवर तुमच 50- 60 प्रतिनिधी निवडून आलात, तर उद्या तुम्हाला विधानसभा आणि संसदेसाठी कोणी दुर्लिक्षत करणार नाही. म्हणून पक्षाचा विस्तार करण्यासाठी आपण काळजी घेतली पाहिजे. आपापसातले सर्व मतभेद विसरून मित्र पक्षांबरोबर एकजुटीने काम केले पाहिजे.

हे करत असताना मला एक सुचवायचे आहे. मी नेहमी प्रांताध्यक्षांशी बोलतो. 20 वर्षांपूर्वी आपण हा पक्ष स्थापन केला. त्यावेळी आपले लोक विधानसभेमध्ये निवडून आले. त्यावेळी चर्चा काय होती की, तरुणांची जास्तीत जास्त शक्ती ही








राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत काढण्यात आलेल्या जलदिंडीत छगन भुजबळ, अजित पवार, चित्रा वाघ व इतर नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




राष्ट्रवादीकडे आहे. त्यानंतर मंत्रीमंडळ झाले. त्यात विलासराव होते. आपल्या पक्षाकडून अजितराव, जयंतराव आणि बाकीचे इतर सहकारी होते. आर. आर. आबा होते. आणि ते सगळे पहिल्यांदा मंत्री झाले होते. नुसते झाले नाही, तर कॅबिनेट मंत्री झाले. वरिष्ठ नेता म्हणून त्या ठिकाणी छगन भुजबळ उपमुख्यमंत्री होते. पण, उपमुख्यमंत्र्यांच्या खालची टीम ही सगळी पहिल्यांदा कॅबिनेट मंत्री झालेली. तरुणांची होती. त्याचा परिणाम म्हणून सर्वत्रच पक्षाचा विस्तार होण्याला झाला. आज आपल्याला थोडा विचार करावा लागेल. आपल्यातले सर्व मतभेद व गटतट विसरून पक्ष मजबुतीने उभारण्याच्या कामाला लागावे लागेल. हे काम आपण सारे जण हाती घ्याल, असा विश्वास व्यक्त करून थांबतो.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या प्रांगणात झेंडावंदन झाले. तेव्हा त्याला सलामी देताना अजित पवार, जयंत पाटील, सचिन अहिर, नवाब मलिक व इतर नेते.

# राष्ट्रवादीची सत्ता आणण्यासाठी अथक प्रयत्न करूयात...

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे उद्गार

आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आज 20 वर्षे पूर्ण केली. स्थापनेपासून एकविसाव्या वर्षात आपण पदार्पण करताना मी सर्वांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापनदिनाच्या शुभेच्छा देतो. आज आपण एक प्रश्न घेऊन जलदिंडी काढली. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दुष्काळ आहे आणि दुष्काळाची तीव्रता अधिक टोकाची आहे. याचा अर्थ शहरात दुष्काळ नाही, असा नाही. ठाण्याच्या जवळील घोडबंदरला गेले, तर तिथे पाण्याची किती चणचण आहे, हे आपल्या लक्षात येईल. जसा ग्रामीण भागात दुष्काळ आहे, तसं महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्येही पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवायला लागले आहे. पाऊस



कधी येतोय, याची लोकं चातकासारखी वाट पाहत आहेत. महाराष्ट्रात आज जवळपास सहा ते सात हजार टँकर फिरत आहेत. महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातील जनावरांची अवस्था जर बघितली, तर लक्षात येईल की, राज्य सरकारने किती अक्षम्य दुर्लक्ष जनावरांसाठी ज्या चारा छावण्या केल्या आहेत, त्याकडे केले आहे.

खुद्द पवारसाहेबांनी माननीय मुख्यमंत्र्यांना तीन ते चार वेळा सांगून चारा छावण्याचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. बीड जिल्ह्यात साहेब गेले. तिथे चारा छावणीधारकांनी मागणी केली की, आम्हाला गेली काही महिने सरकारने देणे असणारे पैसे दिले नाहीत. त्यामुळे आम्ही चारा छावण्यांमध्ये चार कसा आणू. फक्त पाणी देतोय. पवारसाहेबांनी तिथूनच त्यांना विनंती केली की, यांचा प्रश्न सुटला पाहिजे. त्यामुळे त्या चारा छावण्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम झाले.

महाराष्ट्राच्या सर्व भागामध्ये दुष्काळ असताना निवडणुकीचा दिवस संपल्यानंतर मुंबईतील मतदान झाल्यावर मी दोन अडीच वाजता साहेब कुठे आहेत म्हणून फोन केला, तर साहेबांनी मला सांगितले की, मी दुष्काळाच्या दौऱ्यावर निघालेलो आहे. मी दुष्काळी भागात निघालेलो आहे. आदरणीय पवारसाहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अनेक दुष्काळी भागाला भेटी दिल्या. अनेक त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकारला जाग आणण्याचे काम केले. नोव्हेंबर– डिसेंबर महिन्यापासूनच त्यांचा हा प्रश्न चालू होता. आणि महाराष्ट्राच्या दुष्काळामध्ये ॲडमिनिस्ट्रेशनने कसे काम करावे, याचे मार्गदर्शनही पवारसाहेबांनी केले.

आज जलसंधारण हा विषय घेऊन राज्य सरकार लोकांकडे मते मागत आहे. जलसंधारणामध्ये सात ते आठ हजार कोटी रुपये खर्च झाले. पण, पाण्याचा एक टिपूसही जलसंधारणाच्या नवीन झालेल्या कामात थांबत नाही. त्याचे कारण काय आहे, हे राज्य सरकारला विचारायची वेळ आली आहे. जलसंधारणामध्ये एक दिवस असा होता की, राज्याच्या प्रमुखाने सांगितले की, 72 टीएमसी पाणी आम्ही जलसंधारण काम केल्यामुळे थांबलेले आहे. 72 टीएमसी पाण्याची क्षमता आम्ही निर्माण केलेली आहे. प्रत्यक्षात पाहिले तर महाराष्ट्रातील अनेक गावे आज दुष्काळाला तोंड देत आहेत. आणि म्हणून जलसंधारण हा विषय बघितला, आपण आज जी ही जलदिंडी काढलेली आहे, ती महाराष्ट्रातल्या प्रत्येक महानगरपालिकेत, नगरपालिकेत, गावात ही जलदिंडी काढून पाण्याचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आज सकाळपासून केलेला आहे.

पाण्याचे महत्त्व आहे. मला आठवतंय की, मुंबईच्या उपनगरांमध्ये पाणी कमी होते. अजितदादांकडे ते खाते होते आणि अजितदादांनी पुढाकार घेतला. विरार, वसई, ठाणे असेल किंवा नरेंद्र वर्मा मुंबईचे अध्यक्ष असताना मुंबईचे पाण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी काही महत्त्वाचे निर्णय त्यावेळी घेण्यात आले. तेव्हा कुठे या शहरांच्या पाण्याची व्यवस्था कुठे ना कुठे काही



झाली.

महाराष्ट्रात आज पाण्याचे मोठे संकट आहे, त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने आज वर्धापनदिनी जलदिंडी काढून लोकांमध्ये जागृती करण्यासाठी आज हे पाऊल टाकलेले आहे. मुंबई प्रदेशच्या कार्यालयापासून इथपर्यंत जलदिंडी काढली, आणि या ठिकाणी आपण पाण्याचा कलश घेऊन आलो.

खरं म्हणजे मुंबईत जसे पाण्याचे प्रश्न आहेत, तसे मुंबईचे अनेक प्रश्न आहेत. मुंबईमध्ये आज फार मोठ्या प्रमाणात ट्राफिकचा प्रश्न आहे. मुंबईमध्ये या सरकारने घोषणा केल्या, पण कोस्टल रोडचे काम अजून प्रभावीपणे सुरू झालेले नाही. आम्ही सभागृहात त्या बद्दल आठवण करून दिल्यावर आता कुठे तरी कोस्टल रोडची कामे सुरू झाल्याचे दिसत आहे. मुंबईत असे असंख्य प्रश्न आहेत की, ज्यांच्याकडे सरकारने दुर्लक्ष केलेले आहे. मुंबईच्या प्रकल्पांबाबत सरकारने आश्वासन दिलेले आहे, 2015 साली की, आम्ही हे प्रकल्प 2019 साली पूर्ण करू. पण दुर्दैवाने 2019 साल संपत आलेले आहे, आणि त्यांचा कालखंड ऑक्टोबरमध्ये संपत आला आहे. पण, मुंबईसाठी अनेक केलेल्या घोषणा पूर्ण झालेल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर आपण मुंबईतील कार्यकर्त्यांनी या सगळ्या गोष्टी लोकांसमोर आणल्या पाहिजेत. झोपडपट्टीतील प्रश्न असतील, महागाईने त्रस्त झालेल्या मध्यमवर्गीयांचे अनेक प्रश्न आहेत. आता हळूहळू पेट्रोल- डिझेलची वाढ व्हायला लागलेली आहे. गॅसचे सिलिंडर वाढायला लागले आहेत. कोणतेही निर्णय घ्या, पण या सरकारने मध्यमवर्गीयांच्या खिशाला चाट दिलेली आहे. 16-17 आणि 17- 18 या दोन वर्षात सरकारने सव्वा दोन लाख कोटी रुपये लोकांच्या खिशातून कराच्या रूपाने काढून सरकारची तिजोरी भरण्याचे काम केले आहे. कर घेण्याला काही अडचण नाही. पण, किती घ्यावे, याला काही मर्यादा राहिली नाही. त्यामुळे या सगळ्या गोष्टी महाराष्ट्रातील आणि विशेषतः मुंबईतील लोकांच्या लक्षात आल्या आहेत, असा मला विश्वास आहे. तुम्ही म्हणाल की, निवडणुका कशा झाल्या. हे सर्व प्रश्न आम्ही महाराष्ट्रभर मांडत होतो. आदरणीय पवारसाहेब महाराष्ट्रात जवळपास 80 सभा घेऊन याबाबत प्रबोधन करत होते. महागाईचा प्रश्न होता. नोटबंदीचा प्रश्न होता. जीएसटीचा प्रश्न होता. पाण्याच्या दुर्भिक्ष्याचा प्रश्न होता. रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न होता. असे असंख्य प्रश्न आम्ही महाराष्ट्रात मांडत होतो. पण, निवडणुका त्या प्रश्नावर झाल्याच नाहीत. या मुद्द्यांवर मित्रांनो मतदान मागण्यातच आले नाही. आम्ही या मुद्द्यांवर लोकांचे प्रबोधन करत असताना निवडणुका वेगळ्या मुद्द्यावर ठेवण्यात आल्या. निवडणुकांसाठी शेजारच्या राष्ट्रावर केलेले आक्रमण असेल, पुलवामाचा स्फोट असेल किंवा अगदी शेवटच्या दिवशी गुहेत जाऊन बसण्याचा कार्यक्रम असेल, म्हणजे या देशात निवडणुका वेगळ्या दिशेने नेण्यात त्यांना यश आले. हे आपल्याला कबूल केले पाहिजे. पण त्याने काही माणसांच्या समस्या सुटलेल्या नाहीत. ते सरकार जरी जास्त खासदार घेऊन दिल्लीत बसले असले तरी, सामान्य माणसांचे प्रश्न सुटले आहेत का. त्याला नकार दिला जातो. त्यामुळे एवढा मोठा विजय झाला असला तरी देशाच्या कानाकोपऱ्यात कुठे जल्लोष केलेला दिसत नाही. आपल्या मनाचे सरकार आलेले आहे आणि आता आपल्या मनाप्रमाणे देश चालणार आहे, म्हणून आनंद साजरा करणारी लोकं रस्त्यावर उतरली, तर समजू शकलो असतो की, लोकांना फार मोठ्या प्रमाणावर मोदी साहेबांच्या विजयाचा आनंद झालेला आहे.



मुंबईतील राष्ट्रवादी भवनापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानपर्यंत काढण्यात आलेल्या जलदिंडीत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, छगन भुजबळ, अजित पवार, प्रकाश गजभिये, सुरेखा पेडणेकर, चित्रा वाघ व अन्य नेते सहभागी झाले होते.

मी आमच्या माढ्याच्या उमेदवारांना फोन केला. माळशिरस तालुक्यात एक लाख 6 हजार मतांचे मताधिक्य आहे. मी म्हटलं असं कंस झाले, तर म्हणाले, साहेब झाले असेल. निकाल लागला आहे. पण निकालाच्या दिवशी एकही फटाकडी त्या माळशिरस तालुक्यात वाजलेली नाही. लोकांना आनंद झाला नाही. कारण, जे लोक भाजपचा प्रचार करत होते, त्यांना वाटत नव्हते की, आपल्याला तर 5- 10 हजाराचे लीड मिळेल असं वाटत होतं, पण लाखाचे लीड, 50 हजारांचे लीड कसं मिळाले, या विवंचनेत भाजपचे कार्यकर्ते गेलेले आहेत. त्यामुळे आपला विषय सोडा. त्यांनाही विश्वास बसत नाही की, एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांनी मते कशी काय दिली.

प्रश्न अनेक आहेत. शंका अनेक आहेत. म्हणून आपल्याला पुन्हा एकदा लोकांपर्यंत जाऊन जे जे मुद्दे आपण लोकसभेला मांडले, त्यांची आठवण करून देणे, आणि महाराष्ट्र सरकारची जी वेगवेगळ्या पद्धतीने काम करण्याची पद्धत आहे, ती लोकांच्या नजरेला आणून देण्याचे काम आपण येणाऱ्या काळात करणार आहे. आम्ही महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये प्रकाश मेहता नावाच्या मंत्र्यांवर आरोप केले. त्यांनी फाईलवर लिहिलेले आहे की, ही नस्ती मी मुख्यमंत्र्यांना अवगत केलेली आहे. आणि त्या खाली त्यांनी आदेश दिले होते, एफएसआय वाढवून देण्याचे.



800 कोटी रुपयांचा एका बिल्डरचा फायदा झाला. नस्तीवर होते, महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये ते सांगितले. ह्यांनी त्यांचे काम केलेले आहे. ते मुख्यमंत्रीसाहेब हो किंवा नाही, ते सांगा. मुख्यमंत्र्यांनी उत्तर देण्याचे टाळले, तेच उत्तर देतील म्हणाले. त्यांनी काय उत्तर दिले, मी अशा बऱ्याच नस्ती घेऊन गेलो होतो. साहेबांना त्या दाखवल्या आणि मी रात्री त्या नस्तींवर आदेश दिले. पाच- सहा दिवसांनी माझा सचिव आला आणि म्हणाला की, ही नस्ती काही आपण मुख्यमंत्रीसाहेबांना दाखवलेली नव्हती. ज्याच्यावर लिहिलेले होते की, मुख्यमंत्र्यांना अवगत केलेले आहे, ती नस्ती दाखवलेली नव्हती, असं ते म्हणाले. पण, ठीक आहे, असेल ते असेल, त्याची चौकशी लावा, असे मी म्हणालो. मनाची इच्छा नसताना लोकायुक्तांची चौकशी आम्ही लावायला लावली. लोकायुक्तही त्याच्यावर दोन वर्षे निर्णय देत नव्हते. एका फाईलच्या चौकशीसाठी दोन वर्षांचा कालावधी लागतो, हा प्रश्न आहे. ठीक आहे, काही दिवसांपूर्वी त्याचा निर्णय आला आणि लोकायुक्तांनी त्याच्यावर ठपका ठेवण्याचे काम झालेले आहे. त्यांच्यावर ठपका आहे आणि लोकायुक्त म्हणतात की, त्या बिल्डरला 500 कोटी रुपयांचा फायदा करून देण्याचे काम मंत्री महोदयांनी केलेले आहे. आपलं मंत्रिमंडळ असले आणि जर एखादा असा निर्णय झाला असता, तर पवारसाहेबांनी त्या मंत्र्यांना मंत्रिमंडळात ठेवले असते का. काँग्रेस असेल किंवा राष्ट्रवादी काँग्रेस असेल, कोर्टाने जर ताशेरे जरी मारले, तरी आपण त्या मंत्र्याला मंत्रिपद सोडायला लावलेले आहे. कारण, जनाची नाही, तरी मनाची तरी काही तरी असतेच. ठपका ठेवल्यावर त्याला मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार राहत नाही. हा संदेश देण्याचे काम काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने लोकशाहीची बूज राखण्यासाठी केले.

हा एकच विषय मी तुम्हाला सांगितला. महाराष्ट्राच्या विधान परिषदेत धनंजय मुंडे यांनी सतरा ते अठरा मंत्र्यांवर आरोप केलेले आहेत. कागदी पुरावे आहेत. काहींच्या चौकशा सुरू झाल्या. काही अर्धवट थांबल्या. पाहिजे तसे निष्कर्ष त्यांनी काढले. पण, सगळ्या मंत्र्यांना क्लीनचीट देण्याचे काम महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी केले. हे सगळं महाराष्ट्रातील जनतेला सांगण्याचे काम आपण सगळ्यांनी करायचे आहे.

मराठवाड्यात दुष्काळ आहे, पण वायनरी आणि दारू प्रकल्पांना पाणी आहे. आणि सगळ्या अठरा प्रकल्पांना मिळते. बिअरच्या कारखान्याला देण्यासाठी तुमच्याकडे पाणी आहे. पण, मराठवाड्यातील सामान्य लोकांच्या घरात पाणी पोचविण्याचे काम तुम्हाला करता येत नाही. टँकरच्या लॉब्या महाराष्ट्रात तयार झालेल्या आहेत. दहा टँकर असतील तर सात टँकर जातात आणि तीन तसेच राहतात. म्हणून अशा प्रश्नांवर आवाज उठविण्याचे काम आपल्याला करायचे आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने अनेक निर्णय घेतले. आर. आर. आबांनी डान्स बार बंदीचा निर्णय घेतला. पण, डान्स बार सुरू करण्याचे काम यांनी केले. ज्या डान्स बार बंदीमुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणूस, मध्यमवर्गीय माणूस समाधानी होता, पण, कायद्यात बदल करून आम्ही डान्स बार सुरू करणार नाही, असं सांगत सांगत महाराष्ट्रात डान्स बार सुरू करण्याची व्यवस्था महाराष्ट्रात कशी काय झाली. हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. असे अनेक प्रश्न आहेत.

केंद्र सरकारमध्ये पवारसाहेब असताना देशभरात सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली. या सरकारने कर्जमाफी देताना

**मराठवाड्यात लोकांना पिण्यासाठी पाणी नाही. विहिरी कोरड्याठाक आहेत. पाण्यासाठी माणसे वणवण हिंडताहेत, पण औरंगाबादेतील बियर फॅक्टऱ्यांना सरकार नियमित पाणीपुरवठा करते आहे.**





दोन-अडीच वर्षे लावली. आज महाराष्ट्रात फिरले तर अजूनही कर्जमाफी मिळाली नसल्याचे सांगणारे, शेतकरी भेटतात. म्हणून अशा अनेक प्रश्नांबाबत शेतकऱ्यांची जागृकता करण्याचे काम आपण भविष्य काळात करूयात. त्यासाठी पुढचे तीन महिने आम्ही पायाला भिंगरी लावून महाराष्ट्रात फिरणार आहे. मी स्वतः आणि आमचे सगळे सहकारी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाणार आहे. तीन महिन्यात महाराष्ट्राच्या प्रश्नांवर, गोरगरीब जनतेच्या प्रश्नावर पुन्हा आवाज उठविण्याचे काम आपल्या सगळ्यांना करावे लागणार आहे.


माझी आपल्या सगळ्यांना कळकळीची विनंती आहे की, आपण सगळे मुंबईतील कार्यकर्ते आहोत. मुंबईत आपल्या वाट्याला ज्या जागा येतील, त्या ताकदीने लढविण्याचे काम करू. उमेदवाराने बोलवले पाहिजे आणि काही तरी व्यवस्था झाली पाहिजे, असं काही कार्यकर्ते समजतात. पण, आता हे आपल्या घरातले लग्न आहे, घरातले कार्य आहे, घरातील ताकद लावून आपण जे काही उमेदवार उभे करणार आहे, ते निवडून आणू. त्यासाठी आपण सगळ्यांनी येणाऱ्या निवडणुकीत ताकदीने काम करायचे आहे. म्हणून आपण आता काही जागांवर लक्ष केंद्रित करून काम करायला सुरवात केली पाहिजे.

निवडणुकीसाठी काळ काही फार लांब नाही. नव्वद दिवसांपेक्षा कमी कालावधी राहिलेला आहे. म्हणून हे मनातून काढा की, किती मतं मिळाली, किती लीड मिळाले. विधानसभेला लोकं वेगळा विचार करतात, हे विसरू नका. लोकसभेला कदाचित वेगळा विचार असेल, एका बाजूला नरेंद्र मोदींचा चेहरा होता आणि विरोधकांना सर्वमान्य एक चेहरा देता आला नसेल. त्याचाही काही परिणाम या देशातील मतदारांवर झाला असेल. अनेक विषय असतील, पण महाराष्ट्राच्या निवडणुकीत आपण जर ताकद पणाला लावली, तर महाराष्ट्रातील सर्वांत मोठा पक्ष करण्याचे काम आपल्या ताकदीने होऊ शकते. त्यासाठी आपण कंबर कसून कामाला लागले पाहिजे.

म्हणून मला सांगावेसे वाटते की, आज पक्षाचा वर्धापन दिन आहे. 1999 साली ज्यावेळी या पक्षाची स्थापना झाली, 10 जूनला. त्यावेळी शिवाजी पार्कचे संपूर्ण मैदान भरलेले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ताकद उभी करण्याचे काम महाराष्ट्रातील जनतेने केलेले होते. ठीक आहे, निवडणुकीतील यश अपयश असते. पण, अपयशाने खचून न जाता आपण पुन्हा एकदा महाराष्ट्रातील जनतेकडे जाऊ. ज्या जनतेने नेहमी आपल्याला आदर दिला, प्रेम दिले, उचलून घेतले, ठीक आहे, एकदा दोनदा पराभव झाला असेल, त्याचा अर्थ जनतेने अवहेलले असं होत नाही. पुन्हा एकदा जनतेचे प्रश्न घेऊन आपण जनतेत गेलो तर महाराष्ट्रातील जनता राष्ट्रवादी काँग्रेसला विन्मुख हाताने परत पाठवणार नाही. म्हणून माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे की, आपण महाराष्ट्रातील कार्यकर्ते निर्धार करू. महाराष्ट्रातील सर्व मतदारसंघात आम्ही जाणार आहोत. आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ताकद वाढविण्याचे काम पुन्हा एकदा करूयात. आज 10 जूनच्या वर्धापनदिनानिमित्त पुन्हा निर्धार करूयात की, महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षांचे सरकार आणण्यासाठी अथक प्रयत्न करूयात. आजच्या दिवशी निर्धाराची भूमिका करूयात.







मुंबई महाराष्ट्राची राजधानी असली तरी भारताची आर्थिक राजधानी आहे, आणि आज देशात आर्थिक संकट ओढवलेले असताना मुंबई स्थिर असणे, अत्यंत आवश्यक आहे. आज आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विसावा वर्धापनदिन जलसंकल्प दिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात साजरा करत आहोत. पाण्याचे महत्त्व हे पाण्याचे ज्यावेळी दुर्भिक्ष्य होतं, त्यावेळी प्रत्येकाला जाणवतं. पाऊस सुरू झाल्यानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे आपण या सगळ्या गोष्टी विसरून जातो. आणि पुन्हा एकदा ये रे माझ्या मागल्या, अशी परिस्थिती निर्माण होते. आज आपल्याला पक्षातर्फे पाण्याचे महत्त्व पटवून देण्याची कामगिरी पार पाडावी लागणार आहे. आणि म्हणून जयंतराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही जलदिंडी काढली. ती जलदिंडी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये आज काढण्यात येत आहे. सकाळी आपले नेते भुजबळसाहेबही त्याच्यामध्ये होते. पण, काल परवा येवला आणि नाशिक परिसरामध्ये खूप मोठे वादळ झाले आहे. अनेक ठिकाणी पत्रे उडाले, अनेक ठिकाणी झाडे पडली आहेत. अनेक ठिकाणी कांद्याच्या चाळी त्या ठिकाणी उद्ध्वस्त झाल्या आहेत. आणि त्यामुळे त्यांनी सांगितले की, मी त्या ठिकाणी सुरवात करून देतो आणि मी येवल्याला जातो. शेवटी त्याच्यातून एकच दिसते की, राज्यातला कोणी माणूस ज्यावेळी अडचणीत येतो, त्यावेळी सगळी कामं बाजूला ठेवून त्या माणसाला आधार देण्याचे काम, त्या माणसाला मदत देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष करत असतो, हे आपण आदरणीय पवारसाहेबांच्या रूपाने निकाल लागल्यानंतर पाहिले. आज भुजबळसाहेबही तिकडे गेले. अशा पद्धतीने अनेकांना काम करावे लागते. आणि तीच खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची परंपरा आहे.

लोकसभेचा निकाल लागला आहे. त्याबद्दल खूप काही चर्चा चालू आहे. त्याबद्दल वेगवेगळे लेख येत आहेत. माझी सर्व कार्यकर्त्यांना आग्रहाची विनंती आहे, आता तो निकाल कसा लागला, का लागला. त्याबद्दल जास्त चर्चा न करता, ते न उगाळत बसता, उद्याच्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जास्तीत जास्त कशा पद्धतीने निवडून येईल, यासाठी आपल्याला जिवाचे रान करायचे आहे.

ठीक आहे, काही सहकारी म्हणाले, ईव्हीएम मशिन, त्याबाबत अनेक विरोधी पक्षांनी विरोध केला नाही का. पण, निवडणूक आयोगाने सांगितले की, मी जो निर्णय घेतला, तो योग्य आहे. त्या करता आपण सुप्रिम कोर्टात गेलो. शेवटी सुप्रिम कोर्टही तेच सांगतोय की. त्याच्यामध्ये एक पक्षाच्या प्रमुखांनी



सांगितले की, जर ते बदलले नाही, तर आम्ही निवडणुकीला उभे राहणार नाही. लोकशाहीमध्ये असे चालणार नाही. कारण, ते म्हणतील बरं झालं, मोकळंच झालं ना. तो प्रयत्न करत, जनाधार आपल्या बाजूने कसा वाढेल, याचा प्रयत्न केला पाहिजे. बहुतेक राज्यात आणि देशात कुठल्या बाजूने निकाल जाणार आहे, ते पाहून मतं देतात. काही मतदारांना माहिती ही नाही की, आपण कुठल्या खासदाराला निवडून दिले आहे. त्यांनी फक्त मोदींना पंतप्रधान करायचे आहे, आणि त्याकरता कोणाला निवडून द्यायचे, ते पाहिले. अनेक राज्यात तेच झाले. तीन महिन्यांपूर्वी



# राज्यात आघाडीची सत्ता आणायची आहे...

## अजित पवार



राजस्थानला गेहलोत मुख्यमंत्री होत आहेत, मध्य प्रदेशात कमलनाथ मुख्यमंत्री होतायेत, इकडे चंद्रशेखर राव मुख्यमंत्री होत आहेत. तेलंगणाचा निकाल तर किती दिवसांपूर्वी लागला होता. दोन महिने पण झाले नव्हते. परंतु तरीही मुख्यमंत्र्यांची स्वतःची मुलगी पराभूत झाली ना. निवडून आले, त्यावेळेस ईव्हीएम मशिन कसं काय आणि पडल्यावर मग ईव्हीएम मशिनवर कसा काय दोष द्यायचा. आणि म्हणून मग तो एक वेगळा मुद्दा होऊ शकतो. म्हणून त्याला दोष देत आपण आपल्या कामामध्ये कृपा करून कमी पडू नका. अशी माझी आग्रही विनंती आहे. त्याबद्दल लढण्याचे काम केले जाईल.

पण, राहिलेल्या 100 दिवसांमध्ये आपल्याला चांद्यापासून बांद्यापर्यंत काम करायचे आहे. प्रांताध्यक्ष स्वतः समविचारी पक्षांशी बोलत आहेत. जास्तीत जास्त सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करत आहेत. वेगवेगळ्या बातम्या येत आहेत. कोण कोणा बरोबर जाणार आणि कोण नाही जाणार, याबद्दलची माहिती दिली जात आहे. ती देत असताना मधल्या काळामध्ये एक चर्चेला कारण नसताना ऊत आणला गेला की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच काँग्रेसमध्ये विलीन होणार. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त मी आपल्याला सांगू इच्छितो. आणि आदरणीय पवारसाहेबांनी याबद्दल स्पष्टपणे भूमिका मांडलेली आहे. काही झालं तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व राहणार. आणि आपल्याला ते ठेवायचे आहे. कुठल्याही परिस्थितीत विलीनीकरण होणार नाही. समविचारी पक्षांना सोबत घेऊन जाण्याची आपली इच्छा आहे. कारण, जातीयवादी पक्षाचा पराभव करण्यासाठी ते गरजेचे आहे. त्यामुळे माझ्या मुंबईच्या कार्यकर्त्यांनी अशी चर्चा जर कोणी आणली तरी त्याला तिथल्या तिथे रोखायचे आहे. ते खोडायचे काम करा. तो धादांत आरोप आहे, हे सांगण्याचे काम करा.

अनेक वेगवेगळे प्रश्न आहे. अनेकांना आरक्षणाबाबत भूलभूलैय्या करण्यात आले. एसआरएचा घोटाळा बाहेर आलेला आपण पाहत आहोत. गेल्या पाच वर्षात

या सरकारच्या मंत्र्यांनी केलेले घोटाळे बाहेर आणले. विधिमंडळात आणले गेले, पण क्लीन चीट दिली जाते. आणि त्यांना त्याबाबत सांगितले जाते की, कोणता घोटाळा नाही. स्वतःच्या मंत्र्यांच्या चुकीच्या गोष्टी झाकण्याचा प्रयत्न हे मुख्यमंत्री करत आहेत. परवा दहावीचा निकाल लागला. मराठी शाळेचे दहावीचे निकाल खाली गेलेत. काही लाख मुलं मुली नापास झाले आहेत. आणि आयसीएससी, सीबीएससी, इथं मात्र शंभर टक्के निकाल लागले. हे कसं काय घडतय, काय घडतय, विनोद तावडे त्याबद्दल काय सांगतायेत. नेहमी निवडणुकीच्या निमित्ताने मतं मागताना काही तरी नवीन मुद्दा काढायचा. कुठं हिंदुत्वाचा काढायचा, कुठं अयोध्येचा काढायचा, कुठं अयोध्येला खासदार घेऊन जाण्याचा काढायचा. आता मंदिर बांधायचे म्हणून सांगायचे, अशा पद्धतीने जे राजकारण चालू आहे, खरं तर त्याच्याबद्दल लोकांना अधिक जागृत करण्याची गरज आहे. आणि एकंदर देशातील राज्यांवर नजर टाकली, तर लोकं लोकसभेला वेगळा विचार करतात, विधानसभेला वेगळा विचार करतात. तीन महिन्यांपूर्वी झालेली निवडणूक आणि त्यानंतर आलेली निवडणूक, मागच्या वेळेसही ज्या पद्धतीने निवडणुका झाल्या, त्यानंतर आप ज्या पद्धतीने दिल्लीमध्ये सत्तेत आली, तोही अनुभव आपण सगळ्यांनी पाहिलेला आहे. आणि म्हणून याच्यात चर्चेत जास्त वेळ न घालवता आपण आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि आपली आघाडी परत महाराष्ट्रात सरकारमध्ये कशी आणता येईल, अशा पद्धतीचे काम करायचे आहे.



आज महाराष्ट्रात असा एकही घटक नाहीये, की जो समाधानी आहे. प्रत्येक घटक असमाधानी आहे. महिलांवर अन्याय अत्याचार होत आहेत. शेतकरी आज अडचणीत आहे. शहरी भागातील प्रश्न आ वासून आहेत. महागाई वाढत आहे. पेट्रोल- डिझेल गॅसच्या किमती वाढत आहेत. बेरोजगारी आहे. गेल्या पाच वर्षात कुठलेही नवीन प्रकल्प आलेले नाहीत. ही पण बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. मल्टीनॅशनल कंपन्यांनी जी काही रोजगार निर्मिती झालेली होती, ती आता बंद झालेली आहे. युवकांना रोजगारासाठी वणवण फिरावे लागत आहे. ही पण वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येत नाही. त्याच्यामुळे शेतकरी असेल, अल्पसंख्याक समाज असेल, मागासवर्गीय समाज असेल, बहुजन समाज असेल, ओबीसी समाज असेल, आदिवासी समाज असेल, कुठलाही घटक समाधानी नाही. बेरोजगारांची संख्या तर प्रचंड वाढत आहे. आज अनेक जागा रिकाम्या आहेत. उद्या लोकांसमोर जात असताना आपल्या विचारांचे सरकार आल्यानंतर जेवढ्या जागा रिक्त आहेत, मग त्या शासकीय जागा असतील, किंवा निमशासकीय जागा असतील, आपलं आघाडीचे सरकार आल्यानंतर या सगळ्या जागा भरल्या जातील. अशाही प्रकारची भूमिका घ्यावी लागणार आहे. आणि आपण ती घेऊ. जाहीरनामा देत असताना हे जे काही प्रश्न आहेत, त्यात लोकांचे जे प्रश्न आहेत, त्यामध्ये लोकांचा विश्वास संपादन करू, अशी अपेक्षा या वर्धापनदिनानिमित्त व्यक्त करतो.



# लोकसभेच्या पराभवाचा बदला घ्यायचा आहे

## विधान परिषद विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांचे उद्गार


2019 च्या निवडणुकीनंतर आपण आपल्या पक्षाचा विसावा वर्धापनदिन साजरा करत आहोत. देशात अनेक पक्ष स्थापन झाले, पण पक्षाच्या स्थापनेपासून त्यांचा आणि सत्तेचा कधी संबंध आला नाही. पण, आदरणीय पवारसाहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची स्थापना केली आणि स्थापना झाल्यानंतर लगेचच आपला पक्ष राज्यात सत्तेत आला. आणि स्थापना झाल्यानंतर लगेच आपला हा पक्ष देशातही सत्तेत आला. 20 वर्षांचे जर सिंहावलोकन केले तर या वीस वर्षामध्ये पंधरा वर्षे आपण राज्यात सत्तेवर होतो. आणि देशात 10 वर्षे आपण सत्तेत होतो. 2019 च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर संबंध राज्यभरातील आपल्या पदाधिकाऱ्यांचे, सहकाऱ्यांचे ज्यावेळी फोन येत होते, एकंदर निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाच नाही तर विरोधी पक्षाचा कार्यकर्ता कुठं तरी खचल्याचे आपल्याला पहायला मिळाले. आज विसाव्या वर्धापनदिनानिमित्ताने ज्यावेळी मला बोलायला सांगितले, त्यावेळी आपणास एवढेच सांगू इच्छितो की, आदरणीय साहेबांमुळे आपल्याला 15 वर्षे राज्याची सत्ता मिळाली. 10 वर्षे आपल्याला देशाची सत्ता मिळाली. पण, आज जे सत्तेत आहेत, लोकसभेच्या निवडणुकीत ज्यांनी आपल्याला हरवले, तेही किती वर्षे विरोधी पक्षात होते, याचाही आपण सर्वांनी विचार करणे गरजेचे आहे. 40-40, 50-50 वर्षे विरोधात राहून जर आज एखादा पक्ष सत्तेत आला असेल, तर 20 वर्षांच्या आपल्या पक्षाने 15 वर्षे राज्याची आणि 10 वर्षे देशाची सत्ता आपण पाहिली आहे. जनतेची सेवा केली आहे. त्या पक्षाने खचून न जाता नव्याने उभारी घेऊन विधानसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नंबर एकचा पक्ष म्हणून स्वप्न पाहण्याची गरज आहे. आणि हे स्वप्न यापूर्वी पूर्ण झाले. या पूर्वीही महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वाधिक आमदार निवडून आलेले आहेत. मला एक क्षण आठवतो. कदाचित

या कार्यक्रमाच्या निमित्ताने बोलावा की न बोलावा, पण तो माझ्या मनात आहे. भाजपचे फक्त दोन खासदार होते आणि त्यांचे आज 303 खासदार निवडून आले आहेत. कसे का आले असेना, पण देशाच्या संसदेमध्ये 303 खासदारांची संख्या भाजपची आपल्याला पहायला मिळत आहे. पण, हा 303 चा पल्ला गाठताना फक्त दोन खासदार असताना अटलजी आणि अडवाणीजींनी पक्ष चालवला, पण ते खचले नाहीत. अनेक निवडणुका गेल्या आणि निवडणुकीचे विश्लेषण अशा पद्धतीने करायचे, की 23 नंतरचा बराचसा काळ आपल्याला



मिळाला. आपणही त्याचा अभ्यास करत होतो. मीही काही जुन्या आठवणी गोळा करत होतो. त्यावेळी भाजप हरल्यानंतर टीव्हीवर येऊन विश्लेषण करताना होते, हो आम्ही हरलो. पण, आमची अर्ध्या टक्क्यांनी मताची टक्केवारी वाढली आहे. एक काळ होता की, अर्ध्या टक्क्यांनी मताची टक्केवारी वाढली की भाजप समाधानी होते. आणि आजचा काळ आहे की, भाजप सत्तेसाठी पिसाटली आहे. त्यामुळे आपल्या सर्वांनी लोकसभेच्या पराभवानंतर अतिशय चांगली उभारणी घेतली पाहिजे. आणि ती संधी आपल्याला आहे, कारण लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांपासून दिल्लीतील कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास एवढा वाढला की, त्या अतिआत्मविश्वासाचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी येणाऱ्या विधानसभेवेळी नक्कीच घेऊ शकेल.

अनेक जणांचे म्हणणे आहे की, लोकसभेच्या या निवडणुकीत काही निकाल असे लागले आहेत की, ते निकाल आपल्या कोणालाही मान्य नाहीत. मी बाहेरचे कुठले उदाहरण देणार नाही, पण मी बीड जिल्ह्याचे उदाहरण देईल. आष्टी तालुक्यामध्ये धानोरे नावाचे गाव आहे. मोठं गाव आहे. साडेतीन हजार मतांची संख्या आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थापनेपासून 2017 च्या जिल्हा परिषद निवडणुकीपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत किती आले आणि किती गेले, त्याचा परिणाम त्या धानोरा गावाला झाला नाही. पण, भाजपला त्या धानोरा गावात कधीही तीनशेवर मतं मिळाली नाहीत, पण, या निवडणुकीत त्या धानोरा गावात भाजपला 1200 मतांचे मताधिक्य मिळावे, हे विश्वास बसण्यासारखे नाही. एका आष्टीसारख्या मतदारसंघात 70 हजारांचे मताधिक्य आहे. कशामुळे मिळते. हे विश्वास बसण्यासारखे नाही. प्रत्येक सर्वेमध्ये, त्यामध्ये आपण केलेल्या सर्वेमध्ये असेल किंवा इंटिलिजन्सकडून आलेली माहिती असेल, त्यामध्ये माजलगाव असेल, बीड असेल, केज असेल, गेवराई असेल, या तीनही मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुढे असताना जेवढ्या मतांनी आपण पुढे दाखवले गेलो होते, तेवढ्याच मतांनी आपण मागे गेलो, हे मात्र आम्हाला आणखीही लक्षात येत नाही. निकालानंतर जवळजवळ 200 गावात आम्ही फिरलो. आम्ही विचारले, असं का केले, तर लोकं म्हणतात की,







आम्ही हे केलेच नाही. आता त्यावर काय निर्णय घ्यायचा आहे, त्याबाबत साहेब आपल्या समोर आहेत, पक्षाने भूमिका घ्यावी. पण, मतदारांचे असं म्हणंण आहे की, हा भाजपच्या विचारांचा विजय नाही, तर हा भाजपच्या ईव्हीएमचा विजय आहे.

हे लोकसभेला झाले, पण असे विधानसभेला होईल, असा समज आपण क्षणापुरता ठेवावा. पण, विधानसभेला ईव्हीएमचे काय होईल. आजपासून आपल्याला 90 दिवसांचा वेळ मिळाला आहे. या 90 दिवसांत जर आपण रात्रीचा दिवस केला. आणि आपल्या पक्षाचा विचार जर सर्वसामान्य मतदारांकडे घेऊन गेलो, भले आज आपण साधनांनी कमी असो, भले आपण प्रत्येक गोष्टीला कमी असू. पण आदरणीय पवारसाहेबांचा आणि शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार एवढा मोठा आहे, ज्या विचारावर आपण येणारी 2019 ची निवडणूक आपण जिंकू शकतो.

पण आपल्यातीलच काही अशी चर्चा करताना पाहिले आहे की, लोकसभेचा निकाल लागला, पुन्हा मोदी आले, आता काय खरे आहे. ही चर्चा आपण करण्यापेक्षा ही चर्चा भाजपच्या वॉररूमकडून आलेली आहे. देशात आम्ही पुन्हा आलो, महाराष्ट्रात आम्ही पुन्हा येऊ. पण, वस्तुस्थिती तशी नाहीये. एकीकडे आपण ईव्हीएमचा विचार केला असला तरी, दुसरीकडे विचार करावा लागेल की, मतदानानी, जे काही भाजपला मतदान इमानेइतबारे पडले असेल ते तिथला उमेदवार चांगला असेल म्हणून पडले नसेल तर देशाचे नेतृत्व आणि देशाच्या नेतृत्वापुढे कोणी पर्याय नाही, म्हणून या लोकांनी केले आहे. हे आपल्याला विसरून चालणार नाही. तसं आपल्या राज्याचे नेतृत्व आहे का त्यांच्याकडे. त्या नेतृत्वाने शाहू, फुले, आंबेडकर विचार पराभूत होऊ शकतो का, याचा विचार आपण केला पाहिजे. म्हणून हा 90 दिवसांचा काळ, ज्या साहेबांनी आपल्याला या 20 वर्षाच्या काळात 15 वर्षे राज्यात सत्ता दिली आणि 10 वर्षे देशात सत्ता दिली. आणि जनसामान्यांचे काम करण्याची संधी दिली. आज त्या साहेबांची अपेक्षा आहे की, येणाऱ्या 19 च्या निवडणुकीत साहेबांची माझ्यासह आपल्या सगळ्यांकडे काय अपेक्षा असेल, अतिशय प्रतिकूल परिस्थितीही आपल्या 2019 ची विधानसभेची निवडणूक जिंकायची आहे आणि ती कसल्याही परिस्थितीत जिंकून आपल्याला लोकसभेच्या पराभवाचा बदला घ्यायचा आहे.

तू दौडमध्ये अव्वल आए ये जरुरी नही
तू दौडमध्ये अव्वल आए ये जरुरी नही
तू सबको पीछे छोड दे ये भी जरूर नही
जरुरी है तेरा दौड में शामील होना
जरुरी है तेरा दौड में शामील होना
जरुरी है तेरा गिरके फिरसे खडे होना
जिंदगी में इम्तिहान बहोत होगे
आज जो आगे है
वो कल पीछे होंगे
बस, बस तू चलना मत छोडना
बस तू लढना मत छोडना




पक्षाला वीस वर्षे पूर्ण होत असताना एक मागोवा घेत असताना आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे की, आपला पक्ष दर वर्षापनदिनाला एक आगळीवेगळी संकल्पना घेऊन आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने काम करण्याची भूमिका घेतो. मला आठवतय की, मुंबईमध्ये पहिल्यांदा मागासवर्गीय समाजासाठी हक्काची पहिली सनद ही जर पहिली भूमिका कोणी घेतली असेल तर, आणि मला आनंद आहे की, महाराष्ट्राच्या सामाजिक न्याय विभागाला असलेल्या राखीव टक्केवारीची रक्कम राखीव ठेवायला पाहिजे होती, ती ठेवली जात नव्हती. अर्थमंत्री जयंत पाटीलसाहेबांनी त्या काळात पुढाकार घेतला. आणि मला सांगायला अभिमान आहे की, अजितदादा पवारांच्या नेतृत्वाखाली चार हजार कोटी रुपये आणि नंतर दोनदा पाचशे कोटी रुपये म्हणजे पाच हजार कोटी रुपये त्या समाजाच्या उन्नतीसाठी राखीव ठेवण्याचे काम त्यांनी केले. त्यातून त्या समाजाला न्याय देण्याची भूमिका आपण त्या ठिकाणी घेतलेली आहे. आज त्या समाजालाही दिशाहीन करताना काही मंडळी दिसत आहेत. काही लोक त्याला वंचित असा उल्लेख करत असतात. पण, मला आवर्जून उल्लेख करून सांगावे लागेल की, 15 वर्षांच्या राज्य सरकारने या वंचित समाजाला न्याय देण्याचे काम जर कोणी केले असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस आघाडीच्या सरकारने केलेले आहे. ते कोणी नाकारू शकत नाही.

आजचा हा दिवस जलसंकल्प दिन म्हणून साजरा करण्याची आपण भूमिका घेतलेली आहे. आणि अजून मला सांगायला आनंद आहे की, आपण केवळ भूमिका घेतलेली नाही, तर जे दुष्काळामध्ये होरपळले गेले आहेत, त्या शेतकरी बांधवांना कुठं तरी मदतीचा हात द्यायला पाहिजे. आणि म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस आणि विशेतः मुंबईकरांनी त्यांना मदतीचा हात देण्याची भूमिका घेतली. सर्व महानगरपालिकांतील प्रतिनिधींनी आपला एक महिन्यांचा पगारही पक्षाकडे सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला. आणि त्यातून त्यांना मदत देण्याची भूमिका घेतली. कुलाब्यासारख्या तालुक्याने तर बीडमध्ये जाऊन निव्वळ पाण्याची टाकीच नाही तर त्यामध्ये त्या काळात पाणी कसे उपलब्ध करून देता येईल, ती काळजी घेतली. विशेषतः मुंबई राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जिकडे चारा उपलब्ध होत नव्हता, कोल्हापूर

# लाटेपेक्षा विकासाच्या वाटेवर निवडून येऊ

## सचिन अहिर यांचे सूतोवाच



वगैरे ठिकाणाहून चारा उपलब्ध करून त्यांना न्याय देण्याचे काम आपण केले. विशेषतः ग्रामीण भाग सोडून जे मुंबईत आले होते, घाटकोपरसारख्या, सायनसारख्या परिसरात त्यांना जेवण उपलब्ध करून देण्याची भूमिका घेतली. याचा अर्थच असा आहे की, शासनामध्ये आपण असो किंवा नसो, पण ज्यावेळी शेतकरी अडचणीत असेल, त्याच्यासाठी धावून येणारा पक्ष हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच आहे. हे सिद्ध करण्याची भूमिका आपण घेतली आणि आपण हे पाहिले असेल की, आपले नेते आदरणीय पवारसाहेबांनी निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी सर्व काम सोडून, ज्यावेळी आपण सर्व निवडणुकीच्या धामधुमीनंतर आराम करण्याची भूमिका घेत होतो, त्यावेळी पवारसाहेबांनी दुष्काळ भागात दौरा केला. आणि आम्ही शेतकऱ्यांच्या पाठिशी अशा पद्धतीने खंबीरपणे उभे आहोत, हे दाखवून देण्याची भूमिका त्यांनी घेतलेली आहे.

आज आपण एकविसाव्या वर्षात पदार्पण करत आहोत. आजचा दिवस हा संकल्प घेण्याचा दिवस आहे. आणि म्हणून मी आपल्या सर्वांना आवाहन करतो की, येणाऱ्या काळात आपल्यासमोर राजकीय अडचणी जरी येत असतील, तरी आपण संघर्ष करण्याची भूमिका जर घेतली, तर मला आत्मविश्वास आहे की, 15 वर्षात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केलेली कामे आहेत, त्याची कुठल्याही प्रकारे तोड होऊ शकत नाही. विशेषतः मुंबईचा आपण ज्यावेळी आढावा घेतो, त्यावेळी ईस्टन फ्री वे असेल, मोनोरेल असेल, त्यावेळी पाचही वर्षात आपण तो रेल करण्याची भूमिका घेतली, पण पाचही वर्षात ती रेल एकदाही सुरू झाली नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आपण आंदोलन केले, लोकांना जागृक केले आणि प्रशासनावर दबाव आणला. आज मला सांगण्यास आनंद आहे की, ती मोनो रेल आपल्या सर्वांच्या आग्रहामुळे सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाला घ्यावा लागला आहे. मेट्रोची संकल्पना असेल, कोस्टलची संकल्पना असेल, एअरपोर्ट असेल, नागरी सुविधा देण्याची भूमिका आपण त्या ठिकाणी घेतली.

आणि म्हणून मला एवढंच सांगायचे आहे की, काही लोकं लाटेच्या जिवावर निवडून येतात. राष्ट्रवादी काँग्रेसने आपण कार्यकर्त्यांच्या माध्यमातून संकल्प करूयात, आम्ही लाटेच्या वाटेवर नाही, तर विकासाच्या वाटेवर निवडून येऊ. निवडून येण्याची भूमिका घेऊन तुम्ही आम्ही काम केले पाहिजे. लोकसभेचे निकाल काय झाले, काय आकडे आले, त्यापेक्षा भविष्यकाळामध्ये लोकांपर्यंत अजून कसं पोचता येईल, आपण केलेली कामे लोकांपर्यंत अजून कशी पोचवता येईल, या दृष्टीकोनातून तुम्ही मी जर संकल्प केला, तर निश्चितपणाने खात्री आहे की, 20 वर्षे पूर्ण झाल्यानंतर ज्यावेळी आपण 21 वा वर्धापनदिन या ठिकाणी साजरा करू त्यावेळी अजितदादांच्या नेतृत्वाखाली तुम्ही आम्ही शासनामध्ये गेल्याशिवाय राहणार नाही. हा आत्मविश्वास या ठिकाणी व्यक्त करतो.



# राष्ट्रवादीचे धर्मनिरपेक्ष विचार घराघरात पोहोचवा

**चित्रा वाघ**

आपण या वीस वर्षांतील 15 वर्षे सत्तेत होतो. लोकांसाठी अनेक कल्याणकारी योजना आणल्या. पाच वर्षे विरोधात बसलो. सतत रस्त्यावर उतरून लोकांचा आवाज बनण्याचा प्रयत्न केला. 80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण करा, असं आपल्या सर्वांनाच साहेबांचे सांगणे असतं. आणि त्यानुसार मुंबईसह संपूर्ण राज्यात काम चालू होते. कोणासाठी आपण काम नाही केले. युवक असतील, विद्यार्थी असतील, आदिवासी असतील, कष्टकरी असतील, या सगळ्यांसाठी समाजातील सगळ्यांसाठी काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केले. लोकांचा आवाज बनून आपण रस्त्यावर आलो. आंदोलने केली. मोर्चे केले. जनतेचा आवाज सरकारपर्यंत पोचविण्याचे काम निश्चितपणे आपण गेल्या पाच वर्षात केले आहे. लोकसभेचा निकाल आला. आपल्याला अपेक्षा होत्या. हा निकाल आपल्याला स्वीकारता येत नव्हता. आजही लोकांमध्ये चर्चा ऐकायला मिळते की, अरे यांना मते दिली कोणी. काम तर तुम्ही केले, काम आम्ही केले. आपण लोकांपर्यंत पोचलो. लोकांचा आक्रोश आपण सगळ्यांनी पाहिला आहे. महिलांचा आक्रोश पाहिला आहे, महागाईवरचा. महिलांची असुरक्षितताही पाहिली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या पाहिल्या. कधी नव्हे ते गेल्या पाच वर्षात सर्वांत जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. आणि जर इतका आक्रोश आणि इतका जर असंतोष असेल, तर या लोकांना मतदान केले कोणी, ही चर्चा दबक्या आवाजात चालू आहे. ठीक आहे, आपण ते मान्य केले आणि पुढे जात आहे. साहेबांनी त्यावर भाष्य केले, नेत्यांनी भाष्य केले. आणि आज आपण पुढे जात आहे. पुढे येणाऱ्या दिवसात आपल्याला काम करायचे आहे. राष्ट्रवादी पक्षाला पुन्हा पहिल्या नंबरवर आणून ठेवायचे काम हे तुमचं आणि माझं काम आहे. राज्यामध्ये फिरत असताना वेगवेगळ्या ठिकाणी सभा होत होत्या. युवकांनी यामध्ये फार मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. जवळपास तीनशे- साडेतीनशे चौक सभा घेण्यात आल्या. येथे गिरी बसला आहे, त्याचे भाषण मी ऐकले. स्टेशनच्या बाहेर आपली 5- 10 मुले होती. आणि तो तिथे बोलत होता. लोकं जमा होत होती. कुठल्या पक्षाची ती माणसं नव्हती. ती लोकं येत होती, ऐकत होती आणि त्या सगळ्या गोष्टी त्यांना पटत होत्या. हे बरोबर आहे, त्यांचे चुकीचे चाललेले आहे. बेरोजगारी वाढली, मान्य. महागाई वाढली, मान्य. आत्महत्या झाल्या, मान्य. महिलांवर अत्याचार झाले, मान्य. जर हे सगळे मान्य असेल तर आता जे निवडणुकीचे निकाल आले आहेत, ते सगळे अनाकलनीय आहेत. मला म्हणायचे आहे की, आता आपल्याला विधानसभेसाठी तयार व्हायला पाहिजे. 1952 पासून आतापर्यंतच्या लोकसभेच्या निवडणुकीत

सर्वांत जास्त महिला मतदार या आताच्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी होत्या. त्या मतदार कशा काय भूलल्या, याचा आपल्याला अभ्यास करायला पाहिजे. ज्या काही सरकारच्या योजना येतात, त्यांचा पर्दाफाश करण्याचे काम तुम्हाला आणि आम्हाला करायला लागेल. आम्ही दुष्काळात गेलो, त्या ठिकाणी महिलांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी महिलांनी सांगितले की, जे कोणी लाभार्थी आहेत, त्यांना मोदी साहेबांच्या ऑफिसमधून, त्यांच्या पक्षाच्या ऑफिसमधून सतत फोन येत होते. उज्ज्वला गॅस योजना, सौभाग्य योजना, भाग्यश्री योजना, पंतप्रधान आवास योजना, या योजनांचे जे कोणी लाभार्थी होते, त्यात सतत संपर्क केला गेला. पण, या योजना कशा फसव्या आहेत, हे आपल्याला घराघरांत जाऊन सांगावे लागेल. येणाऱ्या काळात आपला लढा आणखी तीव्र करायचा आहे, हे महिला भगिनींनी लक्षात ठेवले पाहिजे. 18 किलोचा गॅस सिलिंडर आता 5 किलोचा आणण्याचा त्यांचा विचार आहे. तो महिनाभर पुरणार नाही. हे लक्षात घ्या. लोकांना पुन्हा एकदा फसवायचे काम चालू केले आहे. पाच किलोचा सिलिंडर तीनशे रुपयाला देण्याचे काम हे सरकार आतापासून करणार आहे. हे तुम्हाला आणि मला घराघरांत जाऊन सांगावे लागणार आहे. वाईट या गोष्टीचे वाटते की, महिलांना राजकारणात आणणारे कोण, तर पवारसाहेब. महिला धोरण कोणी आणले, साहेबांनी. महिला आरक्षण कोणी आणले, साहेबांनी. घराघरांत जाऊन या गोष्टी सांगाव्या लागणार आहेत. आणि याच्यासाठी तुम्हाला आणि आम्हाला कंबर कसून कामाला लागावे लागणार आहे.

खरं तर निकाल लागला. आपण सगळे घरी होतो. काय करायचे, हे समजत नव्हते. दुसऱ्या दिवशी टीव्ही लावला, तर आपले पवारसाहेब हे चारा छावण्यांवर होते. तिथे गेले, लोकांचे प्रश्न समजून घेतले. साहेब तुमचे धन्यवाद मानायचे आहेत, कारण आमच्या महिलांची मागणी होती की, शेळ्या, मेंढ्यानाही तिथे जागा उपलब्ध करून द्या. आपण सातत्याने पाठपुरावा केलात आणि मुख्यमंत्र्यांशी या विषयावर बोललात. त्यामुळे त्या ठिकाणी गावातील शेळ्या, मेंढ्यानाही चारा छावणीत जागा देण्याचे काम झाले आहे. आणि चारा छावणीचे अनुदान आहे, तेही वाढवून मिळाले आहे. म्हणजे पुन्हा एकदा प्रश्न येतो की, सत्तेत असूदे किंवा नसूदे संकटकाळी कोण धावून येणार आहे, तर ते नाव आहे, आपले नेते शरदचंद्रजी पवारसाहेब. साहेब, आम्हाला तुमचा अभिमान आहे की, आम्ही तुमचे कार्यकर्ते आहोत. आता हताश न होता, पुन्हा कामाला लागायचे आहे. घराघरांत जाऊन राष्ट्रवादीचे विचार पोचवायचे आहेत. घराघरांत जाऊन पवारसाहेबांचे विचार पोचवायचे आहेत. अविरतपणे आपण 20 वर्षे हे काम केले. थोडेच दिवस राहिलेत. 100 दिवसांपेक्षा कमी दिवस आता विधानसभेला राहिले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा सगळे झटून काम करूयात आणि पुढच्या वर्षी वर्धापनदिनाला दादा आणि आपले सर्व सन्माननीय आमदार त्या ठिकाणी बसलेले दिसतील, एवढीच अपेक्षा व्यक्त करते.


मुख्यमंत्री महिलांच्या डोक्यावरचा हंडा उतरविणार होते. काय झाले त्या घोषणेचे? आता उलट हंड्यावर हंडा चढला आहे.



# फुले, शाहू आंबेडकर विचाराने लढाई जिंकायची

## नवाब मलिक

पवारसाहेबांनी ज्या उद्देशाने पक्षाची स्थापना केली होती, की राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फक्त राजकारण करणार नाही, तर समाजकारणाचीही जबाबदारी घेणार आहे. गेल्या 20 वर्षात पक्षाने त्याच दिशेने काम केले आहे. पक्षाने ठरवले की, आजचा दिवस जलसंकल्प दिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात साजरा करावा आणि त्यासाठी संपूर्ण राज्यात तो साजारा होतोय आणि मुंबईत आपण या ठिकाणी एकत्र जमलो आहोत. पाणी ही समस्या सर्व जगातच होत आहे. आज देशातील 40 टक्के भागावर पाण्याचे संकट आहे. दुष्काळाची परिस्थिती आहे. महाराष्ट्रातही तिच स्थिती आहे. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र मोठा दुष्काळ सहन करत आहे. आजचा कार्यक्रम मुंबईत होत आहे. लोकं विचार करत असतील की, मुंबईत हा जलसंकल्प दिनाचा कार्यक्रम का होत आहे. मुंबईतही आपण पाणी पितो. नळाने आपल्या घरात पाणी येते. पण, मुंबईच्या बाहेरून हे पाणी आपल्याला आणावे लागते. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते म्हणून आपल्याला संकल्प घ्यावा लागेल की, जर गावेच्या गावे उद्ध्वस्त करून मोठाली धरणे बांधून पाणी देण्याचे काम सरकारकडून होत आहे, तर येणाऱ्या काळात हे पाणी आपल्याला पुरे पडेल का, याचाही विचार करावा लागेल. त्यामुळे मुंबईच्या कार्यकर्त्यांना विचार करावा लागेल की, आपण आपल्या आचरणातून पाणी कसे वाचवणार. त्याची सुरवात आपल्या घरातून सर्व कार्यकर्त्यांनी केली पाहिजे. ज्या भागात आपण राहतोय, तिथे याचा प्रचार केला पाहिजे. मुंबईला वेगवेगळ्या धरणांतून पाणी मिळत आहे. त्यामुळे जेथे या पाण्याची नासाडी होत असेल, तिथे आपल्याला लढा उभारावा लागेल. मुंबईत आपण पाहतो की, महापालिकेच्या अनेक जलवाहिनी अशा आहेत की, ज्यातून पाण्याची गळती होत असते. आपण पाहूनही त्याकडे दुर्लक्ष करतो. पण, आपल्या कार्यकर्त्यांनी जिथे पाण्याची गळती होत असेल, ती रोखण्याची लढाई या मुंबई शहरात सुरू करावी. ती जबाबदारी कार्यकर्त्यांनी घ्यावी. मुंबई शहरात अनेक ठिकाणी जे पाणी आपण पिण्यासाठी वापरतो, तेच पाणी शौचालयासाठीही वापरले जाते. महापालिकेने नियमावली केली आहे की, रेनहार्वेस्टिंग करून ते पाणी शौचालयासाठी वापरावे, पण मोठ्या प्रमाणात ते झालेले नाही. त्यामुळे आपली सोसायटी किंवा मोहल्ल्यात त्याची जबाबदारी पक्षाने दिलेली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी निश्चितपणाने घ्यावी. त्यातून मुंबईत बदल घडेल.

आज आपल्याला वीस वर्षे झाली. गेल्या वीस वर्षात आपण काय कमावले आणि काय गमावले, याचा हिशोब होत आहे. पण, आपल्याला समजून घ्यावे लागेल की, वीस वर्षातील 15 वर्षे आपण महाराष्ट्राच्या सत्तेत होतो. वीस वर्षातील 10 वर्षे

आपण केंद्राच्या सत्तेत होतो. पक्षाच्या स्थापनेनंतर 15 वर्षे सत्तेत राहिल्यानंतर महाराष्ट्रातील जनतेची जी सेवा करायची होती, ती आपण केली. पण, आपले जे विरोध होते, ते 15 वर्षे विरोधात बसले होते, तरी ते निराश झाले नाहीत. त्यांनी आपल्याला बदनाम करण्याचे काम केले. आपला पक्ष आणि आपले नेते कसे बदनाम होतील, त्याचा त्यांनी प्रचार केला आणि आपण जे चांगले काम केले होते, ते लोकांपर्यंत पोचविण्यात आपण कमी पडलो आणि पाच वर्षांपूर्वी आपण सत्तेतून बाहेर पडलो.

लोकसभा निवडणुकीचे निकाल आले. त्यात भाजप आणि शिवसेनेचे लोकं जिंकले असे नाही. देशात मोदींचे सरकार आले म्हणजे विरोधी पक्षाला काय मते मिळाली नाहीत. भाजपचे काही उमेदवार 80 मतांनी, दोन हजार मतांनी निवडून आले. विरोधी पक्षाची लोकं जनतेला समजविण्यात अपयशी ठरली. देशाची आपण चर्च करायला नको. महाराष्ट्रात 55-60 टक्के मतदान झाले. त्यात 40 टक्के लोक अशी आहेत की, ज्यांनी शिवसेना-भाजपसह आपल्यालाही मतदान केले नाही. आपल्याला निराश होण्याची गरज नाही. कारण, गेल्या पाच वर्षात परिवर्तनाच्या लढाईसाठी आपण प्रयत्न केले. लोकसभा निवडणुकीपूर्वी फार वेगळे वातावरण होते. पण, पुलवामा आणि बालाकोटनंतर वेगळ्या प्रकारचा प्रचार भाजपकडून केला गेला. त्याचा लाभ त्यांना मिळाला आहे.

आपली जबाबदारी आहे की, आगामी निवडणुकीसाठी आपल्याला तयारी करावी लागणार आहे. आपण निराश आणि हतबल होण्याची गरज नाही. पवारसाहेबांसमोर एक गोष्ट ठेवू इच्छितो की, 1999 मध्ये लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एका वेळेस झाल्या होत्या. मी नेहरूनगरमधून निवडणूक लढत होतो. लोकसभेसाठी मनोहर जोशीसाहेब लोकसभेचे शिवसेनेचे उमेदवार होते. विधानसभेला शिवसेनेचा साळवी नावाचा उमेदवार होता. त्यावेळी 35 हजार मते शिवसेनेच्या विधानसभेच्या उमेदवाराला मिळाले होते, तर लोकसभेच्या उमेदवाराला 51 हजार मते मिळाली होती. आपल्या लोकसभेच्या उमेदवाराला 31 हजार मते मिळत आहेत आणि नवाब मलिकला 52 हजार मते मिळत आहेत, म्हणजे एकाचवेळी लोकांनी मतदान करताना वेगवेगळा विचार करण्याचे काम केले. लोकसभेच्या निवडणुकीची गणिते वेगळी असतील. पण मला वाटते की, आपण येणाऱ्या निवडणुकीला पूर्ण ताकदीने जाण्याचे काम केले पाहिजे. भाजपने या देशात खोट्या राष्ट्रभक्तीच्या नावावर लोकांना भडकविण्याचे काम केले आहे. पण, आपल्या पक्षाचे नाव राष्ट्रवादी आहे.



आपल्या देशाच्या संविधानाप्रमाणे राष्ट्रवादी धर्मनिरपेक्ष स्वातंत्र्यांची लढाई लढत आहे. तेच आपल्याला मोठ्या ताकदीने लोकांपर्यंत घेऊन जायचे आहे. भाजप धर्माच्या नावावर लोकांच्या भावनेशी खेळण्याचे काम करत आहे. जातीच्या नावावर लोकांना फसवण्याचे काम करत आहे. आपली जबाबदारी आहे की, आपण पूर्ण ताकदीने आपली विचारधारा लोकांपर्यंत घेऊन जाऊ. आपण ज्या पद्धतीने राजकारण करू पाहत आहोत की, लोकांना धर्म, जात, प्रांत यांच्यापासून दूर करून एक करण्याचे काम करत आहोत. सशक्त भारत हा विचार घेऊन आपण काम करत आहोत, तेच घेऊन आपल्याला लोकांपर्यंत जायचे आहे. काही लोक धर्माच्या नावावर फसवणूक करत आहेत. मुसलमानांमुळे या देशाला धोका निर्माण झाला आहे, असं सांगितले जात आहे. आपल्याला जाऊन सांगायला लागेल की, जर एखाद्या गावात मुसलमानांची 10 घरे आहेत, त्यामुळे इतर एक हजार घरांना धोका निर्माण होणार नाही. हे लोकांना समजून सांगण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. समाजातील जे कमजोर घटक आहेत, त्यांना ताकद देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कटीबद्ध राहिलेली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आपले नेते पवारसाहेबांनी हाच विचार समोर ठेवण्याचे काम नेहमी केलेले आहे. समाजातील छोट्या छोट्या घटकांना जोडण्याची जबाबदारी आपल्याला घ्यावी लागणार आहे. शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा समतेचा समाज, जेथे आर्थिक विषमता नसेल, सामाजिक विषमता नसेल, अशा प्रकारची विचारधारा घेऊन आपल्याला लोकांपर्यंत जावे लागणार आहे. भाजपचे राजकारण काय आहे, ते कोणत्या दिशेने राजकारण करू पाहत आहे. भाजपचे, आरएसएसचे संस्थापक हेगडेवार होते, त्यांची विचारसरणी काय होती, गोळवलकर कोणत्या विचारधारेला पुढे घेऊन जात होते. भाजपच्या स्थापनेमागे जे संघ विचाराचे लोक आहेत, ते कोणती विचारधारा पुढे घेऊन जाऊ पाहत होते. आपली जबाबदारी आहे की, या देशात लोकं सावरकर, हेगडेवार, गोळवलकरच्या विचारधारेने राजकारण करत आहेत, तर आपण शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारधारेने करत आहोत. त्यातून ही लढाई जिंकण्याची आपली ताकद आहे. आपली जबाबदारी आहे की, वैचारिकदृष्ट्या आपल्याला ही लढाई जिंकायची आहे. याच विचाराने आपण भविष्यकाळात राजकारण करणार आहोत. पवारसाहेबांनी आपल्याला सांगितले आहे की, निवडणूक असेल तर राजकारण करायचे आणि निवडणूक नसेल तर समाजकारण करायचे. लोकांच्या सुख-दुःखाचे साथीदार व्हायचे, याच रुपाने आपण येणाऱ्या दिवसात काम करणार आहे.



# पवार साहेबांना ऐंशी आमदारांची भेट देऊ...

## खासदार माजिद मेमन

एक मोठे आव्हान आपल्यासमोर आहे, आपला मागच्या 20 वर्षांचा प्रवास कसा झाला, याचा आढावा घेण्याची वेळ आलेली आहे. 20 वर्षात आपण अनेक चढउतार पाहिले, आपण कोठे कमी पडलो, आपण कुठे ताकद मिळवली आणि आपण आपल्या पक्षाला कसे मजबूत ठेवले, किती तरी वादळं आली. ज्यावेळी 1999 मध्ये पवारसाहेबांनी या पक्षाची स्थापना केली होती, त्यावेळी लोकांचे हे म्हणणे होते की, काँग्रेसपासून दूर जाऊन कोणी वाढू शकत नाही. दोन वर्षे, पाच वर्षे, 10 वर्षांनी तो पक्ष संपतो किंवा काँग्रेसमध्ये पुन्हा विलीन होतो. पण, आपण 20 वर्षांची प्रवास केला. आपली सर्वात मोठी शक्ती ही आहे की, आपण एक महान नेत्याबरोबर पाऊल टाकले. महाराष्ट्रात असेल आणि देशातही आपण सुरवातीपासून एक राष्ट्रीय पक्ष म्हणून पुढे आले आहोत. तुम्हाला माहिती असेलच की, आपल्या स्थापनेनंतर आपल्यासमोर निवडणुकीचे एक आव्हान पुढे आले. त्यावेळी आपण आपल्या ताकदीने लढलो. हा इतिहास आहे आणि तो कायम राहणार आहे की, कोणताही पक्ष आपल्या स्थापनेनंतर लगेच निवडणुकीला सामोरे जाऊन राज्यात पहिल्या नंबरवर आलेले. काही तरी विशेष नक्कीच असणार की, एखादा राजकीय पक्ष आपल्या निर्मितीनंतर लगेचच पहिल्या नंबरवर आला. पण, आपण त्या आपल्या पहिल्या नंबरला सांभाळू शकलो नाही. त्यानंतरच्या निवडणुकीत आपण दुसऱ्या नंबरवर गेलो, कधी तिसऱ्या नंबरवर गेलो. पण आज देशाचीच परिस्थिती अशी आहे की, मी ती इथे सांगू इच्छित नाही. आपल्यासमोर एक आव्हान आहे. 20 वर्षांचा कार्यकाळ हे एक मैलाच दगड आहे. आणि आज आपल्याला हा विचार करण्याची गरज आहे की, आपण कोठे कमी पडलो. देशात असे काही चित्र आहे की, निवडणुकीचा निकाल 23 मे रोजी लागलाय आणि आज आपण 10 जूनला आहे. जवळपास तीन आठवडे झाले, लोकं नाराज आहेत. दिल्लीमधील पण, मुंबईतील पण देशात सगळीकडेच, लोक चर्चा करत आहेत, माहिती घेत आहेत की, नक्की काय झाले. लोकं एवढी नाराज होती, पण निकाल त्यांच्या बाजूने कसा काय गेला.

आता महाराष्ट्राचे फार मोठे आव्हान आपल्या समोर आहे. आपल्याकडे वेळ नाही. पवारसाहेबांशी मी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, देशातील निकालाची ही काय परिस्थिती आहे, हे आपण जरा बाजूला ठेवू. आपल्याकडे आता वेळ नाही. एक एक मिनीट आपल्यासाठी मौल्यवान आहे. कसबसे 95 -97 दिवस आपल्या हातात आहेत. आपल्याला ते आव्हान स्वीकारून 1999 च्या निवडणुकीची आठवण ठेवायची आहे. आपण परत पहिल्या नंबरवर येऊ शकतो.

कठीण आहे. पण, अशक्य नाही. आपले 75- 80 आमदार विधानसभेत पाहिजे. कंबर कसून तयार व्हा. महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीशी आपल्याला संपर्क करायचा आहे. शरद पवारांच्या उंचीच नेता कोणीही नाही, हे सर्व महाराष्ट्र जाणून आहे. अशा नेत्याचे कार्यकर्ते आणि त्यांच्यासोबत काम करणारे आपण त्यांच्या उंचीप्रमाणे जर आपण त्यांना निकाल देऊ शकत नाही, तर तो आपला पराभव आहे. आणि तो पराभव आपण स्वीकार करणार नाही. आपल्याला शरद पवारसाहेबांच्या वाढदिवसाप्रमाणे 79 आमदार भेट द्यायचे आहेत. पण, मला वाटतंय, आपण शंभरचे लक्ष ठेवू. कारण, आपल्या वाट्याला 130 पेक्षा जास्त जागा येणार नाहीत. काँग्रेससोबत आपण जाणार आहोत. आपल्या समोर निराशा हिच आहे की, मोदीची लाट काय परत एवढी चालली होती. आपण कमी पडलो का. कारण, आपण ठरवले होती की, शिवसेना व भाजपचे कमीतकमी 10 ते 15 खासदार कमी करणार. आम्हाला महाराष्ट्रावर अभिमान होता आणि आम्हाला वाटले होते की, हे होईल. पण, नशिबाने हे झाले नाही. ठिक आहे. चढउतार येत असतात. पण, आता जे आपल्या समोर आव्हान आहे, ते आपल्या घरातील आहे. शरद पवारांच्या अस्तित्वाची निवडणूक आहे. शरद पवार जे महाराष्ट्रातून उभारून आले आणि देशात चमकले. त्यांच्या इज्जतीचा हा प्रश्न आहे. त्यामध्ये आपण कोणतीही तडजोड करू शकत नाही. सर्व कार्यकर्त्यांना माझे आवाहन आहे की, सर्व कामे सोडून द्या दोन तीन महिन्यांकरिता मीही पवारसाहेबांना सांगितले आहे की, गरज असेल तर कोर्ट बंद. दोन तीन महिने मला काहीही सांगा. आपल्याला कमीत कमी 80 आमदार निवडून आणायचे आहेत. ज्या आत्मविश्वासाने पवारसाहेबांचे कार्यकर्ते काम करत असतात, आपले नेते काम करत असतात. मला आनंद मिळतो. निकाल चांगला येवो किंवा वाईट येवो. पण निकाल वाईट येणार नाही, यासाठी प्रयत्न करू. मी आपल्या सर्वांचे अभिनंदन करतो. आज आपल्यासाठी शुभ दिवस आहे. आपण आपल्या पहिल्या यशाची आठवण करून मैदानात उतरू आणि पवारसाहेबांना 80 आमदारांची भेट देऊ...



**मुंबईतील राष्ट्रवादी भवनामध्ये झालेल्या झेंडावंदन कार्यक्रमात झेंड्याला सलामी देताना प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, अजित पवार, शिवाजीराव गर्जे, नवाब मलिक व सेवादलाचे पदाधिकारी.**




# भाजपला अडवा आणि शिवसेनेची जिरवा

## आमदार प्रकाश गजभिये

आज माझ्या पक्षाचा वाढदिवस आहे. माझं प्रेम आहे, म्हणून मी माझ्या पक्षाचा वाढदिवस आहे, असं म्हटलं आहे. आज आपण आपला वाढदिवस, वर्धापनदिन साजरा करत आहोत. 1999 मध्ये पवारसाहेबांच्या नेतृत्वाखाली आपल्या पक्षाची स्थापना झाली. आणि राज्यात कधी एक नंबरवर, कधी दोन नंबरवर आणि कधी तीन नंबरवर अशी आपली राज्यात वाटचाल राहिली. पवारसाहेबांचे नाव हे देशाचे नकाशावर झळकताना आपण दररोज बघतोय. फार विपरीत परिस्थितीत आपल्या पक्षाची स्थापना झाली. फार मोठ्या संघर्षातून आपला पक्ष वाटचाल करतोय. आपला पक्ष संकटात आहे, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. परंतु एवढंच म्हणेल की,

सूरज की बिना सुबह नहीं होती.
सूरज की बिना सुबह नहीं होती.
और चांद के बिना रात नहीं होती
बादल के बिना बरसात नही होती
और पवारसाहब के बिना
राजकारण की शुरवात नही होती

आपल्या नेत्यांनी संपूर्ण राज्यात दौरे करून संघर्ष करून आपल्या पक्षाला राज्यात पहिल्या क्रमांकावर आणण्याचा प्रयत्न केला. आणि तरीही आपल्यातील काही माणसं आपल्यातून निघून गेली. आपल्यातील माणसं ही व्यवसायिक झालेली आहेत, व्यावहारिक राहिलेली नाहीत. त्यांना सर्व काही दिलं तरी निघून गेले, याची खंत मला वाटते आहे. आणि साहेबांसाठी मी सुरेश भटांच्या दोन ओळी म्हणतोय,

विझलो आज जरी मी हा माझा अंत नाही
विझलो आज जरी मी हा माझा अंत नाही
मी पेटेन उद्या नव्याने हे सामर्थ्य नाशवंत नाही
छाटले जरी पंख माझे पुन्हा उडेन मी
छाटले जरी पंख माझे पुन्हा उडेन मी
अडवू शकेल मला अशी भिंत नाही
अडवू शकेल मला अशी भिंत नाही
अजूनही पवारसाहेबांना अडवणारा माणूस नाही.

आज आपण जलदिंडी आणली. उद्या जर कोणतं युद्ध होईल, तर ते पाण्यासाठी होईल. पाणी आपल्याला मिळणार नाही, अशी स्थिती भविष्यात होणार आहे.

शोध घे पाण्याचा सारेच चाललेत खोल खोल
शोध घे पाण्याचा सारेच चाललेत खोल खोल
भूगर्भातून आवाज येतोय, संपली आबा आता ओल
भूगर्भातून आवाज येतोय, संपली आबा आता ओल
वारेमाप उपसा करतोस अडवत नाहीस पाणी
आणि किती वर्षे असाच वागणार आहे वेड्यावाणी
पाण्यावाचून सारीच सजिवसृष्टी येईल धोक्यात

बघ राजा काही तरी शिरतय का डोक्यात
निसर्गाने दिल्याशिवाय भांडे धरता येत नाही
विनाकारण सांडू नका पाणी तयार करता येत नाही
म्हणून पाणी अडवा आणि पाणी जिरवा
भाजपला अडवा आणि शिवसेनेची जिरवा
हा आपण या ठिकाणी एक संकल्प घेऊया.

आपण जर आपल्या राज्याची परिस्थिती डोळ्यासमोर घेतली, तर आपण बघतोय की, जी माणसं नकोनकोशी होती, ती सत्तेवर आली. आणि जी माणसं हवीहवीशी होती, सत्तेच्या बाहेर आली. याचं कारण काय, तर आपल्या मतांमध्ये जे विभाजन होत आहे, जी धर्मनिरपेक्ष विचारांची मते आहेत, ती कुठं तरी दुभंगली जात आहेत. आणि आता आम्हाला कुठ तरी खऱ्या अर्थाने न्याय हवा आहे आणि तो न्याय आम्ही मागतो आहे. तो न्याय मागत असताना, ज्यावेळी आपण पंक्तीत जेवायला बसतो, त्यावेळी पत्रावळी संपून जातात, अशी परिस्थिती आहे. आणि जे लोकं नको होते, ते आता आले आहेत. मी या ठिकाणी बाळासाहेब आंबेडकरांचे नाव घेतो, कारण जी मतं धर्मनिरपेक्ष पक्षांना पाहिजे होती, ती मतं अधर्मनिरपेक्ष पक्षांच्या पारड्यात टाकली जात आहेत. त्याचा निषेध राज्यात झाला पाहिजे. ती सुरवात आम्ही दीक्षाभूमीपासून करणार आहोत आणि चैत्यभूमीपर्यंत त्याचा निरोप समारंभ घेणार आहोत. नागपूरमध्ये वंचित आघाडी आणि बहुजन समाज पक्षाला नाकारण्यात आलेले आहे. अमरावती असो. विदर्भात हे काय करणार आहेत. त्या ठिकाणी भाजपने आणि शिवसेनेने आमच्या निळ्या झेंड्याचे तुकडे तुकडे करण्याचे काम केलेले आहे. हे दलित बांधवांनी पटवून घेतले पाहिजे. ते पटवून देण्यासाठी आम्ही राज्यभर जाणार आहे.

परवा ट्रेनमधून येत असताना आम्हाला शिवसेना व भाजपचे कार्यकर्ते येऊन मिळाले. माझ्या बरोबर आमदार ख्वाजा बेगही होते. आम्ही विचारले की, काय केले शिवसेना–भाजपने राज्यासाठी. असं एक काम सांगा की, आम्ही त्यासाठी तुमची आरती ओवाळू. असं कोणतं काम केले, भाजपने आणि मोदीनी. त्याचे एकही उत्तर ते देऊ शकले नाहीत. धर्माच्या आणि जातीच्या बळावर केले. आमच्या साहेबांनी जे महिलांना पाहिजे, ते केले. महिलांना अधिकार दिले. देशाची सुरक्षा असलेल्या आर्मी, नेव्हीमध्ये महिलांना सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने केले.

विजेचे बील गगनाला भिडले आहे. नागपूरचे पालकमंत्री ऊर्जामंत्री आहेत. त्यांच्या घरावर मोर्चे होत आहेत. त्यांना अडवण्यात येत आहे. त्यांचेच लोक त्यांना विरोध करत आहेत की, विजेचे दर का वाढवले. आम्हाला शेतकऱ्यांना न्याय देत नाही. आम्हाला 24 तास पाणी नाही. लोडशेडिंग आहे. अशी उत्तरे ते देऊ शकत नाहीत. दादांनी हजारो कोटीची सबसीडी देऊन विजेचे दर कमी केले. जयंत पाटलांनी काम केले. सरपंचांना चेकवर सह्या करण्याचे अधिकार दिले. आर. आर. आबांचे नाव घेतले तर निश्चितच तुमच्या डोळयात अश्रू येतील. त्या माणसाने कधी पैसा पाहिला नाही, मात्र त्या माणसाने माझ्या आयाबहिणीचे कुंकू वाचविण्याचे काम केले. डान्सबार बंदीचा निर्णय केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जेवढी कामे केली, ती जर राज्यभर पोचवली तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पहिल्या क्रमांकाचा पक्ष होता, तो उद्याही पहिल्या क्रमांकावर आल्याशिवाय राहणार नाही.

जे कोणी धर्मनिरपेक्ष विचारांचे लोक आहेत, मग बाळासाहेब असो किंवा रामदास आठवले असो, बहुजन समाज पार्टीचे लोकं असो, त्यांना आमचे आवाहन आहे की, जर तुम्हाला भाजपला निवडून आणायचे असेल, तर तुम्ही थेट त्यांच्याशी युती करा. परंतु आमची मतं खाऊ नका. आपला पक्ष 2020 मध्ये क्रमांक एकचा असेल.


तथाकथित गोरक्षकांची गुंडगिरी – (शामली पिटाई मामला) युवकांना मारणारे कथित गोरक्षक



# पुढचा वर्धापनदिन सत्तेतील असावा

## युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख

आदरणीय पवारसाहेब हे दुष्काळाच्या व्यथा जाणून घेण्यासाठी चारा छावण्यांवर फिरत होते, अगदी निवडणुकीचा निकाल 23 ला लागला आणि साहेब 24 ला साताऱ्याला होते. दुष्काळाचे राजकारण हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कधी केले नाही. एवढा भयंकर दुष्काळ होता. मला आठवतंय, मुंडेसाहेब होते. छावणी चालकांचे शिष्टमंडळ होते. बीड जिल्ह्यातील साडेचारशे छावणी चालकांचे शिष्टमंडळ आदरणीय पवारसाहेबांना भेटायला आले. आणि त्यांनी सांगितले की, साहेब या दरामध्ये आम्हाला चारा द्यायला परवडत नाही. आमची बिलं अजून शासनाने दिलेली नाहीत. त्यामुळे आम्ही माणुसकी म्हणून छावणीवर असलेल्या जनावरांना फक्त पाणी देऊ, चारा देणार नाही. पण, साहेबांनी त्या ठिकाणी विरोधी पक्षाची भूमिका घेतली नाही. उलट त्यांना सामंजस्यपणाने सांगितले की, आपण मला सात दिवसांचा वेळ द्या, शेतकऱ्यांना वेठिस धरू नका. मी मुख्यमंत्र्यांना बोलून आपले प्रश्न निकाली काढतो. असं मोठे मन दाखवून आपले आदर्श पवारसाहेब आहेत. आणि मित्रांनो, सगळ्या छावणी चालकांनी ती मागणी मान्य केली. आज दोन कोटी रोजगार देऊ म्हणून सांगितले होते. त्याचे काय झाले. देशात बेरोजगारीची दर 45 टक्के वाढला आहे. गेल्या 55 वर्षात नव्हती, तेवढी बेरोजगारी आज आपल्याला देशात बघायला मिळते. आमचा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा पदाधिकारी अनिल पवार याने पाच हजार ट्रक गाळ काढला. त्याचा दादा आणि जयंत पाटील साहेबांच्या हस्ते सत्कार केला. पिंपरी चिंचवडचा इम्रान शेख नावाचा कार्यकर्ता आहे. त्याने शहरातून पाच टन धान्य जमा करून मराठवाड्यामध्ये ते धान्य वाटप करण्याचे काम केले. गेल्या पाच वर्षात या सरकारने सिंचनाचा एकही प्रकल्प केलेला नाही. गेल्या पंधरा वर्षात जे आपण सिंचनाचे आरोप करत होतो, त्यावर आरोप करून, आपल्या शक्तीस्थळावर बेछूट आरोप करून ते प्रकल्प बंद करण्याचे काम व पाप या सरकारने केले आहे. पण, यांच्या पाच वर्षात दुष्काळ निवारणासाठी एकही प्रकल्प केलेला नाही. जलयुक्त शिवारचे डांगोरे पिटले गेले, पण जर तुमच जलयुक्त शिवार जर एवढे चांगले होते, तर पाऊस झाला तर फोटो फिरवायचे आणि जलक्रांती झाली व महाराष्ट्र टँकरमुक्त झाला, असं फिरवतात. आता जलयुक्त शिवार कुठं आहे, हे विचारायची वेळ आलेली आहे. आता आपल्याकडे 90-95 दिवस आहेत. आपण जे झालं गेलं विसरून जाऊ आणि नव्या जोमाने आणि नवीन ताकदीने कामाला लागू. आणि आपल्या या महाराष्ट्रामध्ये आदरणीय पवारसाहेबांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवायचा आहे. ही खूणगाठ या वर्धापनदिनानिमित्त आपण बांधूया. या साठी आपल्याला घोड्यासारखे काम करायचे आहे. मी घोडा हा शब्द या साठी वापरला की, घोडा हा कधी बसत नाही. तो झोपला तरी उभं राहून झोपतो. म्हणून उद्याच्या 90 दिवस आपल्या बसायचे नाही, आपल्याला त्या ठिकाणी घोड्यासारखे काम करायचे आहे. आणि पुन्हा एकदा या महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता आणायची आहे. आणि पुढचा वर्धापनदिन हा सत्तेतील राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापनदिन असावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

# Nanded City, Pune

The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेक्स (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

tempestadvertising.com

A project by MAGARPATTA CITY ©
The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.







# देशापुढची आव्हाने कोणती? आणि चर्चा कशाची?

**आकाश**, नवी दिल्ली

जून महिन्याची अखेर आणि जुलै महिन्याची सुरुवात यावर नजर टाकल्यास काय दिसते? जून महिन्याच्या अखेरीपर्यंत मान्सूनच्या पर्जन्यमानात सुमारे 37 ते 44 टक्के तूट नोंदली गेल्याची आकडेवारी आपल्या सर्वांपुढे आहे. मध्य भारत, पश्चिम भारत, वायव्य भारत, पूर्व भारत या भागात मान्सूनच्या पावसाची हजेरी लागलेली नाही. महाराष्ट्राचेच उदाहरण द्यायचे झाल्यास जून अखेरीपर्यंत महाराष्ट्रात मान्सूनने दडी मारलेली आढळली. दिल्लीत जूनच्या अखेरीस मान्सूनच्या पावसाचे आगमन होत असते. ते अद्याप झालेले नाही. थोडक्यात संभाव्य दुष्काळाची छाया देशाला भेडसावू लागली आहे. केवळ कमी पाऊस आणि संभाव्य दुष्काळच नव्हे तर देशातील काही राज्यांना जलसंकटाने देखील घेरलेले आहे. मरगळ आलेली अर्थव्यवस्था आणि मंदावलेला विकासदर त्यातून निर्माण झालेले बेकारीचे संकट असे अतिशय चिंताजनक चित्र सभोवताली आढळून येत आहे. हे केवळ ठळक असे विषय आहेत आणि सर्वसामान्य जनतेसमोर अक्राळविक्राळ रूप धारण करुन उभे आहेत. सरकारी पातळीवर मात्र 2019च्या निवडणुकीत मिळालेल्या विजयाची धुंदी किंवा नशा स्वार असलेली आढळते. त्यामुळेच सतराव्या लोकसभेच्या प्रारंभी झालेले राष्ट्रपतींचे अभिभाषण, त्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्ताव यावरील चर्चेच्या उत्तरात पंतप्रधानांनी या मुद्यांना स्पर्शही केला नाही. जाताजाता अत्यंत किरकोळ पध्दतीने त्यांनी देशापुढे निर्माण झालेल्या जलसंकटाचा उल्लेख केला. परंतु त्याच्या तपशीलात जाण्याचे सोयीस्करपणे टाळले. याऐवजी पंतप्रधानांनी नेहमीप्रमाणे काही भावनिक, विरोधी पक्षांची हेटाळणी करणारे मुद्दे सादर करुन संकुचित मनोवृत्तीचे नेहमीचेच दर्शन घडविले. हा उल्लेख एवढ्याचसाठी की देशापुढच्या ज्वलंत प्रश्नांवर या देशाचे महानायक बोलू इच्छित नाहीत. त्याऐवजी पराभवाने आधीच नामोहरम झालेल्या विरोधी पक्षांना आणखी खच्ची करण्याचा विकृत आनंद घेण्यात ते धन्यता मानताना आढळतात. याला हलकेपणा म्हटतात.







सतरावी लोकसभा आणि संसदेचे नवे अधिवेशन यानिमित्ताने सरकार व विरोधी पक्षांच्या प्रथेनुसार बैठकी होणे हे सर्व सोपस्कार पार पडले. परंतु अचानक पंतप्रधानांनी त्यात घोषणा केली की 'एक देश एक निवडणूक' हा एक अतिशय महत्वाचा विषय आहे आणि त्याबाबत ते सर्व राजकीय पक्षांच्या अध्यक्षांबरोबर चर्चा करु इच्छितात. आता 'ही श्रींची इच्छा' ! बैठक झाली. मुख्य विरोधी पक्ष काँग्रेस, तृणमूल काँग्रेस यांनी बैठकीचा बहिष्कार केला. इतर पक्ष सहभागी झाले. बहुतेक विरोधी पक्षांनी तत्वतः ही संकल्पना आदर्श असली तरी तिच्या व्यवहार्यतेबाबत शंका व्यक्त केल्या. त्याचप्रमाणे त्यासाठी संबंधित कायद्यात बदल करण्याबाबत सरकारच्या काय योजना आहेत याचीही विचारणा केली.

सरकारतर्फे तत्काळ यावर कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही. बहुतेक उपस्थित राजकीय पक्षांनी त्यांची भूमिका लेखी स्वरुपातही सरकारला सादर केली होती. बैठक झाली. त्यानंतर पाठपुराव्यादाखल त्याचे काय झाले याची काहीच कल्पना नाही. प्रश्न एवढाच उपस्थित होतो की या विषयावर सर्वपक्षीय बैठक घेण्याइतका तो गंभीर व अतिप्राधान्याचा होता काय ? कुणालाही हा प्रश्न केल्यास त्याचे उत्तर नकारार्थीच असेल. या बैठकीसाठीची विषयपत्रिकाही विचारात घेण्यासारखी होती. यामध्ये 'संसदेची उत्पादकता' म्हणजेच संसदेचे कामकाज अधिकाधिक फलदायी कसे ठरेल यासंबंधीचा विषय समाविष्ट होता. याखेरीज महात्मा गांधी यांची 150वी जयंती, स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होणे आणि एक देश व एक निवडणूक असे हे विषय होते. आता पंतप्रधानांनी ज्या शाहजोगपणे हे विषय निवडले त्याबाबतचे वास्तव व वस्तुस्थिती काय आहे हे लक्षात घेऊ म्हणजे यातला पोकळपणा समजणे शक्य होईल. संसदेची उत्पादकता वाढविण्याचा विषय ! संसदेचे कामकाज सुरळीत चालावे, गोंधळ होऊ नये आणि संसदेतील कामकाज अधिकाधिक फलदायी कसे होईल यावर बैठकीत विचार करणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात

त्या मुद्याकडे कुणी फारसे लक्ष दिले नाही हा भाग वेगळा. परंतु हा विषय बैठकीसाठी निवडणाऱ्या पंतप्रधानांचे संसदेमधील योगदान किती या प्रश्नाचे उत्तर आधी शोधले पाहिजे. तरच या विषयाबाबत ते किती गंभीर आहेत हे लक्षात येईल. 2014 पासून पंतप्रधान त्यांच्या पदावर आरूढ आहेत. 2019 पासून त्यांची पंतप्रधानपदाची दुसरी कारकिर्द सुरु झाली. 2014 ते 2019 या आपल्या पहिल्या कारकिर्दीत माननीय पंतप्रधानांनी अनेक देशांचे दौरे केले. संसदीय लोकशाहीच्या प्रथेनुसार परदेश दौऱ्याहून परतल्यानंतर माननीय पंतप्रधानांनी त्याबाबत संसदेला निवेदन करायचे असते. या निवेदनात या दौऱ्याच्या फलिताचीही चर्चा केली जाणे अपेक्षित असते. राज्यसभेत या निवेदनावर पंतप्रधानांना सदस्यांकडून काही स्पष्टीकरणे मागण्याची मुभा देखील असते. किंवा मागाहून या निवेदनावर चर्चा करण्याची परंपरा 2014 पूर्वी होती. 2014 नंतर वर्तमान पंतप्रधान साहेबांनी त्यांच्या परदेश दौऱ्याबाबत एकदाही संसदेला निवेदन केले नाही. त्यांच्याऐवजी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज त्यांच्या तर्फे निवेदन वाचून दाखवत असत आणि सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत असत. काहीवेळेस पंतप्रधान या निवेदनांच्या वेळी सभागृहात उपस्थित देखील असायचे पण नुसते बसलेले असत. ते चर्चेत भाग घेत नसत. याचा अर्थ काय लावायचा ? एकतर पंतप्रधानांच्या लेखी संसदेचे महत्व नसावे. किंवा संसदेपुढे निवेदन करण्याची आणि त्यावर आधारित सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची क्षमता नसावी. एकदा राज्यसभेत सुषमा स्वराज यांच्या निवेदनावर सदस्यांनी प्रश्न विचारण्यास सुरुवात केल्यानंतर काही संवेदनशील मुद्यांवर चर्चा आली आणि सदस्यांनी असे काही मुद्दे उपस्थित करण्यास सुरुवात केली होती की त्याची उत्तरे केवळ पंतप्रधानच देऊ शकले असते कारण संबंधित राष्ट्रप्रमुखाबरोबरच्या भेटीत केवळ पंतप्रधानच स्वतः उपस्थित होते व सुषमा स्वराज नव्हत्या. ही बाब अंगाशी येऊ शकते असे लक्षात येताच चतुर व चलाख पंतप्रधान साहेबांनी सदस्यांचे शंकानिरसन करण्याऐवजी हळूच सभागृहातून काढता पाय घेतला. याला काय म्हणायचे ? पलायन की रणछोडदासगिरी ? निवेदनाची बाब सोडा. या पंतप्रधान साहेबांनी 2014 ते 2019 या काळात एका प्रश्नाला देखील उत्तर दिलेले नाही. पंतप्रधानांकडेही काही खात्यांची जबाबदारी असते आणि यापूर्वी बहुतेक पंतप्रधान हे त्यांच्या खात्यांचे प्रश्न असायचे तेव्हा उपस्थित रहात असत आणि प्रसंगी प्रश्नांना उत्तरेही देत असत. एवढेच नव्हे परंतु पंतप्रधान या नात्याने इतरही खात्यांच्या प्रश्नांबाबत उत्तरे देत असत. परंतु वर्तमान पंतप्रधानांनी पाच वर्षात एकाही प्रश्नाला उत्तर न देण्याचा विक्रम प्रस्थापित केला आहे. गेल्या सत्तर वर्षात न झालेल्या गोष्टींचा सतत हेटाळणीपूर्वक उल्लेख सातत्याने केला जातो. परंतु गेल्या सत्तर वर्षात असा एकही पंतप्रधान झाला नाही ज्याने पाच वर्षात एकाही प्रश्नाला उत्तर देण्याबाबत असमर्थता दाखविली ! कितीही कटु असले तरी हे वास्तव आहे. त्यामुळेच संसदेचे कामकाज फलदायी व्हावे यासाठी बैठक घेण्याची बाब हा केवळ देखावा होता असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही.





पंतप्रधान किंवा त्यांच्या नेतृत्वाखालील सत्तापक्षाला संसदेचे महत्व किती वाटते याचे आणखी एक उदाहरण देता येईल. किंबहुना संसदेचे महत्व कमी कसे करता येईल यासाठी पंतप्रधान व त्यांच्या सरकारने कोणत्या चलाख्या केल्या याची उदाहरणे दिल्यावर हा ढोंगीपणा उघड होईल. भारतीय संसद ही लोकसभा व राज्यसभा या दोन सभागृहांनी मिळून तयार झालेली आहे.


पंतप्रधानांच्या सर्वपक्षीय बैठकीला नितीशकुमार व शरद पवार हेही उपस्थित होते.







केंद्र सरकार विरोधकांना विश्वासात न घेता सातत्याने दडपून व रेटून कामकाज करण्याचा प्रयत्न करते.त्यामुळे वारंवार लोकसभा व राज्यसभेत गोंधळ होऊन कामकाज बंद पडते. सदस्य अध्यक्षांच्या आसनाजवळ येऊन गोंधळ घालतात.

2014मध्ये भाजप सत्तेत आला त्यावेळी या पक्षाकडे राज्यसभेत बहुमत नव्हते. त्यामुळे अनेक विधेयकांवर सरकारला बचावाचा पवित्रा घ्यावा लागत असे किंवा विरोधी पक्षांच्या दुरुस्त्या स्वीकाराव्या लागत असत. राज्यसभेतील ही स्थिती पंतप्रधानांना असह्य होऊ लागली होती. राज्यसभेला वगळून आपल्याला पाहिजे ती विधेयके मंजूर कशी करवून घ्यायची यासाठी शक्कल लढविण्याचे प्रयत्न करण्यात आले आणि त्याचा उपाय त्यांनी शोधून काढला. त्यामागे अर्थातच 'ब्रेन' किंवा 'बुध्दी' तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांची होती. संसदेत राज्यसभेला आर्थिक किंवा वित्तीय विधेयकांबाबत अधिकार नसतात. ज्यामध्ये अर्थसंकल्पाचाही समावेश होतो. त्यामुळे जर लोकसभा अध्यक्षांनी एखादे विधेयक हे वित्त विधेयक किंवा 'मनी बिल' असल्याचे जाहीर केल्यानंतर ते लोकसभेने मंजूर केल्यानंतर त्यास राज्यसभेची मंजुरी ही अनिवार्य रहात नाही किंवा त्यास राज्यसभेची मंजुरी घेण्याची आवश्यकता उरत नाही. राज्यसभा त्यावर चर्चा करु शकते परंतु त्यात दुरुस्ती करण्याचा अधिकार राज्यसभेला नसतो. तसेच समजा राज्यसभेने अडवाअडवी करण्याच्या हेतुने त्या विधेयकाला मंजुरी न देता केवळ प्रलंबित ठेवले तरी चौदा दिवसांच्या कालावधीनंतर राज्यसभेने त्यास मंजुरी न दिल्यास ते मंजूर झाल्याचे मानले जाते. या तरतुदीचा आधार घेऊन मोदी सरकारने आपल्या पहिल्या कारकिर्दीत सुरुवातीला अशी काही प्रमुख विधेयके वित्त विधेयके म्हणून जाहीर करुन राज्यसभेला चक्क धाब्यावर बसविण्याचा उद्योग केलेला होता. अरुण जेटली यांनी तर यासंदर्भात असा युक्तिवाद सुरु केला की जे सभागृह निर्वाचित नाही म्हणजे थेट लोकांतर्फे ज्या सभागृहाची निवड होत नाही त्या सभागृहाला अडवाअडवी करण्याचा अधिकार नाही आणि तसे होत असेल तर या व्यवस्थेत बदल करण्याची आवश्यकता असेल. हा शुध्द सत्तेचा उन्माद, अहंकार आणि कैफ होता. जनतेवर आधार कार्डाची सक्ती करण्याचे विधेयक याच पध्दतीने मंजूर करण्यात आले. परंतु त्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले व न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर ती सक्ती दूर झाली.

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



**भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्त ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान मॉरिस स्कॉट यांना गांधीजींचे पुस्तक भेट देताना.**

मोदींना संसदेबद्दल अचानक उमाळा आला तो किती बेगडी आहे याचा हा पुरावा आहे. संसदेचे कामकाज अधिकाधिक फलदायी व्हावे यासाठी पूर्वी देखील प्रयत्न झाले होते. एक साधी मागणी काही समंजस सदस्यांनी पूर्वी केली होती. ती मागणी ना काँग्रेसच्या सरकारांनी पूर्ण केली आणि आता तर ती पूर्ण होणेच अशक्य आहे. वर्षभरात संसदेचे कामकाज किमान शंभर दिवस व्हावे अशी मागणी करण्यात आली होती. यामुळे जनतेचे प्रश्न संसदेसमोर उपस्थित करणे शक्य होईल, खासदारांचा सहभाग वाढेल आणि बहुसंख्य खासदारांना संधी देखील मिळेल हा यामागे हेतु होता. परंतु ती बाब प्रत्यक्षात येऊ शकली नाही. मोदींना खरोखर संसदेचा उमाळा आला असेल तर किमान ही मागणी त्यांनी मान्य करुन दाखववी. ती देखील फार मोठी क्रांतिकारक गोष्ट ठरेल.

आणखी एक संसदविषयक महत्वाची बाब जी या सरकारने 2014 पासून पूर्णपणे दुर्लक्षिली आहे. किंबहुना आपल्याला पाहिजे ती विधेयके विनाअडथळा आणि घाईघाईने संमत करण्यासाठी मोदी सरकारने विविध मंत्रालयांशी निगडित संसदीय स्थायी समित्यांतर्फे विधेयकांच्या छाननीच्या प्रक्रियेला पूर्णपणे फाटा दिलेला आहे. संसदेत सादर होणाऱ्या विधेयकांची तपशीलवार आणि निःपक्षपणे छाननी करणे तसेच अर्थसंकल्पातील अनुदानविषयक मागण्यांची छाननी करण्याचे मुख्य काम या समित्यांकडे सोपविण्यात आलेले असते. संसदेत सर्वच विषयांवर निःपक्षपणे व तपशीलाने चर्चा होऊ शकत नसल्याने 'मिनि पार्लमेंट' किंवा 'लघु संसद' मानले जाते. तेथे सदस्य पक्षातीत भूमिका घेऊन देशहिताच्या दृष्टीने एखाद्या विधेयकावर किंवा अन्य विषयावर सर्वसंमत निर्णय करु शकतात जे संसदेत किंवा पूर्ण सभागृहात शक्य होत नाही. परंतु मोदी सरकारने 2014 पासून या स्थायी समित्यांना पूर्णतया अडगळीत टाकल्यासारखे केले आहे. त्यामुळे लोकसभेत बहुमताच्या आधारे पाहिजे ते विधेयक संमत करुन घेण्याचे मोकाट सत्र सुरु केले.

ही सर्व उदाहरणे मोदी सरकार संसदेबाबत किती 'गंभीर' आहे हे दर्शविणारी आहेत. त्यामुळेच मोदींनी फार मोठा आव आणून जी सर्वपक्षीय बैठक या विषयांवर बोलावली होती तो प्रकार किती पोकळ आहे हे यावरुन सिध्द होते.

आता मुख्य विषय एकत्रित निवडणुकांचा ! मोदी सरकार या विषयाबाबत देखील किती ढोंगीपणा करीत आहे त्याचा 'पर्दाफाश' नुकताच झाला आहे. त्याचे एकच उदाहरण पुरेसे आहे. अमित शहा आणि स्मृति इराणी हे दोघेजण लोकसभेवर निवडून आल्याने त्यांच्या गुजरातमधील राज्यसभेच्या दोन जागा रिक्त झाल्या. त्यासाठी पोटनिवडणुका होणे अपरिहार्यच आहे. इतरवेळी या पोटनिवडणुकांसाठी निवडणूक आयोग भरपूर वेळ घेत असतो पण आता विजेच्या वेगाने निवडणूक आयोगाने या पोटनिवडणुका तत्काळ घेण्याचे ठरविले. परंतु या दोन जागांसाठी एकत्रित निवडणूक घेण्याचे त्यांनी टाळले

आहे. कारण गुजरातमध्ये दोन जागांसाठी एकत्रित निवडणूक झाल्यास भाजपला केवळ एकच जागा मिळू शकेल आणि दुसरी जागा काँग्रेसला मिळू शकते. हा धोका समोर दिसत असल्याने निवडणूक आयोगाने दोन्ही जागांसाठी वेगवेगळ्या निवडणुका घेण्याचा घाट घातला. थोडक्यात मोदी सरकारला जे सोयीचे असते त्यानुसार याबद्दल निर्णय केले जातात. जे सरकार साध्या राज्यसभेच्या दोन जागांच्या निवडणुका एकत्र घेण्याचे धाडस करु शकत नाही त्या सरकारने 'एक देश एक निवडणूक' अशी भाषा करणेच खोटारडेपणा व हास्यास्पद आहे. गुजरात विधानसभेच्या निवडणुकांच्या वेळीच हिमाचल प्रदेशातही विधानसभा निवडणूक होती. त्यावेळी देखील मोदी सरकारने दोन राज्यांच्या निवडणुका एकत्रितपणे घेण्याचे नाकारले. ते सोडा, आगामी काळात महाराष्ट्र, हरयाणा, झारखंड आणि दिल्ली विधानसभा निवडणुका आसपासच आहेत. किमान त्या तरी एकत्रितपणे घेण्याचे धाडस मोदी सरकारने दाखविल्यास त्यांचा 'एक देश एक निवडणूक' हा हेतु गंभीर आहे असे मानण्यास जागा आहे असे म्हणता येईल.

देशातील संघराज्य पध्दती आणि विविध राज्यांना असलेले अधिकार पाहता संसदेपासून ते जिल्हा परिषद किंवा ग्रामपंचायतीपर्यंतच्या निवडणुका एकत्रितपणे घेण्याचा अट्टाहास हा व्यवहार्य नाही. एखाद्या राज्यात विविध कारणांमुळे मध्यावधी निवडणुका होऊ शकतात. किंवा केंद्रात देखील एखाद्या वेळी आघाडी सरकार सत्तेत येऊ शकते आणि ते बहुमता अभावी किंवा अन्य कारणांमुळे देखील सत्तेवरुन दूर होऊ शकते आणि त्यातून मध्यावधी निवडणुकांची पाळी देशावर येऊ शकते. त्यामुळे एकत्रित निवडणुकीची संकल्पना कितीही आदर्श असली तरी तिच्या व्यावहारिकपणाबद्दल शंका आहेत. त्यासाठी कायदेबदल करावे लागतील व कदाचित घटनादुरुस्तीही करावी लागेल. त्यासाठी सर्वप्रथम देशभरातील प्रादेशिक पक्षांची सर्वसंमती मिळवावी लागेल. कारण अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांची सरकारे आहेत. त्यामुळे पंतप्रधानांना वाटते तेवढी ही बाब सोपी नाही. आता प्रश्न उरतो की पंतप्रधानसाहेबांना या विषयाची आठवण आताच येण्याचे कारण काय ? खरोखरच कारण काहीच नाही. पण लोकांचे लक्ष विचलित करणे, देशापुढील महत्वाच्या व गंभीर समस्यांवरुन इतरत्र लक्ष वळविणे यासाठी हा खेळ खेळण्यात आला. लोकसभेची निवडणूक संपून केवळ तीन आठवडे होत असतानाच हे एक पिल्लू सोडून देण्यात आले. त्यामुळेच हा केवळ एक देखावा होता. लोकांचे लक्ष विचलित करण्याचा ! त्यापलीकडे या बैठकीला काडीचेही महत्व नव्हते!

## चर्चा : सुप्रिया व राहुल यांची



महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यात ५५ मिनिटे चर्चा झाली. या चर्चेत राजीव गांधी यांनी सौ. सुळे यांच्याकडून महाराष्ट्राची राजकीय सद्यस्थिती तसेच दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई व जनावरांच्या छावण्या याबाबतची माहिती समजून घेतली. आगामी विधानसभेच्या निवडणुका काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने समविचारी धर्मनिरपेक्ष शक्तींना एकत्र घेऊन लढवाव्यात. त्या दृष्टीने जागांचे वाटप त्वरेने करून उमेदवार निश्चिती करावी, जेणेकरून प्रचारासाठी उमेदवारांना पुरेसा वेळ मिळू शकेल, असे त्यांनी सुचविले. गरज असल्यास जागांची अदलाबदल करावी व निवडून येऊ शकणाऱ्या जागांचाच आग्रह धरावा असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले असल्याचे समजते. राहूल गांधी यांच्यासह काँग्रेस पक्षाचे नेते राष्ट्रवादीच्या नेत्यांसमवेत एकत्रितपणे दौरे करून प्रचाराचे काम करतील. त्या दृष्टीने नियोजन व कार्यक्रमाची आखणी करावी, असेही त्यांनी सुचविले.

## नवे सरकार नवी केशभूषा ??

सतरावी लोकसभा अस्तित्वात आली. नवे सरकारही स्थापन झाले. नवे मंत्रिमंडळ आले. मात्र पंतप्रधान कायम ! पंतप्रधानांची ही दुसरी इनिंग सुरु झाली. त्यांनी त्यांच्या टीममध्ये काही बदल केले. काही नवे चेहरे, काही जुने कायम राहिले ! पंतप्रधान पहिल्या दिवशी लोकसभेत आले. पंतप्रधान हे त्यांचा पेहराव, वस्त्रपरिधान, वेशभूषा आणि हो केशभूषा याबद्दल अतिशय काटेकोर मानले जातात ! साधेपणाचा कितीही गाजावाजा करण्यात येत असला तरी साधे कपडे चटकन ओळखू येतात. जॉर्ज फर्नांडिस सुती खादीचे पायजमे व कुडते घालत असत आणि ते साधे आहेत हे कळून येत असे. पंतप्रधानांची वस्त्रप्रावरणे ही विशेष असतात हे कळून येते. सूटबूट किंवा नावाची नक्षी असलेला कोट घातल्याने पंतप्रधानांची भरपूर नाचक्की झाली होती. तेव्हापासून त्यांनी कटाक्षाने पोशाख आणि परिधानाबाबत कमालीची काळजी घेतली हे स्पष्ट झाले आहे. परंतु पंतप्रधानपदाच्या आपल्या दुसऱ्या कारकिर्दीत त्यांनी त्यांच्या वेशभूषेत नव्हे पण केशभूषेत बदल केलेला आढळून आला. होय, केशभूषेत ! पूर्वी पंतप्रधान केशभूषा करताना डावीकडे लहान तर उजवीकडे मोठा भांग पाडायचे. जगात बहुतांश पुरुषांमध्ये हीच पध्दत रूढ असल्याचे मानले जाते. परंतु उजवीकडे लहान आणि डावीकडे मोठा भांग पाडणारे पुरुषही जगात असतात. परंतु सर्वसाधारणतः त्यांचे प्रमाण कमी आहे. तर सांगायचा मुद्दा हा

घंटाकर्ण, नवी दिल्ली
पर्व्हाटा







की नव्या सरकारचे कामकाज सुरु करताना पंतप्रधानांनी त्यांच्या केशभूषेत बदल करताना आता पूर्वीच्या उलट भांग पाडण्यास सुरुवात केलेली आढळून येते. म्हणजेच आता पंतप्रधान उजवीकडे लहान तर डावीकडे मोठा भांग पाडत असल्याचे दिसून येत आहे. हा बदल अचानक आहे काय, त्याला कारण काय असे काही प्रश्न उपस्थित होतात पण त्याची उत्तरे साक्षात पंतप्रधानच देऊ शकतात. जगात पूर्वीही अशी केशभूषा करणारे नेते, राज्यकर्ते होऊन गेले आहेत. एका देशाच्या नेत्याने विसाव्या शतकात याच प्रकारची केशभूषा प्रसिध्द व प्रचलित केली होती. कोण होता तो नेता ? आठवा, मेंदुला ताण द्या !!

## इक बंगला बने न्यारा.........

'मोदी सरकार-2' मध्ये दुसऱ्या क्रमांकाचे नेते असलेले गृहमंत्री अमितभाई शहा यांना माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा '6-अ कृष्ण मेनन मार्ग' हा बंगला देण्यात आला आहे. आपला अखेरचा काळ वाजपेयींनी याच बंगल्यात घालवला. आता मात्र अमितभाई या बंगल्याचे निवासी होत आहेत. किती प्रतीकात्मक असा हा प्रकार मानायचा ? सध्या ते 'नंबर-2' आहेत आणि देवाची कृपा अशीच कायम राहिल्यास ते कधीतरी 'नंबर-1' पण होतील ! माजी पंतप्रधानांच्या बंगल्यातच तर ते रहात आहेत. मग त्यांच्यावर ही कृपा का होणार नाही ? खरं तर अमितभाईंनी हा नवा बंगला का घेतला हे प्रश्नचिन्ह कायम आहे. अलीकडेच पक्षाध्यक्ष आणि त्यानंतर राज्यसभा सदस्य या नात्याने त्यांना 11 अकबर मार्ग हा बंगला मिळाला होता. त्यांची सुरक्षा व्यवस्था लक्षात घेऊन या मंत्रीपदासाठीच्या बंगल्यात आवश्यक त्या दुरुस्त्या व बदल करण्यात आले होते. त्याला फार काही काळ झालेला नाही. गेल्या दीड -दोन वर्षापूर्वीचीच ही गोष्ट आहे. परंतु तरीही अमितभाईंनी बंगला बदलायचे ठरवले ! अमितभाईंच्या 11 अकबर मार्ग बंगल्याचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण होते. 10 अकबर मार्ग हा बंगला तत्कालीन संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांना मिळाला होता. 12 अकबर मार्ग हा बंगला त्यावेळचे केंद्रीय रेल्वे व नंतर वाणिज्य मंत्री झालेल्या सुरेश प्रभु यांना देण्यात आला होता. पर्रीकर यांना कर्करोग झाला. त्या दुर्धर आजारातच त्यांनी इहलोकीची यात्रा संपवली. सुरेश प्रभु हे अपयशी मंत्री म्हणून गणले गेले आणि मोदी यांनी त्यांना आपल्या नव्या टीममधून वगळले. अर्थात समोर 17 अकबर मार्ग या बंगल्यात नवे संरक्षणमंत्री राजनाथसिंग राहतात. अमितभाईंना बहुधा या त्यांच्या सहकाऱ्यांच्या सन्निध्यात राहण्याची इच्छा नसावी. किंवा त्यांना अकबर मार्ग हे नाव पसंत नसावे. अकबर मार्गापेक्षा कृष्ण मेनन मार्ग हे नाव कधीही त्यांना आवडेल असेच आहे. गुजरातमध्ये कृष्णभक्तीचे प्रस्थ आहेच ! तरीही अटलजींचा बंगला निवडून अमितभाईंनी त्यांचे खरे 'टार्गेट' काय आहे हे मात्र सूचित केले आहे !



# सावंत भरत आणि गिते राम ??

'मोदी-पर्व क्र.2'ची 30 मे रोजी सुरुवात झाली. या दिवशी पंतप्रधानांसह अन्य केंद्रीय मंत्र्यांचा शपथविधि झाला. म्हणजेच आता हे नवे सरकार अस्तित्वात येऊन जवळपास महिना झाला असे म्हणण्यास हरकत नाही. 17 जून रोजी संसदेचे अधिवेशन सुरु झाले. मंत्रालयांमध्ये मंत्र्यांची ऑफिसेस असतातच. पण अधिवेशनकाळातही मंत्र्यांच्या सोयीसाठी संसदेत त्यांना ऑफिस किंवा कामकाज कक्ष दिले जातात. यामध्ये कॅबिनेट मंत्र्यांना प्रामुख्याने ऑफिससाठी स्वतंत्र खोल्या दिलेल्या असतात. त्यानुसार सार्वजनिक आणि अवजड उद्योग मंत्री अरविंद सावंत यांनाही कॅबिनेट मंत्री या नात्याने स्वतंत्र खोली मिळाली आहे. ही खोली पूर्वीच्या सरकारमधील याच खात्याचे मंत्री अनंत गिते यांना देण्यात आलेली होती आणि आता तेच खाते आणि तीच खोली सावंत यांनाही देण्यात आलेली आहे. दोघेही शिवसेनेचे नेते आहेत हे आणखी एक साम्य ! हा सर्व सारखेपणा असला तरी एक बाब खटकणारी आहे. प्रत्येक मंत्र्याच्या ऑफिस बाहेर त्याच्या नावाची चकचकीत पितळी पाटी व त्याखाली त्याचे मंत्रीपद याचा उल्लेख असतो.





सावंत यांच्या ऑफिसबाहेर जी पितळी पाटी आहे तीवर मंत्रीपदाचा उल्लेख अचूक आहे....... पण नावात मात्र गडबड आहे ! या पितळी पाटीवर अजुनही 'अनंत ग. गिते' यांचेच नाव कायम आहे. नवीन सरकार सत्तेत येऊन आता जवळपास महिना झाला पण संसदेत केंद्रीय अवजड व सार्वजनिक उद्योगमंत्री हे अजुनही 'अनंत ग. गिते' हेच आहेत. सावंत हे शिवसेनेचे आहेत. भगवान प्रभु रामचंद्र यांच्याबाबत त्यांचा पक्ष विशेष भावनाप्रधान आहे. रामचंद्र जेव्हा वनवासात गेले तेव्हा त्यांच्या पादुका अयोध्येच्या सिंहासनावर ठेवून त्यांच्या नावाने त्यांचे धाकटे बंधु भरत यांनी राज्यकारभार केला होता असे प्रचलित आहे. बहुधा अरविंद सावंत हे गिते यांची पाटी कायम ठेवून त्यांच्या नावानेच अवजड व सार्वजनिक उद्योग मंत्रालयाचा कारभार चालवीत असावेत ! पण थांबा !! ताजी माहिती हाती आली आहे ! दोनच दिवसांपूर्वी गिते यांची पाटी



काढण्यात आली आहे. पण अद्याप नवी सावंत साहेबांची पाटी लागलेली नाही. सरकारी पध्दतीनुसार ती हळूहळू येईल.

तेव्हा, संयम सोडू नका ! पण, संसदेच्या एस्टिमेट्स कमिटीच्या अध्यक्षपदी अजुनही भाजपच्या मार्गदर्शक मंडळाचे सदस्य मुरली मनोहर जोशी हेच आहेत बरं का ? मुरली मनोहर जोशी यांना यावेळी उमेदवारी नाकारण्यात आली होती व त्यांनी निवडणूक लढवलीही नव्हती. पण त्यांच्या नावाची पाटी अद्याप दिमाखात झळकत आहे. त्यामुळे सावंत यांनी फार खेद मानू नये ! गोष्टी संयमाने घ्याव्यात हेच चांगले !

## आळवू राग नाराज !










काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे सोनिया गांधी यांची निवड झाली. त्यानंतर लोकसभेत काँग्रेस पक्षाचे नेतेपद कुणाला मिळणार याकडे सर्वांचेच लक्ष होते. गेल्या लोकसभेत काँग्रसला कर्नाटकात सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे लोकसभेतील पक्षनेतेपद मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे सोपविण्यात आले होते. हा निकष मानला असता तर केरळमधील एखाद्या अनुभवी काँग्रेस सदस्याकडे नेतेपद जाणे अपेक्षित होते. केरळमध्ये काँग्रेसला पंधरा जागा मिळाल्या आहेत. केरळ खालोखाल काँग्रेसला पंजाबमधून जास्त म्हणजे आठ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे केरळ प्रमाणेच पंजाबचा देखील नेतेपदावर दावा विचारात घेण्यासारखा होता. प्रत्यक्षात भलतेच झाले ! पश्चिम बंगालमधून निवडून आलेले काँग्रेसचे एकुलते एक खासदार अधीर रंजन चौधरी यांच्या गळ्यात ही माळ पडली. हा एक आश्चर्याचा धक्काच होता. ज्याप्रमाणे उत्तर प्रदेशातून निवडून आलेल्या एकुलत्या एक काँग्रेस खासदार सोनिया गांधी यांच्याकडे संसदीय काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी आली त्याचप्रमाणे बंगालचे एकुलते एक अधीर रंजन यांच्याकडे लोकसभेची जबाबदारी देण्यात आली असावी. राज्यसभेतील काँग्रेसचे नेतृत्वही जम्मू-काश्मीरचे एकुलते एक खासदार गुलाम नबी आजाद यांच्याकडेच आहे. बहुधा 'एकुलता एक' हा नवा निकष काँग्रेसमध्ये प्रचलित झालेला असावा. पण या निकषामुळे पक्षात नाराजीचा राग काहीजण आळवू लागलेले दिसत आहेत. केरळमधून शशि थरूर किंवा के. सुरेश यांची नावे नेतृत्वासाठी चर्चेत होती. पंजाबमधून मनीष तिवारी यांचे नाव पुढे आले होते. प्रत्यक्षात या सर्वांच्या पदरी निराशा आली. आता अधीर रंजन चौधरी यांच्याकडे नेतेपद गेल्यानंतर शशि थरूर काय किंवा मनीष तिवारी काय यांचा सभागृहातील



रस संपल्यासारखा दिसत आहे. विविध विषयात परंगत आणि त्यावर बोलू शकण्याची क्षमता या सदस्यांमध्ये आहे. या दोन्ही सदस्यांचे हिंदी व इंग्रजीवर प्रभुत्व आहे. परंतु काँग्रेसच्या निर्णयकर्त्यांनी त्यांच्या गुणांपेक्षा स्वतःच्या वैयक्तिक आवडीनिवडींच्या आधारे निर्णय करणे पसंत केले आणि आता हे दोन्ही सदस्य लोकसभेत फारसा रस घेत नसल्याचे दिसून येत आहे. अजुनही वेळ आहे आणि या दोघांना योग्य ते महत्व दिल्यास लोकसभेत काँग्रेसची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी या दोन्ही सदस्यांचा उपयोग होऊ शकतो. अन्यथा ‘राग नाराजी’चे सूर काँग्रेस संसदीय पक्षात कायमस्वरुपी रेंगाळत राहतील !!

## फाजील उत्साह नडला ??


नव्या लोकसभेचे अधिवेशन नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधीने सुरु झाले. शपथविधि सोहळा दोन दिवस चालतो. या सोहळ्यादरम्यान अनेक मजेदार प्रसंगही घडत असतात. शपथविधीच्या वेळी सदस्य हे विविध भाषांमध्ये शपथ घेत असतात. यामध्ये काहीजण संस्कृतमध्ये घेतात. पुण्याचे गिरिश बापट यांनी संस्कृतमधून शपथ घेतली. अनेक सदस्य आपापल्या मातृभाषेतूनही शपथ घेतात. दक्षिण भारतातील सदस्य हे इंग्रजी किंवा त्यांच्या मातृभाषेत शपथ घेण्यास पसंती देत असतात. केरळमधील सदस्य देखील त्यास अपवाद नसतात. त्यामुळे केरळमधील काँग्रेसचे सदस्य के. सुरेश यांनी जेव्हा हिंदीत शपथ घेतली तेव्हा भाजपच्या बाकांवर एकच जल्लोष झाला. सुरेश यांनाही स्वर्ग दोन बोटे उरला ! त्याला कारणही होते ! वरिष्ठ सदस्य या नात्याने त्यांचा लोकसभा अध्यक्षांच्या तालिकेत समावेश झाला होता. त्यामुळे आपण इंग्रजीप्रमाणेच हिंदीही बोलू शकतो हे दाखविण्यासाठी त्यांनी मातृभाषा मल्याळम किंवा इंग्रजीपेक्षा हिंदीला प्राधान्य देऊन आपली क्षमता दाखविण्याचा प्रयत्न केला. पण झाले भलतेच ! कानोकानी आलेल्या माहितीनुसार काँग्रेस संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधी या सुरेश यांच्यावर चांगल्याच गरम झाल्याचे कळले. हिंदीतून शपथ घेऊन परतलेल्या सुरेश यांची त्यांनी खरडपट्टी काढल्याचे समजले. ‘एकतर तुम्ही मल्याळम मधून किंवा इंग्रजीतून शपथ घ्यायला हवी होती. यामुळे मेसेज चुकीचा जातो’ असे त्यांनी





सुरेश यांना सुनावले. विशेष म्हणजे केरळमधील वायनाड मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राहूल गांधी यांनी इंग्रजीत शपथ घेतली होती. दरम्यान,






सुरेश यांना बहुधा लोकसभेतील गटनेतेपद मिळेल या अपेक्षेने खुषीत आलेल्या केरळमधील अनेक काँग्रेस खासदारांनी देखील सर्वांना प्रभावित करण्यासाठी हिंदीतून शपथ घेण्याचा सराव केलेला होता. पण जसे त्यांना समजले की सोनिया गांधी यांना सुरेश यांना त्यांच्या फाजील उत्साहावरुन दोन शब्द सुनावले, सर्वांची एकदमच पाचावर धारण बसली ! मग काय ? शपथविधीसाठी नावे पुकारल्यानंतर केरळमधील खासदारमंडळींनी इंग्रजी किंवा मल्याळममधून शपथ घेऊन काढता पाय घेतला ! सदस्यांनी शपथ कोणत्या भाषेत घ्यावी याचे स्वातंत्र्य त्यांना असले पाहिजे. पण..... !

## इंग्रजी सुध्दा !

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर बोलण्यासाठी भाजपतर्फे 'ओपनिंग बॅट्समन' म्हणून राज्यमंत्री प्रतापचंद्र सारंगी यांना संधी देण्यात आली. 'ओडीशाचे मोदी' म्हणून त्यांना भाजपमध्ये ओळखले जाते म्हणे ! त्यांची

अतिसाधी राहणी व जीवन यावरुन त्यांना ही उपाधि देण्यात आल्याचे भाजपमध्ये म्हणतात ! हा पण एक विनोदच आहे ! कारण देशाच्या पंतप्रधांनांची साधी राहणी आहे हे कोणत्या निकषावरुन मान्य करायचे ? त्यांचे नाव कोरलेल्या अतिमौल्यवान कोटावरुन, रोज नवनवी जाकिटे आणि शाली यावरुन ? पण या देशाला व्यक्तिस्तोम व उदोउदोचा शाप आहे! तर अशा या अतिसाध्या सारंगी यांची पहिले वक्ते म्हणून निवड कशी झाली ? सारंगी यांना पाच भाषा येतात. हिंदी, इंग्रजी, उडिया, बंगाली व संस्कृत. या भाषा ते सफाईने बोलू शकतात. त्यामुळे बिनाइस्त्रीचे साधे सुती पांढरे कपडे परिधान करणाऱ्या या साध्या माणसालाही अस्खलित हिंदी-इंग्रजी बोलता येऊ शकते हे दाखविण्यासाठी त्यांना प्रथम वक्त्याचा मान देण्यात आला. ओडीशाचे असलेले पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यामार्फत ही खात्री करुन घेण्यात आल्याचे समजते.







कानोकानी आलेल्या माहितीनुसार पंतप्रधानांनी प्रधान यांना सारंगी हे इंग्रजीतून भाषण करु शकतील काय म्हणून विचारणा करण्यास सांगितले. प्रधान यांनी सारंगी यांना फोन केला व तशी विचारणा केल्यावर सारंगी यांनी म्हणे त्यांना पाच मिनिटे अस्खलित इंग्रजीत बोलून दाखविल्यावर त्यांना हिरवा कंदील देण्यात आला. त्यानुसार सारंगी यांनी त्यांच्या भाषणाची सुरुवात प्रथम अस्खलित इंग्रजीत केली. त्यानंतर हिंदीत ते बोलले. त्यांच्या भाषणात ठिकठिकाणी संस्कृत श्लोक व सुभाषितांचा मुबलक वापर करण्यात आला. थोडक्यात त्यांच्या भाषा येण्याचे एक प्रदर्शन संसदेत मांडण्यात आले. उथळ पाण्याला खळखळाट असतोच. सुमारबुध्दीच्या लोकांबाबत असे घडते. संसदेने अनेक बहुभाषिक नेते व

संसदपटु पाहिलेले आहेत. जॉर्ज फर्नांडिस यांना बहुतेक सर्व दाक्षिणात्य भाषा येत होत्या.


याखेरीज कोंकणी, मराठी, हिंदी व इंग्रजीही ते अस्खलित बोलत. इंग्रजीवर त्यांचे प्रभुत्व विलक्षण होते. माजी पंतप्रधान पी.व्ही.नरसिंह राव हे देखील बहुभाषिक होते. त्यांना किमान आठ ते नऊ भाषा येत होत्या. पण या नेत्यांनी त्याचे कधी प्रदर्शन किंवा बाजार मांडला नाही!

## ‘कथनी व करनी’तला फरक... निःशंक !

देशाचे नवे मनुष्यबळविकास मंत्री म्हणून रमेशचंद्र पोखरियाल उर्फ निःशंक यांची निवड करण्यात आली. काहीशी चकित करणारी अशीच ही निवड म्हणावी लागेल. कारण एकीकडे या देशाचे पंतप्रधान ‘डिजिटल इंडिया’, चांद्रयान, मंगळयान, विज्ञानाचा प्रगती, संगणकीय क्रांति अशा बड्या व लंब्याचौड्या गोष्टी करताना आढळतात. पण आता झालेले मनुष्यबळ विकास मंत्री किंवा शिक्षणमंत्री निःशंक यांच्या कारकिर्दीवर नजर टाकता पंतप्रधानांना प्रगती हवी की पुच्छगति हवी असा प्रश्न पडतो. निःशंक यांनी गेल्या लोकसभेत एका भाषणात भारताकडे वेदकाळापासून अणुविज्ञान असल्याचा दावा केला होता. कणाद ऋषींनी त्याचा शोध लावला होता व प्राचीन भारतात अणुस्फोट, अण्विक हत्यारे होती असा दावा केला होता. ज्योतिष हे विज्ञान आहे असेही त्यांनी सांगितले होते. त्यावेळी अर्थमंत्री







असलेले अरुण जेटली सभागृहात उपस्थित होते व निःशंक यांच्या वाणीने ते अस्वस्थ झाले. मागाहून त्यांनी निःशंक यांना असे काही पुराव्याखेरीज बोलत जाऊ नका असे समजावण्याचा प्रयत्न केला. त्यावर अत्यंत गंभीरपणे निःशंक यांनी त्यांना सांगितले की जेटलीसाहेब माझ्याकडे काही पुराण ग्रंथ व पोथ्या आहेत व त्यात ही माहिती देण्यात आली आहे.

जेटली अवाक् ! त्यांनी पुन्हा एकदा त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला की किमान संसदेच्या पटलावर अशा प्रकारे बोलणे योग्य नसते वगैरे वगैरे ! पण निःशंक आपल्या भूमिकेवर ठाम राहिले व पुनःपुन्हा त्यांना सांगत राहिले की ते त्या पोथ्या व ग्रंथ त्यांना दाखवतील.

अखेर हताश जेटलींनी त्यांना समजावण्याचा नाद सोडला ! हात जोडले, नमस्कार, म्हणाले आणि निरोप घेतला ! आता निःशंक यांच्याकडे देशाचे शिक्षण खाते आहे.

मेरा भारत महान !!!!

महामहीम राष्ट्रपतींनी जे भाषण केले, त्यात एक स्वप्न होते, दृष्टी होती. त्यात सरकारची खूप प्रशंसा, स्तुती करण्यात आलेली होती. परंतु, दुर्देवाने, मला त्यात देशाचे प्रतिबिंब आढळले नाही, त्याचा अभाव आढळला. महामहीम राष्ट्रपतींनी या सरकारला दुसऱ्यांदा जनमताचा कौल मिळाला असल्याचा उल्लेख केला. मात्र, मी सभागृहाचे एका वस्तुस्थितीकडे लक्ष वेधू इच्छितो. जनमताच्या या कौलाची व्यापकता इतकी मोठी आहे की, त्याची थेट जबाबदारी सरकारवर तितक्याच प्रमाणात येऊन पडते. जनतेला दाखविलेल्या स्वप्नांची पूर्तता करण्याची जबाबदारी. दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याची जबाबदारी. ज्या प्रमाणे एखाद्या यशाचे श्रेय घेतले जाते, त्याचप्रमाणे असलेल्या त्रुटींचे, अपयशाचे उत्तरदायित्वसुद्धा घेतले गेले पाहिजे. ते सरकारचे उत्तरदायित्व आहे. माझे असे मत आहे, जर नदीचा प्रवाह व्यवस्थित करायचा असेल तर, नदीचे दोन्ही

# लोकसभा अधिवेशनात राष्ट्रवादी काँग्रेसची कामगिरी




## (डॉ. अमोल कोल्हे यांचे संसदेतील पहिलेच भाषण)

# शेतकरी व ग्राहकांचे हित जोपासणारे आयात-निर्यात धोरण हवे : खा. डॉ. अमोल कोल्हे

किनारे महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. त्याच प्रमाणे सत्ता किंवा शासन हा नदीचा वाहता प्रवाह मानण्यात आला तर, तो प्रवाह सुव्यस्थित ठेवण्यासाठी दोन किनारे असतात, एक विरोधी पक्ष व दुसरे म्हणजे, स्वायत्त संस्था होय.

युवा खासदार या नात्याने माझी ही अपेक्षा आहे की, जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही देशात विरोधी पक्षांचा मान राखला जावा व सी. बी. आय, आर. बी. आय., न्यायपालिका या सारख्या ज्या स्वायत्त संस्था आहेत, त्या सर्वांची स्वायत्तता अबाधित राहिली पाहिजे. कारण, एक खासदार होण्यापूर्वी एक नागरिक या नात्याने, गेल्या पाच वर्षांत आम्ही जे अनुभवले, ज्या घटना पाहिल्या, उदाहरणार्थ न्यायाधीश न्यायासाठी जनतेच्या दरबारात गेल्याचे आम्ही पाहिले, सी. बी. आय. च्या संदर्भात होत असलेल्या घटना आम्ही पाहिल्या, रिझर्व बँकेच्या गव्हर्नरांच्या संदर्भात घडणाऱ्या घटना आम्ही पाहिल्या, तेव्हा असे वाटले, सर्वसामान्य जनतेचा लोकशाहीवर जो दृढ विश्वास आहे, त्या विश्वासाला तडा जाऊ नये आणि हीच अपेक्षा एक युवा खासदार या नात्याने मी दुसऱ्यांदा जनमताचा कौल लाभलेल्या सरकारकडून करीत आहे.









## शेतकऱ्यांचा सन्मान झाला पाहिजे

महामहीम राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात शेतकऱ्यांच्या संदर्भात अनेक योजनांचा उल्लेख केला. मात्र, माझे असे मत आहे की, या सर्व योजना तेव्हाच परिणामकारक होतील, जेव्हा या योजना सरकारी कार्यालयातून शेतकऱ्यांच्या दारापर्यंत जाऊन पोहोचतील आणि तीच काळाची गरज आहे. आजच महाराष्ट्र सरकारकडून शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात अहवाल प्रसिद्ध झाला आहे, तो पाहून शरमेने मान



खाली जाते. अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रात आज दररोज आठ शेतकरी आत्महत्या करीत आहेत (शेमऽऽशेमऽ). आज दररोज एक शेतकरी आत्महत्या करत आहे. ही केवळ एक शेतकरी आत्महत्या करतो असे नाही तर, त्या एका शेतकऱ्याच्या आत्महत्येबरोबर त्याचे एक कुटूंब कोसळते, निराधार होते. केवळ एका आत्महत्येमुळे संपूर्ण कुटुंबाच्यापुढे अंधार दाटला जातो. त्यांचे भवितव्य अंध:कारमय होऊन जाते. माझी सरकारला विनंती आहे, आपण 'किसान सन्मान योजनेविषयी बोलतो, शेतकऱ्यांचा सन्मान झाला पाहिजे, शेतकऱ्यांचे स्मशान होऊ नये, एवढीच सरकारला विनंती आहे.

एकीकडे आपण 5 ट्रिलियन अर्थव्यवस्थेविषयी बोलत आहोत आणि दुसरीकडे या देशातील एकूण लोकसंख्येपैकी 65 टक्के असलेले शेतकरी अद्यापही त्यांच्या शेतमालाला किमान हमी भाव मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत.

सध्या जेव्हा किसान सन्मान योजनेविषयी बोलले जाते, त्या वेळी मी या गोष्टीकडे मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो की, ज्या आयात-निर्यात सवलती आहेत, जे आयात-निर्यात धोरण आहे, ते शेतकऱ्यांच्या हितासाठी असले पाहिजे, त्यादृष्टीने ते धोरण तयार केले गेले पाहिजे. कांद्याच्या बाबतीत मी अलिकडील एक उदाहरण देऊ इच्छितो. गेल्या 5 वर्षांत जेव्हा शेतकऱ्यांचा कांदा बाजारपेठेत जाण्याच्या तयारीत होता, त्याच वेळी इजिप्तकडून, पाकिस्तानकडून कांद्याची आयात करण्यात आली. परिणामी, महाराष्ट्रातील, देशातील शेतकऱ्यांच्या कांद्याचे भाव एकदम कोसळले. या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी सरकारचे जे आयात-निर्यात धोरण तयार केले जाताना ग्राहक व उत्पादक दोघांचेही हित जोपासले जावे. तसे झाले तर, ज्या किसान सन्मान योजनेविषयी आपण बोलतो, खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा सन्मान केल्यासारखे होईल.

आता आपण सर्वजण पाहतो की, मॉन्सूनच्या पावसाला उशीर झालेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातून खरीप हंगाम निघून गेलेला आहे. माझी सरकारला विनंती आहे की, दुष्काळग्रस्त भागातील जे शेतकरी आहेत, त्यांना दिलासा देण्यासाठी लवकरात लवकर ठोस पावले टाकावीत. तरच, 65 टक्के लोकसंख्या असलेल्या शेतकऱ्यांच्या गरजा आहेत, त्याची पूर्तता केली जाईल.

## बैलगाडा शर्यतीसाठी वटहुकूम काढा

महामहीम राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात, पशुधन विकासाच्या बाबतीत, त्यांच्या आरोग्याविषयी उल्लेख करण्यात आलेला आहे. या संदर्भात, मी एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. हा विषय महाराष्ट्रातील 'बुलक कार्ट रेस'चा आहे. त्याला 'बैलगाडा शर्यत' असेही म्हटले जाते.



बैलगाडा शर्यतीची परंपरा ही सुमारे 400 वर्षांपूर्वीपासूनची असून या शर्यतीवर 2011 सालापासून बंदी घालण्यात आलेली आहे. जरी सरकारी गॅझेटमध्ये बैल हा पाळीव प्राणी असला तरी तो 'संरक्षित प्राणी' असा उल्लेख असल्याने त्या शर्यतीवर बंदी घालण्यात आली आहे. परंतु, सर मी आपणास सांगू इच्छितो की, बैलगाडा शर्यती या केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून त्याच्यात ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक मजबूत करण्याची क्षमता आहे. या बैलगाडा शर्यतीत केवळ बैलगाडा मालक सहभागी होतात असे नसून लहान-मोठे जे व्यापारी असतात, त्यात आईसफ्रूट विकणारे, भेळ विकणाऱ्यापासून वाहतूक करणाऱ्यापर्यंत ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणाऱ्या सर्व घटकांचा समावेश होतो, असे माझे मत आहे.

याच्या दुसऱ्या पैलूकडे आपण पाहिले तर, अत्यंत चिंताजनक स्थिती दिसून येते. बैलगाडा शर्यतीसाठी जे बैल वापरले जातात, त्यांची उत्पत्ती 'खिलार' जातीच्या देशी गोवंशापासून होत असते. 'खिलार' जातीच्या या देशी गाई दूध कमी देतात. तरीही महाराष्ट्रातील शेतकरी या गाईंचे पालनपोषण करतात. कारण, बैलगाडा शर्यतीसाठी लागणाऱ्या बैलांची उत्पत्ती या देशी गाई करतात. परंतु, एकीकडे सरकार गोवंश हत्या बंदीची भाषा करीत असताना, या बंदीमुळे व दुष्काळी परिस्थितीमुळे खिलार गाई दूध कमी देत असल्याने व खिलार बैलाचा वापर अन्य कोणत्याही कामासाठी केला जात नसल्याने शेतकऱ्यांना नाईलाजाने या खिलार गोवंशाला कसाईखान्याचा रस्ता दाखवावा लागत आहे. म्हणून, माझी विनंती आहे की, देशी गोवंश वाचविण्यासाठी, ही परंपरा टिकून राहावी यासाठी बैलगाडा शर्यतीसाठी एक वटहुकूम काढण्यात यावा.

## वनौषधींवर राष्ट्रीय संशोधन केंद्र हवे

राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात आदिवासी बांधवांचाही उल्लेख केला आहे. मी ज्या मतदार संघातून निवडून आलेलो आहे, त्यात तीन तालुके असे आहेत, जेथे आदिवासी बांधवांचे वास्तव्य अधिक प्रमाणात आहे आणि हा जो पश्चिम घाट आहे, त्या सह्याद्रीच्या पर्वत रांगामध्ये, अनेक औषधी वनस्पती आहेत. एकीकडे आपण आयुष मंत्रालयाविषयी बोलतो, त्याच प्रमाणे या वनौषधींवर संशोधन करण्यासाठी एक राष्ट्रीय संशोधन केंद्राची स्थापना केली जावी. म्हणजे, वनौषधींना शास्त्रोक्त पद्धतीने लोकांच्या समोर आणले जाईल व शास्त्रोक्त पद्धतीने त्याचा वापर आयुर्वेदात केला जावा. याच बरोबर मी आणखी एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो, या आदिवासी मतदार संघात बी. एस. एन. एल. (भारत संचार निगम लि.) ची कनेक्टीव्हिटी नाही. जेव्हा कधी नैसर्गिक आपत्ती येते, जेव्हा वैद्यकीय तातडीची गरज भासते, 4-5 वर्षांपूर्वी अशी स्थिती निर्माण झालेली होती.



'माळीण' सारखे गावचे गाव दरडी कोसळून जमीनदोस्त झाले होते. त्या वेळी बी. एस. एन. एल. ची कनेक्टिव्हिटी नव्हती. बी. एस. एन. एल.च्या अधिकाऱ्यांशी जेव्हा मी चर्चा केली तेव्हा मला धक्काच बसला. बी. एस. एन. एल.ची वीज बिल भरण्याची क्षमता नसल्याने त्यांच्या टॉवरचा विद्युत पुरवठा खंडीत केला गेला. मी पी. यू. सी. (सार्वजनिक उद्योग)च्या संदर्भात इशारा देऊ इच्छितो. पी.यू.सी. च्या संदर्भात अधिक माहिती असलेले माननीय अवजड उद्योग मंत्री या वेळी सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु, पी. यू. सी. अधिक मजबूत करण्यासाठी पावले टाकावी लागतील. एक युवा या नात्याने आमच्या मनात अनेक प्रश्न उपस्थित होतात. बी. एस. एन. एल.ची अवस्था पाहून मनात प्रश्न येतो, आपली संस्कृती आहे 'जिओ और जिने दो'. या उलट, 'जिओ और हमे भी जिने दो', असे तर बी. एस. एन. एल. चे कर्मचारी म्हणत नाहीत ना?

जेव्हा 'राफेल'च्या असेंब्लींगचा मुद्दा उपस्थित होतो, तेव्हा आम्हा युवकांच्या मनात असा प्रश्न निर्माण होतो की, हे काम पी. यू. सी. मधील हिंदुस्थान एॅरोनॉटिक कंपनीला का दिले गेले नाही? ओ. एन. जी. सी. सारख्या पी. यू. सी. ला खाजगी क्षेत्राशी समान स्पर्धेची संधी का दिली जात नाही? एखाद्याचे हातपाय बांधून त्याच्यावर तुला फिरता येऊ शकत नाही, असा आरोप लावला जाऊ शकत नाही.

## कुपोषणाचा प्रश्न

शेवटी, दोन गोष्टींकडे मी लक्ष वेधू इच्छितो. त्या पैकी एक आरोग्याच्या संदर्भातील असून हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. आरोग्याच्या बाबतीत एक विसंगती असे दिसून येते, एकीकडे 'जय श्रीराम'च्या घोषणा दिल्या जात आहेत. त्याच वेळेस देशाच्या कोणत्या ना कोणत्या भागात 'रामनाम सत्य है' असे आक्रंदन होत असते, तेव्हा देशाच्या हातात भविष्याची प्रेते दिसून येतात. बिहारमधील 'चमकी' तापाचा मुद्दा असो किंवा गेल्या वर्षी उत्तर प्रदेशातील ऑक्सिजनच्या अभावी झालेल्या दुर्घटनेचा मुद्दा असो, यातून एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो आणि तो म्हणजे, 'कुपोषण' होय. जेव्हा आपण देशाला शक्तिशाली बनविण्याविषयी बोलतो, तेव्हा या कुपोषणामुळे मुले संसर्गजन्य रोगांना त्वरित बळी पडतात, असे दिसून येते. म्हणून, 'आयसीडीएस' योजनेतंर्गत ज्या प्रमाणात निधी कमी करण्यात आलेला आहे, तो वाढविण्यात यावा. म्हणजे, कुपोषणाचा प्रश्न यशस्वीरीत्या हाताळता येईल. तसेच, आरोग्याच्या बाबतीत दुसरा मुद्दा म्हणजे, शासकीय किंवा सार्वजनिक क्षेत्रात वैद्यकीय व्यवसायावर जे हल्ले होत आहेत, त्याचा आपण निषेधच केला पाहिजे. जेव्हा मुलगा किंवा मुलगी डॉक्टर होते तेव्हा मुलांना पदवी मिळते. पण, त्या संपूर्ण कुटुंबाचे स्वप्न साकार होते. पुढे





जाऊन आपण सीबीएससी, आयबीएससीच्या गुणवत्ता यादीत येणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांच्या मुलाखती वाचल्या तर, कोणीही आपण वैद्यकीय व्यवसाय करणार असल्याचे म्हणत नाही. या व्यवसायाला पुरेसे संरक्षण, सुविधा दिल्या तरच आयुष्यमान भारत खऱ्या अर्थाने आयुष्यमान होईल.

## शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल हवा

दोन गोष्टींकडे मी लक्ष वेधू इच्छितो. जसे उच्च शिक्षण. महामहीम राष्ट्रपतींच्या भाषणात 2022 पर्यंत शिक्षकांच्या संख्येत दीडपटीने वाढ करण्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याचे मी अभिनंदन करतो. पण, मी एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, आज बेरोजगारांचे प्रमाण 6.1 टक्के आहे आणि ग्रामीण भागात हे प्रमाण 7.8 टक्के इतके आहे. आपण भावी पिढीला परीक्षार्थीऐवजी पुन्हा विद्यार्थी बनविण्याची वेळ आली आहे. केवळ जागा वाढविण्यापेक्षा शिक्षणामध्ये रोजगाराचीही क्षमता आली पाहिजे, असे माझे मत आहे. 2027 भारताची लोकसंख्या सर्वाधिक होईल. भारत चीनची लोकसंख्या ओलांडेल. त्या वेळी ज्या मुलांच्या हातात देशाची धुरा असेल, ज्या युवकांच्या हातात धुरा असेल ते आज 10-12 वर्षांचे असतील. त्यांच्या हातात देशाची धुरा सांभाळण्याची क्षमता यावी, यासाठी शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक

महामहीम राष्ट्रपतींनी आपल्या भाषणाच्या शेवटी 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'चा उल्लेख केला आहे. एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे आपणा सर्वांचे लक्ष मी वेधू इच्छितो. नॅशनल हिरोपासून आम्हाला नेहमी प्रेरणा मिळते. मी महाराष्ट्रातून आलो आहे. महाराष्ट्रात मोठे राष्ट्रीय नेते आहेत छत्रपती शिवाजी महाराज! ते जगातील एकमेव असे राजे आहेत की, जे राजे म्हणून जन्मास आलेले नाहीत. राजा होण्यासाठी त्यांनी कधीही कोणाचा विश्वासघात केला नाही. त्यांचे देहावसान झाले तेव्हा ते राजा होते. म्हणून, इतक्या मोठ्या प्रमाणात जनमताचा कौल प्राप्त झालेल्या सरकारला माझी विनंती आहे की, लोकशाहीतील सर्वांत मोठी आदरांजली छत्रपती शिवाजी महाराजांना वाहण्याची इच्छा असेल तर, कारण, शिवाजी महाराज लोकशाहीचे पहिले उद्गाते मानले जातात. 17 व्या शतकांत जेव्हा साम्राज्यवाद होता, तेव्हा ते एकमेव राजे असे होते, ज्यांनी स्वत:चे साम्राज्य उभे केले. ते स्वत:च्या घराण्याच्या नावाने नाही, स्वत:च्या नावाने नाही, तर जनतेच्या नावाने 'रयतेचे राज्य' उभे केले. ज्याला स्वराज्य म्हटले जाते. म्हणून, इतका मोठा जनमत कौल मिळालेल्या सरकारला माझी विनंती की, लोकशाहीचा उद्गाता असलेल्या या राष्ट्रीय नेत्याचे उचित स्मारक अशा ठिकाणी होईल, जेव्हा स्वराजाची राजधानी किल्ले रायगडला 17 व्या शतकात जसा होता तसा पुन्हा बनवला जाईल, तसे जर करण्यात आले तर, ते जगातील आठवे आश्चर्य ठरेल. यापुढे जेव्हा आम्हाला 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'बद्दल ऐकायला मिळेल, त्या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलही ऐकायला मिळेल, ही अपेक्षा!



# खा. सुप्रिया सुळे यांचे 17 व्या लोकसभेतील पहिले भाषण



# अध्यक्षपदाची महान परंपरा ओम बिर्ला हेही सांभाळतील : खा. सुप्रिया सुळे यांची अपेक्षा

अध्यक्ष महोदय, आपण जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही असलेल्या देशात एका मोठ्या पदावर विराजमान आहात, त्याबद्दल आपले अभिनंदन करण्याची संधी मी या निमित्ताने घेत आहे. आपल्या बरोबर काम करण्याची संधी मला 'कॉन्स्टिट्यूशन क्लब'मध्ये मिळाली होती.

मला आठवते, दुसऱ्यांदा आपली बिनविरोध निवड झालेली आहे. पहिल्यांदा जेव्हा आपण जेव्हा लोकसभेवर निवडून आला होता व कॉन्स्टिट्यूशन क्लबची निवडणूक होती, तेव्हा कदाचित आपण पहिले कोषाध्यक्ष असाल जे बिनविरोध निवडून आले होते आणि आता हे दुसऱ्यांदा होत आहे. कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये आपण अतिशय चांगले योगदान दिले आहे. त्या वेळी आपल्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आपणास खूप खूप शुभेच्छा! पु. ग. मावळणकर, सोमनाथ चॅटर्जी आदि महनीय व्यक्ती या आसनावर विराजमान झाले व त्यांनी देशाला मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला. संसदेतील अध्यक्षपदाची परंपरा ही खूप मोठी आहे. अनेक नामवंत व्यक्तींनी हे अध्यक्षपद भूषवून आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. लोकसभेचे अध्यक्ष म्हणून निवड झालेली व्यक्ती ही कोणत्याही पक्षाची राहात नाही, असत नाही. तिने निःपक्षपातीपणे काम करावे, अशी अपेक्षा असते. आपणही ही अपेक्षा पूर्ण कराल व सर्वांना कामकाजात भाग घेताना समान संधी द्याल, अशी मी अपेक्षा करते. आज सभागृहात तुलनेने विरोधकांची संख्या कमी असली तरीही लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर विरोधकांनाही सभागृहात मोकळेपणाने बोलून दिले पाहिजे. त्यांचा आवाज आपण दाबता कामा नये, अशी अपेक्षा व्यक्त करते. अनेकदा असे होते की, जेव्हा राज्यात समस्या निर्माण होतात, तेव्हा ते आपल्याकडे, संसदेकडे पाहात असतात. आगामी पाच वर्षांत आपण एक आदर्श संसदपटू म्हणून काम कराल, ही अपेक्षा बाळगून पुन्हा एकदा मी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आपणास शुभेच्छा देते.

# खा. सुनिल तटकरे यांचे लोकसभेतील पहिले भाषण




# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा : खा. सुनिल तटकरे यांची मागणी

अध्यक्ष महोदय, मी सुनील तटकरे, महाराष्ट्रातील रायगड लोकसभा मतदार संघातून आलो आहे. ज्या ठिकाणी महान योद्धे छत्रपती शिवाजी महाराज यांनी 'हिंदवी स्वराज्य'ची स्थापना केली. ते ॲलेक्झांडर व नेपोलियन यांच्यापेक्षा महान होते, याचा मला अभिमान आहे.

महोदय, माझे हे संसदेतील पहिले भाषण आहे. शून्य प्रहरात मराठी भाषेच्या गळचेपीबद्दल बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभारी आहे. सर, मराठी भाषेच्या संदर्भात जनतेच्यादृष्टीने महत्त्वाचा असलेला मुद्दा उपस्थित करू इच्छितो. मराठी ही महाराष्ट्राची अधिकृत भाषा असून गोवा प्रांतात ती दुसऱ्या क्रमांकाची अधिकृत भाषा आहे. भारतात 2011 मध्ये ही भाषा 83 दशलक्षांहून अधिक लोकांकडून बोलली गेली आहे. आकाशवाणीच्या (ऑल इंडिया रेडिओ) नवी दिल्लीतील मुख्यालयात केंद्रीय मराठी वृत्तविभाग बंद करून केंद्र सरकार मराठी भाषेची गळचेपी करू पाहात आहे. आकाशवाणीच्या नवी दिल्लीतील केंद्रीय मराठी वृत्तविभाग लवकरात लवकर पुन्हा सुरू करण्यात यावा व मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, अशी नम्र विनंती या निमित्ताने मी सरकारला करीत आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी महाराष्ट्र विधान मंडळाने एकमुखाने ठराव संमत करून तो केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. याला देखील चार वर्षे होऊन गेली आहेत. हा ठराव केंद्र सरकार का मंजूर करीत नाही हा माझ्यापुढे प्रश्न आहे. कोट्यावधी मराठी बांधवांचे लक्ष्य या विषयाकडे लागलेले आहे. महाराष्ट्र विधान मंडळामध्येही या अधिवेशनात हा विषय पुन्हा चर्चेला आला होता. या विषयाबाबत एकमत असल्यामुळे केंद्र सरकारने तातडीने या ठरावाला संमती द्यावी अशी मी विनंती करतो. या ठरावाला केंद्र सरकारने मान्यता न दिल्यामुळे महाराष्ट्राचे दरवर्षी किमान पाचशे कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. देशातील ज्या चार राज्यांमध्ये असा भाषेचा अभिजात दर्जा देण्यात आलेला आहे, त्यांना दरवर्षी केंद्राकडून पाचशे रुपयांचे अनुदान दिले जाते. महाराष्ट्राला मात्र ठराव करूनही केवळ केंद्राची मान्यता नसल्याने या अनुदानाला मुकावे लागत आहे.

# लोकशाही संस्था आणि कायद्यांची विधळवाट

**तथागत**



विजय आणि यशासारखी नशा नसते. त्या नशेत व धुंदीतच सारासार विवेक नाहीसा होऊन गैरकृत्ये होऊ लागतात. भारतीय राजकारणात तशीच काहीशी परिस्थिती आढळून येत आहे. केंद्रात भाजपचे सरकार पुन्हा स्थापन होणे, पूर्वीपेक्षा अधिक संख्याबळ प्राप्त झाल्याने पक्षात त्याचा कैफ होणेही स्वाभाविकच मानावे लागेल. दुसरीकडे विरोधी पक्षात पराभवामुळे निर्माण झालेले नैराश्य, हताशपणा आणि त्यातून आलेला विस्कळितपणाही दिसत आहे. कोणत्याही मोठ्या पराभवानंतर ही परिस्थिती सर्वसाधारणपणे अशीच असते. या संधीचा फायदा घेणारे राजकीय नेते व पुढारी भरपूर असतात. आपले आर्थिक व राजकीय हितसंबंध सर्वोच्च मानणारे पुढारी अशा वेळी बिनदिक्कतपणे पक्षांतर करुन सत्तापक्षाच्या वळचणीला जात असतात. पूर्वी यांना 'आयाराम - गयाराम' म्हटले जात असे. तर 2019च्या लोकसभा निवडणुकीनंतर हे प्रकार पुन्हा सुरु झाल्याचे आढळून येऊ लागले.



सत्तारूढ भाजपच्या नेत्यांनी 2014मध्ये सत्तेवर प्रथमच येताना 'काँग्रेस-मुक्त भारत' घोषणा दिली होती. प्रत्यक्षात तसे होऊ शकले नाही. परंतु या पक्षाने देशातील सर्व प्रमुख राज्यांमध्ये आपल्याच पक्षाची किंवा मित्रपक्षांची सरकारे अस्तित्वात आली पाहिजेत असे उद्दिष्ट मनाशी बाळगलेले



**भाजपच्याच एका नेत्याच्या सांगण्यानुसार जेथे भाजपचा एकही आमदार किंवा खासदार नाही त्या राज्यातल्या निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना फोडण्याची एक योजना आखण्यात आली आहे. हे लोकप्रतिनिधी अगदी नगरसेवक, ग्रामपंचायत, जिल्हा परिषदेपासून ते खासदारांपर्यंतचे असू शकतील. त्याचप्रमाणे जेथे हे शक्य नाही तेथे त्या राज्यातील प्रादेशिक पक्षाशी संधान बांधणे आणि त्यांना भाजपबरोबर आघाडी करण्यास भाग पाडणे हा भागही समाविष्ट आहे. जेणे करुन ज्या राज्यात भाजपचे अस्तित्व नाही तेथे भाजपचे अस्तित्व निर्माण करण्याची ही धडपड आहे. खरे तर याला धडपड म्हटता येणार नाही. ही आसुरी महत्वाकांक्षा म्हणावी लागेल. हे सर्व राजकीय गैरव्यवहार करताना पक्षांतर विरोधी कायद्याला देखील प्रसंगी धाब्यावर बसविण्यास मागे पुढे पहायचे नाही असेही भापच्या योजनेत आहे.**



आहे. विरोध करणाऱ्या एका पक्षाचे देखील सरकार कोणत्या राज्यात सत्तेत नसले पाहिजे हे या पक्षाचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने त्यांनी त्यांचे राजकीय नियोजन आखलेले आहे. सध्या त्यांच्या डोळ्यात कुपणारी दोन राज्ये आहेत - पश्चिम बंगाल आणि केरळ ! या पैकी पश्चिम बंगालमध्ये लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने या पक्षाने जोरदार मुसंडी मारली. पश्चिम बंगालच्या रणमर्दिनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची या पक्षाने झोप उडवली हे निश्चित. परंतु पश्चिम बंगालमध्ये कबज्या करण्यासाठी हा पक्ष अवलंबीत असलेले मार्ग अत्यंत अनुचित आहेत. यामध्ये धार्मिक व सांप्रदायिक मुद्यांचा अमर्याद वापर करण्याचे धोरण भाजपने अमलात आणण्याचे ठरविलेले आढळते. एका बाजुला मतदारांचे धार्मिक आधारावर ध्रुवीकरण करणे तर दुसरीकडे तृणमूल काँग्रेसच्या लोकप्रतिनिधींना विविध आमिषे दाखवून फोडाफोडी करण्याचे प्रकारही सुरु झालेले आहेत. भाजपकडे अमाप साधनसंपत्ती आहे. त्याच्या बळावर ते पश्चिम बंगालच्या तृणमूल काँग्रेसच्या नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्यापासून ते खासदारांपर्यंत आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. यामध्ये त्यांच्या गळाला अनेक मासे लागणे अगदी स्वाभाविक आहे. त्यामुळेच आतापर्यंत तृणमूलच्या सहा-सात आमदारांनी पक्षांतर केल्याचे आढळून येते. काही नगरपरिषदांचे नगरसेवकही

मोठ्या संख्येने फुटताना आढळत आहेत. या नगरसेवकांचे भाजपमधील प्रवेशाचे समारंभ देखील दिल्लीत केले जात आहेत. यासाठी या नगरसेवकांच्या जाण्या-येण्याचे खर्च किती येत असतील याची कल्पना केलेली बरी. परंतु घाऊक पध्दतीने तृणमूल काँग्रेसला खिंडारे पाडण्याचे प्रयत्न दररोज सुरु आहेत. ममता बॅनर्जी यांनी भाजपच्या विरोधात अत्यंत आक्रमक भूमिका घेतल्याने खवळलेल्या भाजप नेतृत्व सूत्रधारांनी ममता बॅनर्जी यांच्या पक्षाचा खात्मा करण्याचा विडा उचलला आहे आणि तशी पावले ते टाकत आहेत. सुदैवाने केरळमधील राजकीय प्रतिस्पर्धेने एवढे कडवट स्वरुप धारण केलेले नाही.

भाजपच्याच एका नेत्याच्या सांगण्यानुसार जेथे भाजपचा राजकीय गैरव्यवहार करताना पक्षांतर विरोधी कायद्याला देखील प्रसंगी धाब्यावर बसविण्यास मागे पुढे पहायचे नाही असेही भापच्या योजनेत आहे. केरळमध्ये अद्याप भाजपला शिरकाव करता आलेला नाही. त्यामुळे त्यांनी केरळमधील लहानलहान सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक संघटनांना(उदा. नारायण गुरु संस्थान) जवळ करुन त्यांच्या मार्फत या राज्यात राजकीय घुसखोरीचे प्रयत्न भाजपतर्फे अव्याहतपणे, अखंडपणे सुरु आहेत.

भाजपतर्फे ज्या राज्यांत त्यांना आपले अस्तित्व निर्माण करायचे आहे त्यामध्ये पश्चिम बंगाल किंवा केरळ ही राज्ये आहेतच. परंतु त्याखेरीज तेलंगणा आणि आंध्र प्रदेश आणि तमीळनाडू या राज्यांचाही समावेश आहे. यापैकी तमीळनाडूत



एकही आमदार किंवा खासदार नाही त्या राज्यातल्या निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना फोडण्याची एक योजना आखण्यात आली आहे. हे लोकप्रतिनिधी अगदी नगरसेवक, ग्रामपंचायत, जिल्हा परिषदेपासून ते खासदारांपर्यंतचे असू शकतील. त्याचप्रमाणे जेथे हे शक्य नाही तेथे त्या राज्यातील प्रादेशिक पक्षाशी संधान बांधणे आणि त्यांना भाजपबरोबर आघाडी करण्यास भाग पाडणे हा भागही समाविष्ट आहे. जेणे करुन ज्या राज्यात भाजपचे अस्तित्व नाही तेथे भाजपचे अस्तित्व निर्माण करण्याची ही धडपड आहे. खरे तर याला धडपड म्हटता येणार नाही. ही आसुरी महत्वाकांक्षा म्हणावी लागेल. हे सर्व पक्षाने अंशतः शिरकाव केलेला आहे. या राज्यात सध्या जयललिता यांचा वारसा सांगणाऱ्या अण्णा द्रमुक पक्षाचे सरकार सत्तारूढ आहे. केवळ भाजपच्या केंद्र सरकारच्या कृपेने ते चालू आहे. वेळापत्रकानुसार 2021 मध्ये तमीळनाडूमध्ये विधानसभा निवडणूक आहे. वर म्हटल्याप्रमाणे अण्णा द्रमुकचे सरकार लडखडत चालले आहे. यामुळे विरोधी द्रमुकला भरपूर राजकीय पाठिंबा मिळत आहे. लोकसभा निवडणुकीत मतदारांनी त्यानुसार द्रमुकला भरघोस जागा देऊन आपला कल स्पष्ट केलेलाच आहे. अण्णा द्रमुक सध्या भाजप नेतृत्वाखालील 'एनडीए' मध्ये सामील आहे.



ओडीशा आणि तेलंगणा मध्ये भाजपने शिरकाव केलेला आहे. परंतु तेथे सत्तारूढ असलेल्या प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांनी भाजपबरोबर संघर्षापेक्षा सामोपचाराचे धोरण स्वीकारले आहे. ओडीशामध्ये नवीन पटनाईक(बिजु जनता दल) तर तेलंगणात तेलंगणा राष्ट्र समितीचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव या दोघांनीही केंद्रातील भाजपच्या सरकारला पाठिंबा देण्याची भूमिका घेतल्याने भाजपने या राज्यांमध्ये फारशी गडबड न करण्याचे धोरण ठेवलेले आहे. परंतु शेजारच्या आंध्र प्रदेशाबाबत भाजपने पश्चिम बंगाल किंवा केरळप्रमाणेच घुसखोरीचे धोरण अवलंबिले आहे. तेलंगणामध्ये लोकसभा व विधानसभेत भाजपला अस्तित्व दाखविण्याइतक्या मोजक्या जागा तरी मिळाल्या.परंतु आंध्र प्रदेशात तसे घडलेले नाही. त्यामुळेच भाजपने आता सत्तेत आलेल्या वायएसआर काँग्रेसला आपल्या पंखाखाली घेण्यास सुरुवात केली आहे. त्याचबरोबर पराभवाने खचलेल्या तेलगु देशमचा पुरता खात्मा करण्याच्या दृष्टीने त्या पक्षाला खिंडारे पाडण्याचे प्रकार भाजपने सुरु केले आहेत. संसदेचे अधिवेशन 17 जुलैस सुरु झाले. दोन दिवसातच राज्यसभेतील तेलगु देशमच्या चार खासदारांनी ते भाजपमध्ये प्रवेश करीत असल्याची घोषणा केली. राज्यसभेत तेलगु देशमचे सहा सदस्य होते व त्यापैकी चारजणांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या चारजणांपैकी तिघांविरुध्द आर्थिक गैरव्यवहाराची प्रकरणे आहेत. वाय.एस.चौधरी हे गेल्या मोदी मंत्रिमंडळात मंत्री होते आणि तेलगु देशमने भाजपपासून फारकत घेतल्यानंतर त्यांचे मंत्रीपद गेले होते. त्यानंतर त्यांच्याविरुध्द एक बँक फसवणुकीचे प्रकरण उघडकीस येऊन त्यांची चौकशी सुरु झाली. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान रमेश आणि वेंकटेश या दोघांविरुध्द प्राप्तीकर विभाग आणि एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट(इडी) यांनी कारवाई करुन त्यांची घरे व कार्यालये यांच्यावर छापे मारले होते. थोडक्यात या मंडळींनी तेलगु देशमला धोका देऊन भाजपला शरण जाणे पसंत केले व त्यांच्या मागे विविध तपाससंस्थांचा लागलेला ससेमिरा चुकविण्याचा मार्ग निवडला. येथपर्यंत ठीक आहे. कारण कुणामागेही सरकारने ससेमिरा लावल्यानंतर त्याचा मुकाबला करण्याची ताकद सर्वांमध्येच असते असे नाही आणि त्यामुळेच सूडबुध्दीचे खुनशी राजकारण करणाऱ्या पक्षांना शरण जाणे हा सोयीचा मार्ग राजकारणी निवडतात आणि आपले राजकीय व आर्थिक हितसंबंध अबाधित राखतात.

हे चारजण आणि भारतीय राष्ट्रीय लोकदलाचे एक सदस्य अशा फुटीरांमुळे भाजपची राज्यसभेतली सदस्यसंख्या 76पर्यंत पोहोचली आहे. राज्यसभेत आपले संख्याबळ वाढविण्यासाठी भाजपने जिवाचा आटापिटा लावला आहे. कारण एकदा राज्यसभेत बहुमताचा आकडा गाठल्यानंतर त्यांना पाहिजे तसे कायदे करणे किंवा पूर्वीच्या कायद्यांमध्ये वाटेल तसे बदल करणे त्यांना शक्य





होणार आहे. त्यासाठी ही धडपड आहे. भाजपच्या या राजकारणावर काहीजणांनी मार्मिक टिप्पणी केली. ज्याप्रमाणे दहशतवाद्यांसाठी शरण योजना जाहीर केली जाते. त्याचप्रमाणे भाजपतर्फेही कोणत्या ना कोणत्या प्रकरणात अडकलेल्या राजकारणी पुढाऱ्यांसाठी 'शरण योजना' जाहीर करण्यात आलेली आहे. 'भाजपला शरण या आणि आपल्यामागील कायदेशीर ससेमिरा थांबवा' असे या योजनेचे मुख्य सूत्र आहे. थोडक्यात भाजपने कोणताही विधिनिषेध न पाळता पक्षाचा विस्तार करण्याचे धोरण अवलंबिले आहे.

या ज्या चार खासदारांनी पक्षांतरविरोधी कायद्याचा त्यांच्या मनानुसार अर्थ लावून पक्षांतर केले आहे ती बाब त्यांच्या अंगाशी आल्याखेरीज राहणार नाही. पक्षांतर विरोधी कायद्याच्या (दहावे परिशिष्ट) तरतुदींना सरळसरळ हरताळ फासून हे पक्षांतर करण्यात आले आहे. ज्यांना या तरतुदींची माहिती नाही किंवा त्यातील शब्दांचा निश्चित अर्थ व हेतु लक्षात न घेता केवळ ऐकीव समजांच्या आधारे हे पक्षांतर झाले आहे असे म्हणावे लागेल. लोकसभेचे माजी सचिव पीडीटी आचारी यांनी लिहिलेल्या एका लेखानुसार या चार खासदारांचे पक्षांतर कायद्यानुसार नाही. मूळ कायद्यातील तरतुदीकडे बारकाईने पाहिल्यास त्यामध्ये एका राजकीय पक्षाच्या अन्य राजकीय पक्षामधील विलीनीकरणाचा मुद्दा मांडण्यात आला आहे. मूळ पक्षांमधील विलीनीकरण, त्यास विधिमंडळ सदस्यांपैकी दोन-तृतीयंश सदस्यांची मंजुरी असेल तरच ती प्रक्रिया वैध मानण्यात येईल असे या तरतुदीत नमूद करण्यात आलेले आहे. म्हणजेच जर दोन-तृतीयांश विधिमंडळ व संसदसदस्यांनी या विलीनीकरणाला मंजुरी दिली तरच ते वैध ठरेल. अन्यथा नाही असे या परिशिष्टातील चौथ्या परिच्छेदात म्हटलेले आहे. जर या दोन-तृतीयांश सदस्यांनी त्यास मंजुरी दिली नाही तर ते विलीनीकरण मान्य होणार नाही असेही त्यात म्हटले आहे.

थोडक्यात या तरतुदीनुसार तेलगु देशम पक्षाचे भाजपमध्ये विलीनीकरण हा मुद्दाच उपस्थित होत नाही. कारण ते घडलेले नाही. त्यामुळे अशा विलीनीकरणाला विधिमंडळ सदस्यांपैकी दोन-तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा किंवा विरोध करण्याचा मुद्दाही उपस्थित होत नाही. त्यामुळे या चारजणांनी त्यांना सोयीचा असा या कायद्याचा अर्थ लावून राज्यसभेतील सहा सदस्यांपैकी चारजणांनी त्यांचा पक्ष भाजपमध्ये विलीन करण्याचा निर्णय केल्याचे जाहीर करणे म्हणजे या कायद्याचा चुकीचा अर्थ लावणे आहे असेही आचारी यांनी म्हटले आहे. या चार खासदारांनी फार सोपा अर्थ लावून आपली कृति वैध ठरविण्याचा प्रकार केला आहे. विधिमंडळ किंवा संसदीय पक्ष म्हणजे फक्त राज्यसभेतील पक्ष असा अर्थ त्यांनी लावलेला आहे. वस्तुतः एखाद्या पक्षाच्या

संसदीय किंवा विधिमंडळ पक्षाचा उल्लेख केला जातो त्यामध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहातील त्या पक्षाच्या सदस्यांचा समावेश असतो. म्हणजेच लोकसभा व राज्यसभा मिळून संसदीय पक्ष मानला जातो. राज्यांच्या पातळीवर जर विधिमंडळ दोन सभागृहांचे म्हणजेच विधानसभा व विधानपरिषद असे असेल तर त्या दोन्हीतील सदस्य मिळून विधिमंडळ पक्ष मानण्याची प्रथा आहे. येथे तेलगु देशमच्या फुटीर खासदारांनी केवळ राज्यसभेतील सहापैकी चार खासदारांनी म्हणजेच दोन-तृतीयांश खासदारांनी त्यांचा पक्ष विलीन करण्याचे ठरविल्याचेजाहीर करुन भाजप प्रवेशाचा जल्लोष करुन टाकला. भाजपला राज्यसभेत संख्याबळ वाढविण्याची आगतिकता असल्याने त्यांनीही या संशयास्पद कृतीला मान्यता देऊन टाकली.







परंतु मोठा विजय मिळाल्यामुळे त्यामागे सर्व काही लपून जाईल या समजुतीने बिनदिक्कतपणे भाजपचे नेतृत्व या सर्व कृतींना पाठिंबा देत सुटले आहे.

या सर्व गोष्टींचा एकच अर्थ आहे. केवळ केंद्रात सत्ता मिळून भाजपच्या नेतृत्वाची व सूत्रधारांची भूक भागलेली नाही. त्यांना सर्व राज्यांमध्ये त्यांची सत्ता व सरकारे हवी आहेत. त्यासाठी ते कोणत्याही थराला जायला तयार आहेत. जम्मू-काश्मीरसारख्या संवेदनशील राज्याचा देखील यामध्ये समावेश आहे. या मुस्लिम बहुसंख्यक राज्यात देखील आपली सत्ता कशी स्थापन होईल याचे मनसुबे भाजपचे सूत्रधार आखत आहेत. त्यासाठी प्रसंगी या राज्यातील मतदारसंघांची फेररचना, राज्याचे त्रिभाजन अशा विविध उपायांवर विचार सुरु आहे. काश्मीर ते कन्याकुमारी(उत्तर ते दक्षिण) आणि गुजरात ते ईशान्य भारत(पश्चिम ते पूर्व) अशा चार दिशांमधील प्रत्येक राज्यात भाजपचे सरकार अस्तित्वात आणण्याच्या महत्वाकांक्षेने पक्षाचे नेतृत्व सूत्रधार पछाडलेले आहेत. त्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. महत्वाकांक्षा असणे अनुचित नाही. परंतु तिच्या पूर्ततेसाठी प्रसंगी अवैध, अयोग्य व अनुचित मार्गांचा अवलंब करणे ही बाब आक्षेपार्ह आहे. परंतु भाजपने आता विधिनिषेधशून्यतेचा अवलंब केला आहे. यामध्ये लोकशाही, लोकशाही संस्था व कायदे यांचा देखील बळी जाऊ शकतो!


परंतु लोकसभेतील तीन व राज्यसभेतील सहा खासदार मिळून तेलगु देशमच्या संसदीय पक्षाची सदस्यसंख्या नऊ होते व त्याच्या दोन-तृतीयांश म्हणजे सहा खासदार होतात. त्यामुळे हा आधार चुकीचा असला तरी त्या आधारावर देखील या फुटीरांचे पक्षांतर वैध ठरु शकत नाही. थोडक्यात काय वाटेल त्या म्हणजेच वैध-अवैध मार्गाने आपला पक्ष कसा वाढविता येईल यासाठी भाजपची आगतिकता वाढत चाललेली दिसते.


# राजकारणात कुणीच कायम शत्रु/मित्र नसतात!


**अवलोकितेश्वर**



भारतीय राजकारणात अनेक राजकीय पक्ष आहेत. निवडणुकीतल्या पराभवाने एखाद्या पक्षाला काहीशी किंवा अगदी मोठी देखील पीछेहाट सहन करावी लागली तरी तो पक्ष कायमस्वरुपी संपला असे मानता येत नाही. कारण भारतात कोणताही राजकीय पक्ष नामशेष होतो ही विश्वास ठेवता न येण्यासारखी बाब आहे.





लोकसभेची निवडणूक संपली आहे. या निवडणुकीने भारतीय राजकारणात अनेक तरंग उमटवले आहेत. प्रत्येक निवडणुकीची जमा बाजू असते आणि काही वजा बाजूही असते. ही निवडणूक त्याला अपवाद ठरली नाही. या निवडणुकीने नरेंद्र मोदी व अमित शहा यांना भारतीय राजकारणात एक निर्णायक स्थान दिले. दुसरीकडे विरोधी पक्षांच्या राजकारणातील परंपरागत असे काही मोहरे निखळताना आढळले. त्यात मुलायमसिंग, लालूप्रसाद यांची नावे समाविष्ट होतील. त्याचबरोबर काही कमजोर व दुर्बळ झालेल्या नेत्यांना या निवडणुकीने बळ दिले. यात नीतीशकुमार, नवीन पटनाईक यांचा समावेश करावा लागेल. तेलगु देशमचे नेते व आंध्र प्रदेशाचे

माजी मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांची फार मोठी पीछेहाट या निवडणुकीत झाली परंतु तेथील राजकारण तूर्तास तेलगु देशम व वायएसआर काँग्रेस या दोनच पक्षात विभागलेले असल्याने ही पीछेहाटही किती काळ राहते याचा अंदाज घेण्यासाठी अद्याप वाव आहे. पश्चिम बंगालमध्येही ममता बॅनर्जी यांची पीछेहाट झाली आहे. ही एक धोक्याची घंटा त्यांच्यासाठी आहे. यापासून काही शहाणपण शिकून त्या आपली आगामी राजकीय रणनीती कशी तयार करतात त्यावर त्यांचे भवितव्य अवलंबून राहील. डावे किंवा मार्क्सवादी यांची घसरण व खालावलेपण कायम राहिले आहे. या डाव्या शक्तींनी कालानुरूप त्यांच्या भूमिकांमध्ये बदल न केल्यास त्यांचा भविष्यकाळ फारसा उज्ज्वल मानता येणार नाही.

2019 मध्ये 17व्या लोकसभेसाठी झालेल्या निवडणुकीच्या सुरुवातीपासून राजकीय पंडित एक आडाखा सातत्याने मांडत होते की ही निवडणूक मुख्यतः भाजप विरुध्द विविध प्रादेशिक पक्ष यांच्यात होणार आहे. भाजपला अडविण्याची ताकद काँग्रेसमध्ये राष्ट्रीय पक्ष या नात्यानेही नाही. त्यामुळे भाजपची घोडदौड अडविण्याची क्षमता प्रादेशिक पक्षांमध्येच असेल आणि त्यामुळेच निवडणुकीनंतर भारतीय राजकारणात पुन्हा एकदा प्रादेशिक पक्षांच्या संयुक्त राजकारणाचे एखादे पर्व सुरु होईल. दुर्दैवाने हा अंदाज खरा ठरला नाही. प्रादेशिक पक्षांना भाजपच्या अमाप साधनसंपत्ती आणि हिंदुत्व व राष्ट्रवादावर आधारित प्रचाराला प्रभावी प्रत्युत्तर देता आले नाही. परिणामी काँग्रेसच्या पराभवाबरोबरच प्रादेशिक पक्षही विस्कळित झाले. त्यातून वर्तमान राजकीय पोकळीची परिस्थिती निर्माण झाली. अर्थात राजकारणात अशी पोकळी दीर्घकाळ रहात नाही आणि राजकारणाची चैतन्यशीलता अशी असते की बघताबघता ती पोकळी भरली जात असते. ही परिस्थिती यथास्थिती रहात नसते !





भारतीय राजकारणात अनेक राजकीय पक्ष आहेत. निवडणुकीतल्या पराभवाने एखाद्या पक्षाला काहीशी किंवा अगदी मोठी देखील पीछेहाट सहन करावी लागली तरी तो पक्ष कायमस्वरुपी संपला असे मानता येत नाही. कारण भारतात कोणताही राजकीय पक्ष नामशेष होतो ही विश्वास ठेवता न येण्यासारखी बाब आहे. रिपब्लिकन पक्षाचे अनेक तुकडे झाले, अनेक शकले झाली. पण आजही हा पक्ष कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अस्तित्वात आहे हे मान्य करावेच लागेल. याच पक्षाच्या एका गटाचे नेतृत्व करणारे रामदास आठवले आज केंद्रात राज्यमंत्री आहेत हेही येथे लक्षात ठेवावे लागेल. त्यामुळे एखाद्या पक्षाची राजकीय पीछेहाट झाली याचा अर्थ तो पक्ष संपला असा लावता येणार नाही. मुलायमसिंग यांचे वय, प्रकृती आणि आरोग्य या कारणांमुळे

त्यांची राजकारणातली सक्रियता कदाचित कमी झाली असेल परंतु त्यांनी स्थापन केलेला समाजवादी पक्ष अस्तित्वात आहे आणि त्यांचे चिरंजीव त्याची धुरा सांभाळत आहेत. त्याचप्रमाणे लालूप्रसाद हे त्यांच्या विरोधातील गैरव्यवहाराची प्रकरणे आणि त्यावरील कायदेशीर कारवाई यामुळे सक्रिय राजकारणापासून दूर झालेले असले तरी त्यांचाही पक्ष त्यांचे चिरंजीवच चालवीत आहेत. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाला बिहारमध्ये खातेही उघडता आले नाही. याचा अर्थ त्यांचा पक्ष संपला असा होत नाही. बिहार विधानसभेत हा पक्ष अद्याप शाबूत आहे. विशेष म्हणजे अजुनही या पक्षातून फाटाफूट होण्यास सुरुवात झालेली नाही. थोडक्यात सारांशाने एवढेच म्हणावे लागेल की काही तात्कालिक प्रसंगांनी एखाद्या पक्षाला पराभूत व्हावे लागले, संख्याबळ मोठ्या प्रमाणात घटले तरीही तो पक्ष संपला असा निष्कर्ष काढता येणार नाही.

पक्ष संपत नाहीत हे तत्वतः मान्य केले तरी वास्तवात व व्यवहारातील परिस्थितीही विचारात ही घ्यावीच लागते. विशेषतः या सर्व पराभूत पक्षांसमोर प्रमुख प्रतिस्पर्धी पक्ष म्हणून भाजपसारखा ताकदवान व साधनसंपत्तीने समृध्द असा राजकीय पक्ष असेल तर मात्र परिस्थितीची चिकित्सा अधिक काटेकोरपणे आणि व्यावहारिक पध्दतीने करणे योग्य ठरेल. भाजप आणि या पक्षाच्या नेतृत्वाने विरोधी पक्षांमध्ये फाटाफूट करणे, जेथे त्यांची सरकारे असतील ती पाडण्यासाठी त्यांच्या पक्षांना खिंडारे पाडणे असे प्रकार सुरु केलेले आहेत. त्यामुळे मुळात पराभूत झालेल्या पक्षांना स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचे एक मोठे आव्हान सध्या आहे. त्यामुळे एकतर भाजपला शरण जा अथवा पक्षातील फाटाफुटीला तोंड द्या अशा कैचीत विरोधी पक्ष सापडले आहेत. एकेकाळी पक्षांमधील कार्यकर्ते हे काही निष्ठा बाळगत असत. परंतु आता राजकारण धंदा आणि 'करियर' झाल्याने जेथे लाभ व फायदा अधिक तिकडे जाण्याकडे कार्यकर्ते किंवा नेत्यांचा कल असतो. त्यामुळेच पराभव झाल्यानंतर पक्ष टिकवून धरण्याचे एक मोठे दिव्य त्या पक्षाच्या नेतेमंडळींना सहन करावे लागते. ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस, चंद्रबाबूंचा तेलगु देशम पक्ष, काँग्रेस व अन्य प्रादेशिक पक्षांना सध्या याच परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे.

विरोधी पक्षांच्या गोटात ही विस्कळित अशी परिस्थिती असली तरी त्यातून देखील राजकीय फेरजुळणीच्या नव्या समीकरणांची चाहूल किंवा संकेत मिळू लागले आहेत. भाजपला लोकसभेत 'तीनशे पार' म्हणजे 303 जागा मिळाल्या. यानंतरही भाजपच्या नेतृत्वाने ते आघाडीधर्माला जागून भाजपबरोबर आघाडी केलेल्या राजकीय पक्षांना केंद्रीय मंत्रिमंडळात जागा देतील असे उच्चरवाने सांगितले. प्रत्यक्षात या घटक किंवा मित्रपक्षांना 'प्रतीकात्मक प्रतिनिधित्व' असे सूत्र पुढे करुन केवळ एकच कॅबिनेट मंत्रीपद देऊन बोळवण करण्याचे धोरण भाजपने अवलंबिले. अकाली दलाने तो 'फॉर्म्युला' स्वीकारला कारण त्यांचे फक्त दोनच सदस्य लोकसभेत निवडून आले आहेत. तरीही अकाली दलाच्या हरसिम्रत कौर बादल यांना अन्न प्रक्रिया सारखे चांगले खाते देण्यात आले. शिवसेनेचे 18 सदस्य निवडून येऊनही शिवसेनेला अत्यंत हिणकस, बिनमहत्वाचे असे









अवजड व सार्वजनिक उद्योग खाते देण्यात आले. रामविलास पास्वान यांचे सहा सदस्य निवडून आले आणि पास्वान यांचे अन्न व नागरीपुरवठा खाते कायम ठेवण्यात आले. पूर्वीच्या मंत्रिमंडळात अपना दलच्या अनुप्रिया पटेल यांना आरोग्य राज्यमंत्रीपद देण्यात आले होते. पण यावेळी त्यांना वगळण्यात आले.

या पार्श्वभूमीवर भाजपचा बिहारमधील मित्रपक्ष संयुक्त जनता दल आणि या पक्षाचे नेते मुख्यमंत्री नीतीशकुमार यांनी



काहीशी कडक भूमिका घेऊन प्रतीकात्मक प्रतिनिधित्वाची भाजपची कल्पना फेटाळून लावली आणि केंद्रीय मंत्रिमंडळात भाजपकडून देऊ करण्यात आलेले एक कॅबिनेट मंत्रीपद नाकारले. नीतीशकुमार एवढेच करुन थांबले नाहीत. त्यांनी लगोलग बिहारमध्ये त्यांच्या राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करताना केवळ त्यांच्या पक्षाच्या आठ मंत्र्यांचा समावेश करुन भाजपला ते कमजोर नसल्याचा संदेश दिला. लोकसभा निवडणुकीत नीतीशकुमार यांच्या पक्षाला चांगला फायदा झाला आणि त्यांच्या सोळा जागा निवडून आल्या. त्यामुळेच नीतीशकुमार यांनी काहीशी आक्रमक भूमिका घेतली. एवढ्यावर नीतीशकुमार थांबले नाहीत. त्यांनी काश्मीरला विशेष दर्जा प्रदान करणाऱ्या राज्यघटनेतील कलम 35(अ) आणि 370 ही रद्द करण्याच्या भाजपच्या संभाव्य कृतीला विरोध केला. या कलमांप्रमाणेच, समान नागरी संहिता आणि राम मंदिर यासंदर्भातही त्यांनी भाजपच्या विरोधात भूमिका जाहीर केली. या मुद्यांवर संयुक्त जनता दलाची भूमिका पूर्वीप्रमाणेच कायम आहे असे सांगून त्यांनी समान नागरी संहिता आणण्याचे प्रयत्न झाल्यास त्याला विरोध करण्यात येईल हे स्पष्ट केले. नीतीशकुमार यांनी ही आक्रमक भूमिका घेण्याचे कारण काय ? सध्या बिहारमध्ये लालूप्रसाद यांचे व्यापक व्यक्तिमत्व व नेतृत्व अस्तित्वात नाही. लालूप्रसाद हे तुरुंगात खितपत आहेत आणि त्यांची प्रकृति त्यांना साथ देईनाशी झाली आहे. त्यांचे चिरंजीव तेजस्वी हे तरुण असले तरी अद्याप त्यांना परिपक्व राजनेता म्हणून लोकांनी स्वीकारलेले नाही हे लोकसभा निवडणुकीच्या निर्णयाने सिध्द झाले आहे. लालूप्रसाद यांच्या राष्ट्रीय जनता दल बिहारमध्ये आपले खाते देखील खोलू शकला नाही. राष्ट्रीय जनता दलाला शून्य जागा मिळाल्या. याचाच अर्थ बिहारमधील राजकीयदृष्ट्या अतिशय जागरूक अशा मतदारांनी लालूप्रसाद यांच्यापेक्षा नीतीशकुमार यांना अधिक पसंती दिली. बिहारमधील 'ओबीसी' किंवा 'मंडल-सामाजिक न्याय शक्ति' यांचे नेतृत्व नीतीशकुमार यांच्याकडे एकवटले गेले असेच काहीसे चित्र आढळून येऊ लागले. यामुळेच लोकसभा निवडणुकीनंतर लालूप्रसाद यांच्या पत्नी राबडीदेवी यांचे एक फार सूचक निवेदन प्रसिध्द झाले होते. त्यांनी नीतीशकुमार यांना आवाहन करुन 'ओबीसी' शक्तींचे नेतृत्व करण्याचे आणि त्यांची अनुकूलता असेल तर पुन्हा एकत्र किंवा संयुक्त सरकार स्थापनेची



कल्पना मांडली होती. नीतीशकुमार यांच्याकडून त्याला प्रतिसाद दिला गेला नाही. परंतु त्यांनी प्रतिक्रिया दिलेली नसली तरी त्यांच्या मनात तशी काही कल्पना नसेलच असे म्हटता येणार नाही.

नीतीशकुमार हे अतिशय हुशार, चाणाक्ष आणि चतुर राजकारणी आहेत. ते त्यांचे पत्ते व्यवस्थित खेळत असतात. त्यामुळे वर्तमान राजकीय परिस्थितीत कशी पावले टाकायची हे त्यांनी बहुधा जाणले असावे. आज देशाच्या एकंदर राजकीय चित्रावर नजर टाकल्यास वाताहात आणि विस्कळित झालेले विरोधी पक्ष अशी स्थिती दिसून येते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, डावे पक्ष, समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष आणि लालूप्रसाद यांचा राष्ट्रीय जनता दल, चंद्रबाबूंचा तेलगु देशम पक्ष या सर्वांना पराभवाचा दणका बसलेला आहे. या परिस्थितीत या विस्कळित विरोधी पक्षांकडे नेतृत्वाची देखील पोकळी दिसून येत आहे. राहूल गांधी यांनी पराभवानंतर अध्यक्षपद सोडून देऊन त्यावर ते अडून बसले आहेत. ममता बॅनर्जी त्यांच्या राज्यातली लढाई लढत आहेत. चंद्रबाबू देखील राज्यातच अस्तित्वासाठी संघर्ष करीत आहेत. थोडक्यात अशा या राजकीय पोकळीत नीतीशकुमार यांनी वेगळा मार्ग चालण्याचे ठरविल्यास ही पोकळी ते भरुन काढू शकतात. नीतीशकुमार यांनी भले लालूप्रसाद यांना धोका दिला असेल परंतु त्यांनी आपल्या स्वच्छ प्रतिमेची जपणूक केली. लालूप्रसाद यांना धोका देण्याबद्दल त्यांना प्रचंड टीकेला तोंड द्यावे लागले परंतु त्यांनी त्यास प्रत्युत्तर न देता ती टीका पचवली. त्यामुळे



त्यांच्या राजकीय संधीसाधुपणाबद्दल विरोधी पक्षांच्या मनात शंका असल्या तरी कडवटपणा किंवा कटुता राहिलेली नाही. सध्याची ही परिस्थिती नीतीशकुमार यांना अनुकूल अशीच आहे. त्यांनी पावले व्यवस्थित टाकल्यास ते या विस्कळित विरोधी राजकारणाला मार्गावर आणू शकतील.

देशाच्या राजकीय बुध्दीबळावर नीतीशकुमार कोणत्या पध्दतीने सोंगट्या पुढे सरकवीत आहेत हे सर्वांच्या समोर आहे. ते लपून राहिलेले नाही. बहुधा याची किंचितशी कल्पना भाजपच्या चाणाक्ष सूत्रधारांना आली असावी. त्यामुळेच बिहारमध्ये अलीकडेच बालकांमधील मेंदुज्वराच्या साथीचा प्रकोप व शंभराच्या आसपास मृत्युमुखी पडलेली बालके यावरुन त्यांच्या विरुध्द प्रचंड देशव्यापी गदारोळ उडवून देण्यात आला. यामध्ये केंद्र सरकार पुरस्कृत काही संस्था, वाहिन्या आघाडीवर राहिल्या. हा एक प्रकारे नीतीशकुमार यांना संदेश असावा की तुम्ही फार वेगळी राजकीय पावले टाकण्यास सुरुवात केल्यास काय होऊ शकते. त्याची चुणुक बहुधा दाखविण्यात आली असावी. अर्थात या प्रकाराची नीतीशकुमार यांनाही सवय आहे. तेही एक मुरलेले राजकारणी आहेत. त्यामुळे त्यांनीही या पेचप्रसंगातून व्यवस्थित मार्ग काढला.

राजकारणात, प्रेमात आणि युध्दात सर्व काही क्षम्य असते. त्याचप्रमाणे राजकारणात कुणीही कायमस्वरुपी मित्र नसतात किंवा कायमस्वरुपी शत्रुही नसतात. या नियमाचा प्रत्यय उत्तर प्रदेशात आला. एकमेकाचे कट्टर विरोधी असलेले मायावती व मुलायमसिंग एकाच व्यासपीठावर आले. अखिलेश व मायावती यांनी परस्परांशी निवडणूक समझोता केला. निवडणूक एकत्रितपणे लढवली. परंतु निवडणुकीनंतर पुन्हा दोन्ही पक्ष विभक्त झाले. बिहारमधील राजकीय चक्र पुन्हा एकदा फिरताना किंवा वळण घेताना आढळत आहे. त्यातून कदाचित विरोधी पक्षांच्या एकत्र येण्याची प्रक्रिया पुन्हा सुरु होऊ शकेल काय या प्रश्नावर चर्चा सुरु आहे. आगामी काळात याची उत्तरे मिळत जातील.







**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी २७ जून २०१९ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेत नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा झाली. या चर्चेत भाग घेताना विधान परिषदेतील राष्ट्रवादीचे प्रतोद आमदार हेमंत टकले यांनी केलेले हे भाषण.**

"मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची मागणी बरीच जुनी असून शासनाकडे पाठपुरावा करुन सुध्दा शासनाने अद्यापही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्याबाबत कोणतेही प्रयत्न न करणे, राज्यात उत्तम इंग्रजीसह उत्तम मराठी असे धोरण शासनाने स्विकारुन इंग्रजी व अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते बारावी पर्यंत सक्तीने मराठी भाषा शिकविण्याचा कायदा करावा अशी मागणी करण्यात येत असून त्या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यामध्ये शासनाचा मराठी भाषेकडे पाहण्याचा दृष्टीकोन उदासिन असल्याचे आढळून येणे, मा. शिक्षण मंत्र्यांनी राज्यात मराठीची कायद्याने सक्ती करता येणार नाही असे विधान सभागृहात केल्याने मराठी प्रेमी नागरीकांत पसरलेली निराशेची भावना, मा. शिक्षण मंत्र्यांनी केलेल्या विधानामुळे मुंबई शहरासह राज्यात इतरत्रही मोठ्या संख्येने मराठी शाळा बंद पडत असून इंग्रजी शाळांना सुलभ मंजुरी महाराष्ट्र सेल्फ फायनान्स स्कुल अॅक्ट, २०१२ अंतर्गत मिळत असल्यामुळे खेड्यापाड्यात सुध्दा इंग्रजी शाळा मोठ्या प्रमाणात सुरु असणे, इंग्रजी भाषेचा आपल्या राज्य भाषेवर होणारा धोका लक्षात घेऊन तामिळनाडू, तेलंगणा, गुजरात व पश्चिम बंगाल या राज्यात त्यांची भाषा सक्तीने शिकविण्याचा निर्णय जाहीर केला जात असणे, अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी काही कसोट्या निश्चित करण्यात आलेल्या आहेत, या कसोट्या मराठी भाषा निश्चितपणे पुर्ण करीत असणे, मराठी भाषेबाबत सर्व प्रक्रिया पूर्ण झालेली असून केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या भाषा तज्ज्ञांच्या समितीने या विषयावर सखोल अभ्यास करत अनेक पुरावे व संदर्भाचा आधार घेतला असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी शिफारस एकमताने केंद्र शासनाकडे करुन सुध्दा सुमारे साडेचार वर्षे उलटूनही यावर अद्याप कोणताही निर्णय न घेणे, मराठी भाषा साहित्य व संस्कृतीसाठी काम करणा-या राज्यातील २० संस्थांनी एकत्र येऊन मराठीच्या संदर्भात विविध मागण्यांसह मुंबईतील आझाद मैदानात धरणे आंदोलन करण्याचा घेतलेला निर्णय, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा उद्देश, याबाबत शासनाची करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभाप्रती महोदय, मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासंबंधीची ही चर्चा उपस्थित करण्याची संधी दिली, त्याबाबत मी आपले आभार मानतो. दुर्दैव असे आहे की, या भाषिक राज्य निर्मिती नंतर १९६० नंतर भाषा या अस्मितेच्या विषयासाठी या सभागृहातील सदस्य देखील किती काळजी घेतात, याचे एक दृश्य स्वरुप आता मला या सभागृहात दोन्ही बाजूला दिसत आहे. मी केवळ एका बाजूनेच म्हणत नाही. आमच्या सुदैवाने राज्याच्या

# धुगधुगीला आलेली मराठी भाषा




भल्यासाठी मराठी भाषा विभाग सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांच्याकडे दिल्यानंतर अगदीच ज्याला आपण म्हणू शकतो "धुगधुगीला आलेला हा मराठी भाषेचा प्राण, आपण पुन्हा त्याच्यात फुंकर घालून व्यवस्थित करण्यासाठी मनापासून प्रयत्न केले. त्यामुळे या चर्चेच्या सुरुवातीलाच मी आपल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

आज मराठी भाषा आणि मराठी माध्यमाच्या शाळा हा महत्त्वाचा विषय आहे. आज या ठिकाणी मला सुरुवातीलाच एक आदरांजली व्यक्त करायची आहे. ती आदरांजली दादर येथील साने गुरुजी शाळेच्या निमित्ताने व्यक्त करायची आहे. ७५ वर्षांपूर्वी म्हणजे १९४० मध्ये ही शाळा दादरला स्थापन झाली. दादर म्हणजे मराठी मुलुख. त्यामुळे ही शाळा १९४० मध्ये स्थापन झाली. १९५५ मध्ये थोर समाजसेवक श्री.प्रकाशभाई मोहाडीकर यांनी या शाळेची धुरा सांभाळली. आपल्या पिढीपर्यंत हे नाव माहिती असेल, त्यानंतरच्या पिढीला कोण प्रकाशभाई मोहाडीकर हे सांगण्याची वेळ आपल्यावर येईल, ही शक्यता नाकारता येत नाही. आता योगायोगाने मराठी शाळा बंद पडण्याचा विषय चर्चेला येत आहे, हेच वर्ष श्री.प्रकाशभाई मोहाडीकरांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. आताची स्थिती या शाळेची अशी आहे की, या मराठीच्या प्राथमिक शाळेमध्ये गेल्या वर्षी केवळ २० विद्यार्थी होते. त्यापैकी केवळ १२ विद्यार्थी पास होऊन पाचवीत गेले. केवळ आठ विद्यार्थी उरल्यामुळे ती प्राथमिक शाळा बंद पडली. पहिल्या मराठीच्या इयत्तेत एकही प्रवेश नाही.

दादरसारख्या मराठी प्राबल्य असलेल्या भागातील मराठी प्राथमिक शाळेची ही जर अवस्था असेल तर ते योग्य नाही. आपण सातत्याने जे म्हणत असतो की, मराठी टक्का घसरलेला आहे. मराठी टक्का कमी होत आहे. या सगळ्या गोष्टी आपण मांडतो, त्यावेळी आपण याबाबत काहीच करु शकत नाही का अशा प्रकारचा प्रश्न निर्माण होतो. हा मराठी टक्का मुंबईतून घसरत आहे. याकरिता कोण कारणीभूत आहे ? येथील मराठी माणसे जायला लागली आहे का ? भाषावार प्रांतरचना केल्यानंतर मराठी भाषेचे सार्वभौमत्व किमान महाराष्ट्रात असावे, असा जर उद्देश असेल, तर आज आपण कोणत्या स्तरावर जाऊन पोहोचलो आहोत.

गोवा स्वातंत्र्यसंग्रामाचे सेनानी श्री.मोहन रानडे होते. ते गोव्यामध्ये मराठी शाळेत मराठी भाषेचे शिक्षक होते. पोर्तुगीजाच्या राजवटीविरुध्द एक शिक्षक पेटून उठल्यानंतर काय आंदोलन करु शकतो,हाच गोवा मुक्ती संग्रामाचा लढा आहे. पोर्तुगीज सरकारने त्यांना तुरुंगात टाकले. पंधरा वर्षे त्यांनी तुरुंगवास सोसला. पंधरा वर्षानंतर भारताच्या विनंतीनंतर पोर्तुगाल सरकारने त्यांची सुटका केली. शेवटपर्यंत ते आल्यानंतर आपल्या आयुष्याच्या आरंभी

ठरविलेले ध्येय ते पूर्ण झाले, या असीम आनंदात ते राहिले. त्यांनी कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्यसैनिक सुविधांची मागणी केली नाही. त्यामुळे काही मिळते का याचा विचार केला नाही. त्यांनी रचनात्मक कामात आयुष्याचा पट घालविला. अशा एका शिक्षकामुळे क्रांति होऊ शकते. तो मराठी भाषेचा शिक्षक असू शकतो. त्यामुळे मी आज या विषयाच्या निमित्ताने स्वातंत्र्य सेनानी श्री. मोहन रानडे यांच्या प्रती श्रध्दांजली अर्पण करतो. हा विषय करीत असताना यामध्ये अनेक गोष्टी आहेत, ज्या आपल्याला निश्चितपणे समोर ठेवाव्या लागतील. यामध्ये जे आंदोलन झाले. २० संस्थांनी मिळून एक मोठे आंदोलन घडविले, यात ज्या मागण्या केल्या, त्यामध्ये प्रामुख्याने मराठी लर्निंग ॲक्ट करणे आवश्यक आहे. शेवटी आपला जो विभाग आहे, त्याला सर्व इंग्रजीमधून लागते. मराठी डेव्हलपमेंट ऑर्थॉरिटी ॲक्ट अशा स्वरुपाचे दोन कायदे करावेत, अशी मागणी शासनाकडे त्यांनी केलेली होती. ही आपल्याला करता येते की नाही त्याकरिता हा कायदा कसा असावा, कोणत्या राज्यांनी तो या अगोदर केलेला आहे, त्यांनी त्यामध्ये काय मागणी केली ? कसे ठरविले ? याबाबत माझ्याकडे आता तामिळनाडू, केरळ, कानडी भाषेबाबतचा ॲक्ट आहे. इतर राज्य हा कायदा करु शकतात, तर आपल्या राज्याला हा कायदा करण्यात काय अडचण आहे? योगायोगाने या संघटना जशा एकत्र आलेल्या आहेत, जे साहित्यिक, समाजसेवक एकत्र आलेले आहेत. त्यांनी शासनाकडे मराठी डेव्हलपमेंट ॲक्टचा ड्राफ्ट पाठविलेला आहे. मला आनंद होत आहे की, परवा हे सगळे शिष्टमंडळ आलेले असताना मराठी भाषा विभाग मंत्री महोदय, मुख्यमंत्री महोदय यांनी एकत्रितपणे या कायद्याच्या मसुद्यावर काम करण्यासाठी एक छोटीशी समिती नेमून हे काम त्यामध्ये होईल. पण यामध्ये मागणी अशी आहे की, याचे प्रारुप शासनाला बनविणे आवश्यक आहे. आणि त्याचा निश्चित कालबध्द कार्यक्रम आखण्याची आवश्यकता आहे. अधिवेशन संपल्यानंतर दिनांक 3 जुलै, 2019 रोजी प्रसिध्द करण्याची आवश्यकता आहे. त्यावेळी लोकांच्या सूचना मागविण्यासाठी 15 दिवसांची मुदत देण्याची आवश्यकता आहे. त्यानंतर आलेल्या सूचनांचा आणि हरकतींचा विचार करुन आचारसंहिता लागण्यापूर्वी अंतिम प्रारुप बनविल्यानंतर अध्यादेश काढता येईल किंवा कसे यासंदर्भातील विचार करावा, अशी माझी नम्र सूचना आहे. या विषयावर बोलताना मला जुन्या गोष्टींची आठवण झालेली आहे. आम्ही सर्वजण मराठी शाळेत शिकलेलो आहे. तेव्हा भिंगरी होती. मी मराठी शाळेतील एक गोष्ट सांगणार आहे. त्यावेळी रुपये आणि पैसे असा उल्लेख केला जात होता. त्यावेळी एका आण्याचे चार पैसे होते. सोळा आण्याचा एक रुपया होता. त्या काळात काम











होणार असेल तर अशा वेळी तुझे काम सोळा आणे होईल असा वाकप्रचार केला जायचा. मी शाळेतील एक धड्याकडे लक्ष वेधणार आहे. एका व्यापाऱ्याला चार मुले असतात. त्या चार मुलांना एकेदिवशी तो बोलावितो आणि प्रत्येक मुलांना एक-एक पैसा देतो आणि तुम्ही त्या पैशाचे दिवसभरात काय केले त्याचे उत्तर मला संध्याकाळी द्यावे, असे त्यांना आवाहन करीत सांगतो. ती सर्व व्यापाऱ्याची मुले आहेत. या ठिकाणी लक्ष्मी आणि सरस्वती हा भाग आणला जात नाही. एका मुलाने एका पैशात









काही गोळ्या विकत घेऊन दुसऱ्या शाळेच्या परिसरात विकल्या. त्या मुलाने एका पैशाचे तीन पैसे केले. असेच तीनही भावांनी केले. परंतु, चवथ्या मुलाने एका पैशाचे तेल आणि वात विकत घेतली. संध्याकाळी वडील घरी आल्यावर मुलांनी एका पैशाचे काय केले अशी विचारणा केली असता, तिनही भावंडावर वडील खुष होऊन म्हणाले की, तुम्ही चांगले काम केलेले आहे. तुम्ही भविष्यात यशस्वी व्हाल असे म्हणाले होते. त्यानंतर वडिलांनी चवथ्या मुलाला एक पैशाचे काय केले अशी विचारणा केली असता, त्याने असे सांगितले की, मी एका पैशात मातीची पणती आणि तेल आणले. त्या पणतीमध्ये तेल आणि वात घातली आणि ती पेटविली. त्यानंतर खोलीभर प्रकाश पडला. म्हणजे प्रत्येक वेळी पैशावाचून आपली सर्व प्रगती अडते हा जो भाग आहे, तो मराठीच्या बाबतीत लागू होऊ नये एवढेच मला सांगावयाचे आहे.

एका पैशात खोलीभर प्रकाश होऊ शकतो. त्यामुळे हा विचार किती मूलगामी होता, तो किती प्राथमिक स्तरावरचा होता, वगैरे गोष्टी आपल्या लक्षात येणार आहे. मराठी प्राधिकरणाची मागणी केली जाते. एमएमआरडीएवर भरपूर चर्चा केली जाते. त्यामध्ये विस्तार, पायाभूत सुविधा वगैरे बाबींचा उल्लेख करतो. अशा प्रकारे शब्द कोसळतात. त्या शब्दांचा आपल्याला निश्चित आदरच करावा लागणार आहे. मग मराठी भाषेसाठी प्राधिकरण का नाही असा माझा प्रश्न आहे. एका प्रांतापुरता वाद होण्यासाठी मी बोलणार नाही. मुंबई महानगरपालिकेत मराठी आणि अमराठी नगरसेवक किती आहेत ? माझी अमराठी नगरसेवकांबद्दल कोणतीही तक्रार नाही. ज्या कुटुंबात जन्माला आलेला असाल, त्याच कुटुंबाची त्याला भाषा येते. परदेशात मराठी भाषेचा किती वापर केला जातो, याचा देखील विचार करण्याची गरज आहे. मी सन 2010 मधील गोष्टीकडे लक्ष वेधणार आहे. मराठी अस्मितेविषयी अमेरिकेतील श्रीमती ॲना फिल्डहाऊस या बोलत होत्या. तसेच रशियन असून, मराठी शिकलेल्या श्रीमती एलिना ग्लुकोवा ही एक तज्ज्ञ होती. त्या दोघी मराठीच्या तज्ज्ञ आहेत. त्यावेळी रिज़न्स ॲण्ड रिजनल कॉन्सेन्सस इन इंडिया या विषयाच्या अनुषंगाने परिषद भरविण्यात आली होती. त्यावेळी सर्व लोक इंग्रजी भाषेत बोलत होते. त्यामुळे तिने इंग्रजी भाषेत बोलण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्यांच्या वरिष्ठांनी सांगितले की, महाराष्ट्राची अस्मिता जपायची असेल तर या ठिकाणी मराठीतच बोलले पाहिजे. ती बाई जन्माने मराठी नाही. भाषा काय करु शकते यासाठी मी उदाहरण दिलेले आहे. या विषयामध्ये कोणीही राजकारण करु नये. दोघांचे मिळून सरकार आहे. प्रत्येक वेळा खाते वाटप किंवा इतर काही गोष्टी असतात. खाता आणि त्या खात्यातून मिळणार काय यामधील उत्पन्नाचा हिशेब मी करीत नाही. मराठी माणसासाठी शिवसेना सातत्याने लढत आहे. मराठी भाषेसाठी मंत्रालय स्थापन केल्यानंतर शिवसेनेने राज्यमंत्री पद मागायला हवे होते. निदान तुमचे पार्टिसिपेशन त्याला हवे आहे. यामध्ये वरिष्ठ, कनिष्ठ असा भेदभाव नाही. या सर्व व्यापक

प्रश्नांची चर्चा करण्यासाठी मराठी भाषेवर शिवसेनेच प्रेम असेल तर इतर खाती मागण्यापेक्षा मराठी भाषेच्या खात्यामध्ये श्री. हेमंत टकले... राज्यमंत्री पद आम्हाला द्या असे म्हटले असते तर ते वावगे ठरले नसते. सातत्याने म्हटले जाते की, इंग्रजी भाषा शिकली पाहिजे. पालकांचा आपल्या मुलांना इंग्रजी भाषेत शिकविण्यासाठी कल असतो. त्यामुळे आता इंग्रजी ही ज्ञान भाषा सर्वांनी स्वीकारल्यानंतर काय होईल, यासाठी एका प्रसिध्द मराठी साहित्तीकाच्या पॅकेजची कविता काय आहे ते मी पुढीलप्रमाणे वाचून सांगणार आहे.

"चल चल मुरारी हिरो बनने
इंग्लिश स्कूल में मराठी पढ़ने.
चल चल चल तू भर ले बैग,
टिफिन के साथ कर कल्चर पॅक,
इंग्लिश में सीख के काम करेगा,
पापा कहते हैं नाम करेगा.
बचपन में तेरे बाल हैं झड़ने,
इंग्लिश स्कूल में मराठी पढ़ने,
चल चल मुरारी हिरो बनने.
क्या हुआ गर भुला तू माँ,
माँ भी खुश जब कहेगा ममा,
बाप को भी बोल हैलो डॅड,
वह भी होगा वर्ना सॅड,
चल, चल, चल, तू जीते जी मरने,
इंग्लिश स्कूल में मराठी पढ़ने
चल चल मुरारी हिरो बनने.
काहे कि हिंदी, काहे कि मराठी,
इंग्लिश के हाथ में सब की लाठी,
इंग्लिश में लिखा गया संविधान,
भारतीय भाषाओं का तभी गया प्राण,
अभी नहीं समझेगा लग जा बढ़ने,
चल चल मुरारी हिरा बनने,
इंग्लिश स्कूल में मराठी पढ़ने.
मराठी के बिना सबकुछ चलेगा,
मराठी माणूस भी इंग्लिश बोलेगा,
टूटी फुटी इंग्लिश चलेगी चलना,
सब कुछ बोलना मराठी न बोलना.
तू भी सिखेगा इंग्लिश में लड़ने
इंग्लिश स्कूल में मराठी पढ़ने."

अशी अवस्था आज सर्व लोकांवर आणून ठेवलेली आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर 1960 मधील एका महत्वाच्या गोष्टीकडे मी सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. भाषावर प्रांतरचना झाल्यानंतर मराठी भाषेचा आणि

















मराठी राज्याचा काय संबंध आहे हे स्पष्ट करण्यासाठी मी पुढीलप्रमाणे थोडीशी वाचून माहिती देणार आहे. त्यामुळे मला माननीय पीठासीन अधिका-यांची वाचण्याची परवानगी द्यावी, अशी माझी विनंती आहे. "नवीन मराठी राज्यापासून करावयाच्या अनेक अपेक्षांपैकी आम्हा मराठी भाषिकांची पहिली अपेक्षा अशी आहे की, या राज्यात तरी आम्हाला भाषिक स्वातंत्रता लाभली पाहिजे. स्वातंत्रता या शब्दाचा यौगीक अर्थ मला या ठिकाणी अभिप्रेत आहे. रुढार्थ तितकासा नाही. मनुष्य स्वतंत्र असणे म्हणजे त्याला स्वत:च्या तंत्राने वागता येणे होय, तो भाषिकदृष्ट्या स्वतंत्र असणे म्हणजे आपले दैनंदिन व नैमित्तिक असे सारे व्यवहार त्याला स्वत:च्या भाषेतच पार पडता येणार आहे. या अर्थाने त्याला आपली भाषिक स्वतंत्रता अद्यापी पूर्णपणे लावली आहे असे म्हणता येत नाही. आपला पत्रव्यवहार, आर्थिक व्यवहार, प्रवास, राजकीय कारभार, न्यायदान इत्यादी दैनिक जीवनांच्या कित्येक अंगामधील आचार केवळ मराठीच्या सहाय्याने पार पाडता येत नाही. साधा पैसा पाठविण्याचा प्रसंग आला तर पेई म्हणजे काय ? पानेवाला म्हणजे काय ? हे समजून घेतल्यावाचून भागत नाही. न्यायालयातील अर्ज आणि दरखास्ती आणि कैफियती सादर करता करता आमची अनेक शक्ती गेली अशी माझी हरकत किंवा फिर्याद आहे. या न्यायालयात आमच्या स्त्रियांचा उल्लेख करताना मर्द, कोम यांनीच गर्दी करुन सोडल्याचे निदर्शनास येते. बिचारा भ्रतार क्वचितच दर्शनाला येतो. हे माझे म्हणणे भाषा शुद्धीचा प्रचार आहे असे कृपया समजू नका. मी सचिवालयात किंवा न्यायालयात गेलो की, माझे मला माझ्या भाषेने करिता यावे आणि तसे झालेले पहावयास मिळावे ही अपेक्षा. मला फक्त मराठी येते, माझी भाषा येते, इंग्रजी किंवा हिंदी येत नाही याची ओशाळगत किंवा चोरटेपणा मला वाटता कामा नये हेच माझे मागणे आहे." आपणास इंग्रजी किंवा हिंदी येत नाही याबद्दल आपली माणसे अशी ओशाळगत का वागतात ? माझ्या राज्यात माझी अशी उपेक्षा होऊ नये अशी माझी अपेक्षा आहे.

आपण येथे पर्यावरणाविषयी बराच खल करतो. अनेक चांगल्या वनस्पतींच्या जाती नष्ट होत आहेत. पर्यावरण म्हणजे काय, इंग्रजीमध्ये सांगायचे झाले तर क्लायमेंट चेंज आणि ग्लोबल वॉर्मिंग. या आक्रमण पर्यावरणाच्या मराठी पर्यावरणाला होणाऱ्या संकटात ही मराठी भाषा गुदमरुन रेअर स्पीसीस म्हणून त्याचे म्युझियम करायला लागेल की काय अशी भीती वाटते. आमची मराठी भाषा अशी होती असे पुढील पिढ्यांना सांगावे लागेल काय अशाप्रकारची खंत या निमित्ताने आपल्यासमोर व्यक्त करायची आहे. मी या विषयावर बराच वेळ बोलू शकतो. परंतु एकूण चर्चेला दिलेला वेळ लक्षात घेता मी माझे भाषण आटोपते घेणार आहे. या विषयाच्या संदर्भात आम्हाला मंत्री महोदयांकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी एक प्राधिकरण, कायदा, सक्तीचे मराठी, बारावीपर्यंत मराठी या सर्व गोष्टी करण्याची आज नितांत गरज आहे.

मी शेवटचा मुद्दा मांडतो. आम्हाला इतर भाषांचा दुस्वास नाही. आम्हाला इतर भाषा म्हणजे संकरीत बियाणे वाटतात. भाषांवर सर्व भाषांचे संस्कार होत असतात, आपल्याकडे व-हाडी माणसे मराठी बोलतात आणि कोकणातील माणसे मराठी बोलतात त्यामध्ये खूप फरक असतो. पण ते आपणास

समजते. मच्छिंद्रनाथ कांबळी सारखा माणूस त्यांचे मालवणी भाषेतील नाटक जगभर नेऊ शकतो. "चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमामध्ये श्री.भरत गणेशपुरे आपल्याला व-हाडी भाषेचा लहेचा समजावू शकतो. आता आपणास हे संमिश्रण टाळता न येण्यासारखे आहे.

मी आता इंग्रजाळलेल्या मराठी कवीची कविता वाचून दाखवितो. तो कसा मराठी आणि इंग्रजीचा वापर करतो याचे आपणास उदाहरण म्हणून सांगणार आहे. कविचे नाव अजिंक्य दर्शने आहे.त्यांनी मोबाईलवरील चेंटिंग भाषेसंबंधी कविता केलेली आहे. कवितेचे नाव आहे, बब्ली संध्याकाळ......

बब्ली संध्याकाळ
आपल्या कॉमन चॅट विंडोवरती
उमटलेलं वेगवेगळं स्प्रे पेंटिंग
एकाचवेळी पुसायच्या तयारीत
आपण दोघेही असताना....
अचानक फ्लॅशी गडगडाटी असा
पाऊस सुरु झालाय...
आता सगळंच झालंय धूसर
आणि स्क्रीन झालाय बब्ली..
स्मायलीजचे झालेत
टपोरे पिवळे सिग्नल्स..

अशा प्रकारची आंग्लाळलेली मराठी नव्या पिढीला समजते. त्या मराठीचा स्वीकार करायला आपणास अजिबात हरकत नाही. ही संकरित भाषा आहे.

अशीच भाषा वापरुन श्री.ओंकार कुलकर्णी या कविने जिम पोरी जिम अशी कविता केलेली आहे. आपणास "झिम पोरी झिम पोरी" हे लोकप्रिय लोकगीत माहीत असेल. विशेषत: त्यावेळी श्रावणात ते ऐकावयास मिळत होते. त्या चालीवर केलेली ही कविता आहे.

जिम पोरी जिम
पावर फ्लेक्स जिम
बर्न करो कॅलरी ॲन्ड
बन जाओ स्लिम
जिम पोरी जिम
पॉवर फ्लेक्स जिम
ओ, २० मिनिट ट्रेडमिल मारा
मॅम आज फक्त कार्डीओ करा
स्पीड कमी करा.. स्पीड कमी करा.

तर उत्पल वनिता बाबुराव आपल्या कवितेत म्हणतात की,
सेन्ट्रल पार्कमधल्या सोफ्यांवर
आणि मोनिकाच्या अपार्टमेंटमध्ये
जे उलगडल, ते थोर असतं.

हा सर्व विश्वव्यापी संचार भाषेच्या माध्यमातून होऊ शकतो. अन्य भाषेबद्दल दुस्वास नाही परंतु मराठी वाचविली पाहिजे. मराठी भाषा अस्तंगत होता कामा नये. या सर्व वातावरणातं मराठी पर्यावरण सांभाळले पाहिजे आणि ती केवळ शासनाची भूमिका नाही असे मंत्री महोदय नेहमी सांगत असतात आणि आम्हाला ते मान्य आहे. ही एक सांस्कृतिक चळवळ आहे आणि भाषा हा संस्कृतिचा मोठा ठेवा आहे. भाषेतून संस्कृती जन्माला येते




आणि संस्कृतीमधून अस्मिता येते आणि अस्मितेमधून महाराष्ट्र.. कोणत्याही प्रदेशाच्या नावामध्ये महा असा नाही तो आपल्या महाराष्ट्र राज्याच्या नावामध्ये आहे. ते महाराष्ट्र राज्य महान करायचे असेल तर मराठीचा अभिमान बाळगणा-यांनी सर्वांनी एकत्र येऊन आणि शासनाने आणि समाजाने भक्कम साथ देऊन आपण पुढची वाटचाल करु शकलो तर मला वाटते या निमित्ताने जी चर्चा उपस्थित झालेली आहे त्यास आपणास निश्चितपणे यश मिळेल. हा कोणा एकट्याचा भाग नाही. पंढरीच्यावारीला जसे सर्वजण आपली जातपात-धर्म भेद विसरुन एकत्र येतात आणि वारकरी म्हणून सामील होऊन पंढरीच्या विठूरायाच्या माऊलीचे दर्शन घेतात. माझ्या मराठी मायमाऊलीचे हे दर्शन घेण्यासाठी समस्त महाराष्ट्रातील मराठी भाषिकांना नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व जनतेला मी साद घालत आहे की, आमच्या मराठीच्या माऊलीची पंढरीची वाट जर चालायची असेल आणि हा झेंडा जर सातत्याने उंचावर न्यायचा असेल तर त्यासाठी सर्वांचे प्रयत्न हवेत, सर्वांचे सहकार्य हवेत आणि ते निश्चितपणे मिळेल असा मला विश्वास वाटतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले मनस्वी आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

Best

Compliments

# राष्ट्रवादी काँग्रेसची विधीमंडळ अधिवेशनातील कामगिरी



## चारा छावण्या उभ्या केल्या तिथेही आपले कार्यकर्ते कोण हे बघितले - अजित पवार

मुंबई - या सरकारने सुरुवातीपासूनच दुष्काळाबाबतचे योग्य नियोजन केले नाही... पाण्याचा टँकरची व्यवस्था केली नाही... चारा छावण्या उभ्या करायच्या की चारा डेपो उभा करायचा हेच ठरवण्यात सरकारचा वेळ गेला. चारा छावण्या उभ्या केल्या तिथे ही आपले कार्यकर्ते कोण हे बघितले आणि त्यांनाच मदत केली असा आरोप विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार यांनी केला.

२९३ अन्वये राज्यातील भीषण दुष्काळ प्रश्नावर बोलताना अजितदादा पवार यांनी सरकारवर जोरदार ताशेरे ओढले. आज हवा तसा पाऊस झाला नाही त्यामुळे हिरवा चारा येईपर्यंत सरकारने चारा छावण्या बंद करू नये. पशुधन वाचवण्यासाठी १२० रुपये प्रति जनावर द्यावे अशी मागणीही अजितदादा पवार यांनी केली. पिकविम्याबाबत शेतकऱ्यांना मोठी अडचण आहे. शेतकरी आज पिकविम्या कंपन्यांपासून वंचित राहत आहे. विमा कंपन्यांचा मोठा फायदा झाला मात्र शेतकरी विम्यापासून वंचित राहिला असा आरोपही अजितदादा पवार यांनी केला.

तेलंगणा सरकार शेतकऱ्यांना २ हेक्टरी २० हजार रुपये देत आहेत. मग शेतकऱ्यांना महाराष्ट्र सरकार ६ हजारच का देत आहे. तुम्ही केंद्राला सांगा कमी पडले तर राज्य सरकारकडून मदत

# विधीमंडळ गटनेते अजित पवार यांची संक्षिप्त भाषणे...



करा मात्र शेतकऱ्यांना मदत करा कारण जगाचा पोशिंदा जगला पाहिजे असेही आवाहन अजितदादा पवार यांनी सरकारला केले.

२०१४ साली जलयुक्त शिवार योजना आणली. जनतेला स्वप्न दाखवले. ५ हजार गावे प्रत्येक वर्षी दुष्काळ मुक्त करू असे मुख्यमंत्री म्हणाले होते मग आज दुष्काळ का आहे ? असा सवाल अजितदादा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केला.

सरकार जनतेला फक्त गाजरं दाखवत आहे. जसा ऊसाला एफआरपी ठरला आहे तसा इतर पिकांनाही खात्रीलायक दर मिळायला हवा. शेतकऱ्यांना आम्ही समृद्ध करणार..शेतकऱ्यांना ५ हजार पेन्शन देऊ...शेतकऱ्यांना मोफत बी - बियाणे देवू असे चंद्रकांत पाटील म्हणाले होते मात्र सरकारने त्यांचेच पद काढून घेतले असा टोला चंद्रकांत पाटील यांना लगावला.

## मुख्यमंत्र्यांसहीत मंत्र्यांचे पाणी तोडून टाका... बिना आंघोळीचे येवू दे यांना विधानभवनात

**मुंबई - मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यासहीत अनेक मंत्र्यांचे नाव बीएमसीने पाणीपट्टी भरली नसल्याने डिफॉल्टर यादीत टाकले आहे. यांचं पाणी तोडून टाका... बिना आंघोळीचे येवू दे विधानसभेत त्याशिवाय यांना कळणार नाही अशा शब्दात राष्ट्रवादीचे विधिमंडळ पक्षनेते अजितदादा पवार कडाडले.**

मुंबईत करोडो लोक राहतात. त्यांनी जराकुठे पाणीपट्टी भरली नाही तर त्यांचे कनेक्शन कापले जाते. ताबडतोब त्यांना पैसे भरावे लागतात. त्यांना वाली कुणी नाही. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यासहीत अनेक मंत्र्यांच्या बंगल्यावरील मीटरचे पैसे

भरले जात नाही. राज्यसरकारची दयनीय अवस्था झाली आहे का? पैसे वेळेवर भरले का जात नाही. मंत्र्यांच्या बंगल्याची पाणीपट्टी थकली का जाते? असा संतप्त सवालही अजितदादा पवार यांनी केला.

बीएमसी डिफॉल्टर यादीत टाकत असेल तर हा कमीपणा नाही का? अधिकारी झोपा काढतात का? महाराष्ट्र काय धडा घेईल. जनता म्हणेल हेच पैसे भरत नाही तर आपण तरी कशाला भरावे? याची नोंद घ्यावी असेही अजितदादा पवार म्हणाले.

## राज्यात पिण्याच्या पाण्याचा सावळागोंधळ निर्माण झालाय - अजित पवार

**मुंबई – राज्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. उजनी धरण १०० टक्के भरले असतानाही नियोजन झालेले नसल्याने पिण्याच्या पाण्याचा सावळागोंधळ निर्माण झाला आहे असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार यांनी केला.**

खडकवासला, टेमघर या धरणातही पाणी कमी आहे. त्यामुळे या परिसराला पाणी मिळत नाही. याला जबाबदार कोण आहे असा सवाल करत त्यांची चौकशी होऊन कारवाई करावी अशी मागणीही अजितदादा पवार यांनी केली. सभागृहात विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार,आमदार राजेश टोपे,आमदार प्रणिती शिंदे यांनी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित केला.

उजनीचं पाणी सोलापूरला मिळत नाही असा प्रश्न काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांनी उपस्थित केला. मात्र राज्यात पाणी पुरवठा योग्य प्रमाणात केला जात आहे असे उत्तर गिरीश महाजन यांनी दिल्यावर आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील पाणी टंचाई व मराठवाड्यातील पाण्याचा साठा याची माहिती दिली त्यावेळी सभागृहात गदारोळ झाला त्यामुळे सभागृहाचे कामकाज १५ मिनिटासाठी तहकूब करण्यात आले.

विदर्भ – मराठवाडा– पश्चिम महाराष्ट्रातील धरणं आटली आहे असा तारांकित प्रश्न चर्चेला आला. शेवटी सभागृहात निर्माण झालेला गदारोळ लक्षात घेत अर्थमंत्री व राज्यपालांच्या निर्देशानुसार सिंचन प्रकल्पांना निधी वितरित केला आहे. अपूर्ण सिंचन प्रकल्पांना निधी देऊ. उजनी शंभर टक्के भरलं होतं हे खरं आहे. कालवा सल्लागार समितीने नियोजन करूनच पाणी सोडलं आहे. शेतकरी खूश आहेत. मुबलक पाणी आम्ही त्यांना देत आहोत. ढिसाळ नियोजन आहे हा आरोप चुकीचा आहे असा खुलासा गिरीश महाजन यांनी केला.

## लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या लोकांना जन्मठेपेची शिक्षा द्या - अजित पवार

**मुंबई – विधानभवनाच्या कॅन्टीनमध्ये मटकीच्या उसळीत चिकनचे तुकडे सापडल्याचा मुद्दयावरुन अजितदादा संतापले... शिस्त आणि स्वच्छता याबाबतीत अजितदादा पवार यांचे कधीच कॉम्प्रमाईज नसतं... शिस्त मोडेल किंवा अस्वच्छता कोण करेल किंवा कुठे दिसली की दादांचा दट्ट्या पडलाच म्हणून समजा...असाच दट्टया लोकांच्या**





**आरोग्याशी खेळणाऱ्या लोकांवर आज सभागृहात पडला... चक्क अजितदादांनी अशा लोकांना जन्मठेपेची शिक्षा द्यावी अशी मागणी केली.**

विधानभवनाच्या कॅन्टीनमध्ये मटकीच्या उसळीत चिकनचे तुकडे सापडल्याचा मुद्दा आज अजितदादांनी उपस्थित केला शिवाय आपला संतापही व्यक्त केला. विधानभवनाच्या कॅन्टीनमध्ये मटकीच्या उसळीत चिकनचे तुकडे सापडल्याचा मुद्दा अजितदादा पवार यांनी उपस्थित करताना १२ - १२ तास अधिकारी, कर्मचारी काम करत असतात त्यांच्या शाकाहारी जेवणात चिकनचे तुकडे सापडत असतील तर हा त्यांच्या भावनेचा, श्रध्देचा अपमान आहे.

महाबळेश्वर, लोणावळा याठिकाणी संबंधित खात्याने धाडी टाकल्या आहेत. कालच एक लक्षवेधी झाली त्यामध्ये रसवंतीगृहात ८० टक्के बर्फ हा दुषित पाण्यापासून तयार केला जात आहे ही गंभीर बाब आहे. बेजबाबदारपणा आहे असेही अजितदादा पवार म्हणाले. आज लोकांना कळेना कुठल्या हॉटेलमध्ये जावून खावे, खावे तर काय खावे... आरोग्याला आज धोका निर्माण झाला आहे. कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या लोकांना जन्मठेपेची शिक्षा द्यावी. त्याशिवाय हे शहाणे सरळ होणार नाही त्यामुळे सरकार यावर काय करणार असा सवालही अजितदादा पवार यांनी केला.

## ठग्ज ऑफ महाराष्ट्र म्हणणारे विखे 'ठगांमध्ये' जाऊन कधी बसले कळलेच नाही -अजित पवार

**मुंबई - विरोधी पक्षनेता असताना राधाकृष्ण विखे पाटील यांनी जनतेच्या समस्यांचा डोंगर सरकारसमोर मांडला, परंतु त्यांनाच भाजपने फोडले. विखे पाटलांनी 'ठग्ज ऑफ महाराष्ट्र' म्हणत हिणवलं मात्र तेच विखे आज 'ठगांमध्ये' जाऊन कधी बसले तेच आम्हाला कळले नाही असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार यांनी लगावला.**

राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना अजितदादा पवार यांनी बालभारतीच्या नवीन शिक्षण पद्धतीचे वाभाडे काढले. ही पद्धत विद्यार्थ्यांचे वाटोळे करणारे आहे असेही अजितदादा पवार म्हणाले. विनोद तावडे यांनी शिक्षण मंत्री असताना ही नवीन पद्धत आणली त्यामुळेच त्यांना मुख्यमंत्र्यांनी बाजुला केले आणि शेलारांना शिक्षण मंत्री केले आहे का? असा सवाल करतानाच आता शेलार त्यात दुरुस्ती करतील असा टोलाही अजितदादा पवार यांनी लगावला.

जनता व्यक्ती म्हणून कुणाच्या हाती सरकार दिले पाहिजे याचा विचार करते. राज्यपालांच्या अभिभाषणात त्यांनी पुलवामा हल्ल्यातील शहिदांना मानवंदना वाहिली मात्र महाराष्ट्रातील शहीदांचे त्यांच्या कुटुबियांचे प्रश्न तसेच आहेत. राज्यपालांनी महात्मा गांधी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली मात्र आज काही लोक नथुराम गोडसे याचे उदात्तीकरण करत आहे. हे आपल्या देशाला शोभणारे नाही. हे विचार कुठे तरी थांबवले पाहिजे असेही अजितदादा म्हणाले. आज राज्यात प्रचंड दुष्काळ आहे. चारा छावण्या सुरुच ठेवायला हव्या. हिरवा चारा उपलब्ध होत नाही तोपर्यंत छावण्या सुरू ठेवा. आज राज्यातील शेतकरी कष्टकरी




सामान्य जणांच्या समोर समस्यांचा मोठा डोंगर आहे. शिवसेनेने निष्ठावान शिवसैनिकांना डावलून जयदत्त क्षिरसागर यांना मंत्रिपद दिले. हा सामान्य शिवसैनिकांवर अन्याय आहे त्यांनी किती काळ तुमच्या सतरंज्या उचलायच्या असा टोला शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांना लगावला.

५००० कोटीचा भ्रष्टाचाराचा आरोप मुख्यमंत्र्यांवर ज्यांनी केला त्यांना मंत्रिमंडळात जागा दिली. जलयुक्त शिवार योजनेत भ्रष्टाचार झाला असे ते म्हणाले होते. त्यांनी मुख्यमंत्र्यांना स्पष्टीकरण ही देण्यासाठी सांगितले होते त्यावर मुख्यमंत्र्यांनी

भाष्य करायला हवे अशी मागणीही अजितदादा पवार यांनी केली.

६ मंत्र्यांना यावेळी वगळण्यात आले त्याचे कारण काय ? याचे कारण सभागृहाला कळायला हवे. या मंत्र्यांनी कामे केली नाही की, भ्रष्टाचार केला, की पक्षाला हवे तसे काम केले नाही त्यामुळे यांना वगळण्यात आले का ? हे स्पष्ट व्हायला हवे अशीही मागणी अजितदादा पवार यांनी केली. राज्याचे कामकाज काही समाधानकारक चालत नाही, बेरोजगारी वाढली आहे. काही लाख जागा रिक्त आहेत. तरुणांची वये निघून जात आहेत. परंतु तरीही ती भरली जात नाही. राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. सरकारने अर्थ संकल्प मांडला, राज्यपालांचे अभिभाषण झाले त्यात काही मांडणी झाली तो निधीही नीट मिळत नाही.

कर्जमाफी देतो सांगून अद्याप दिलेली नाही. सरसकट शेततळी देतो सांगून तीसुद्धा दिली नाही. शेतकऱ्यांची फसवणूक, थट्टा केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी अशी मागणीही अजितदादा पवार यांनी केली.

## विना अनुदानित शाळांचा प्रश्न मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन लवकर मार्गी लावा - अजित पवार

**मुंबई – विना अनुदानित शाळा कृती समितीच्या शिक्षकांचे आझाद मैदानावर आंदोलन सुरू असून शिक्षणमंत्र्यांनी अर्थमंत्री व मुख्यमंत्र्यांशी सल्लामसलत करून हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार यांनी औचित्याच्या मुद्दयाद्वारे केली.**




आम्ही सत्तेत असताना १० कोटी निधी विकासकामांना घेतला तर विरोधी सदस्यांना ५ कोटीचा निधी देत होतो. परंतु सध्या तशी पद्धत वापरली जात नाही. निधीत दुजाभाव सरकारकडून केला जात आहे. त्यामुळे दुजाभाव करू नका सर्वच दिवस सारखे नसतात हे लक्षात घ्या असेही अजितदादा पवार म्हणाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी राज्य सरकारकडून अनेक पाऊले उचलण्यात येतील असे सांगण्यात आले. तावडे यांनी यामध्ये लक्ष घालतो सांगून साडेचार वर्षे झाली परंतु राज्यपालांनी एकदाही मराठीत भाषण केलेले नाही असेही अजितदादा पवार यांनी सांगितले. शेतकऱ्यांना सरसकट

विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळांना अनुदान देण्यात यावं तसेच त्याची तरतूद करून शिक्षकांना पगारही देण्यात यावे या मागणीसाठी आझाद मैदानावर हे आंदोलन सुरू आहे असेही अजितदादा पवार यांनी सांगितले. नोव्हेंबर २०१८ मध्ये याबाबत मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री विनोद तावडे यांची भेट घेऊन त्यांना निवेदनही देण्यात आलं होते मात्र केवळ मागण्या मान्य झाल्या. याबाबत कोणतीही तरतूद झाली नसल्याने शिक्षकांनी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले आहे ही बाब अजितदादा पवार यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. या लक्षवेधीला उत्तर देताना गृहराज्यमंत्री रणजीत पाटील यांनी अंमली पदार्थांची विक्री रोखण्यासाठी कायद्यात सुधारणा करू तसेच मुंबई शहरात स्थापन केलेला स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन दिले.

अंमली पदार्थांच्या चोरट्या व्यापारास आळा घालण्याकरीता मुंबईत पाच स्वतंत्र कक्ष काम करत असल्याचेही रणजित पाटील यांनी सांगितले. या कक्षांना मनुष्यबळ आणि निधीची आवश्यकता आहे, तो निधी वाढवून देण्यासाठी शासनस्तरावर आमचे प्रयत्न सुरु असल्याचेही रणजित पाटील म्हणाले. भाजपच्या आमदार मनिषा चौधरी यांनी अंमली पदार्थांची 'खिशातली दुकाने' याकडे मंत्र्यांचे लक्ष वेधले. यावर बोलताना अजितदादा पवार यांनी जनरल स्टोअर्सचे परवाने रद्द करून काहीही होणार नाही ही खिशातली दुकाने बंद करा अशी मागणीही केली.

यावर उत्तर देताना रणजीत पाटील यांनी अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्याला आता १० ऐवजी २० वर्षांची शिक्षा दिली जात आहे. पुर्वी मॅजिस्ट्रेटसमोर या केसेस चालत होत्या आता जलदगतीने चालाव्यात यासाठी त्या सेशन कोर्टात चालविण्यात येत आहेत. कॉलेज कॅम्पसमध्ये साध्या वेषात पोलिसांची गस्त वाढविण्यासाठी मनुष्यबळ वाढविले जाईल अशीही माहिती त्यांनी दिली. या लक्षवेधी दरम्यान अजितदादा पवार, भाजपच्या आमदार मनिषा चौधरी, कॉंग्रेसचे आमदार भारत भालके आणि समाजवादी पार्टीचे आमदार अबु आझमी यांनी प्रश्न विचारले.





## अंमली पदार्थ विकणाऱ्यांना थेट फाशी देण्याचा कायदा करा - अजित पवार

**मुंबई – मुंबई, ठाणे, नागपूर ही शहरे वगळता इतर महाराष्ट्रात देखील अंमली पदार्थ घेण्याचे प्रकार वाढले आहेत. यावर जर रोख लावायचा असेल तर अंमली पदार्थ विकणाऱ्यांना थेट फाशी देण्याचा कायदा करा अशी आक्रमक मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार यांनी सभागृहात केली.**

मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात अंमली पदार्थांची कुरिअर आणि पोस्टामार्फत विक्री होत असल्याची लक्षवेधी आज विधानसभेत विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार यांनी उपस्थित केली. अंमली पदार्थांमुळे तरूण पिढी बरबाद होत आहे. कॉलेज असणाऱ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ विकण्याचे प्रकार वाढले आहेत. आई आणि वडील दोघेही नोकरी करत असल्यामुळे ११वी, १२वीला असणारा मुलगा किंवा मुलगी बाहेर काय करते? हे कळत नाही ही

# राष्ट्रवादी काँग्रेसची विधीमंडळ अधिवेशनातील कामगिरी




## भाजप आमदाराने राज्यपालांच्या नावाचा गैरवापर करत खोटे आदेश काढले- जयंत पाटील

**मुंबई - भाजपाच्या आमदाराने राज्यपालांच्या नावाचा गैरवापर करुन खोटे आदेश पारीत केल्याचे प्रकरण राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी विधानसभेत पुराव्यानिशी मांडले.**

सादर केलेल्या कागदपत्रात नमुद असलेला मजकुर खालीलप्रमाणे : पुणे जिल्ह्यातील पाषाण गावातील सर्व्हे नंबर १३८ क्षेत्र - ७ लाख ५१ हजार ३२७ चौरस फूट जागा नामदेव धोंडीबा पाषाणकर यांच्या मालकीची होती. पाषाणकर यांनी ULC अन्वये विवरणपत्र दाखल केले असता वर नमुद संपुर्ण जागा अतिरिक्त घोषित करण्यात आली. त्यानंतर पाषाणकर यांनी ULC कायदा कलम २० अन्वये आर्थिक दुर्बल घटकांच्याकरीता गृहयोजना राबवण्याकरीता प्रस्ताव दाखल केला असता शासनाने ३१ जानेवारी ८९ रोजी जनहितार्थ मंजुर केला. परंतु पाषाणकर यांच्याकडे आर्थिक पाठबळ नसल्याने सदर योजना ते राबवू शकले नाहीत. याचा गैरफायदा घेवून पुणे येथील कुमार बिल्डर्सचे मालक ललितकुमार जैन यांनी करारनामा व कुलमुखत्यारपत्र पाषाणकर यांच्याकडून लिहून घेतले व जैन यांनी त्यानंतर आमदार राज पुरोहित यांनी मंत्री नसताना संगनमत करुन त्यांच्या सही शिक्क्याचे त्यांच्याकडे ULC कायदा कलम ३४ अन्वये १३ सप्टेंबर ९८ रोजी सदर जमीन बिन अतिरिक्त घोषित केले असल्याचे आदेश प्राप्त केले व सदर आदेश जैन यांनी १३ मार्च १२ रोजी खरेदीखत (दस्तक २४१४ /१२ अन्वये सहदुय्यम निबंधक हवेली क्रमांक १३ वारजे पुणे येथे ) केले. या खरेदीखत ३२० पानांचे असून त्यामध्ये पान क्रमांक २१८ व २१९ येथे सदर आदेशाची प्रत दस्त नोंद करण्याकरिता वापरली आहे.

या आदेशाची प्रत माहिती अधिकार कायदा २००५ नगरविकास मुंबई यांच्याकडे अर्ज करुन मागण्यात आला असता नगरविकास विभागाने १० ऑक्टोबर १८ रोजी लेखी कळवले की, सदर आदेश शासनाने पारीत केलेला नाही. तसेच अभिलेख कक्षातील रेकॉर्ड पाहता असा कोणताही आदेश अभिलेख कक्षात जमा नाही. सदर बोगस आदेश आमदार राज पुरोहित यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने पारीत करत असल्याचे नमुद करुन त्याखाली सही केली आहे ही बाब निदर्शनास आणून दिली.

वास्तविक पाहता महाराष्ट्र शासन कार्य नियमावली व

**महाराष्ट्र विधान मंडळाचे शेवटचे अधिवेशन १७ जून ते २ जुलै या काळात मुंबईत पार पडले. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी दुष्काळ, पाणी टंचाई, राज्यपालांचे अभिभाषण, अर्थसंकल्प, मंत्र्यांचा भ्रष्टाचार, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा, जलयुक्त शिवार योजनेतील अनागोंदी, जनावरांच्या छावण्यांची खोटी बिले यासह अनेक विषयांवर सरकारला धारेवर धरले. या सर्व प्रश्नासंबंधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी विधीमंडळात भाषणे करून पक्षाची जी भूमिका मांडली, ती संक्षिप्तपणे येथे देत आहोत.**

त्याअन्वये दिलेले अनुदेश यामध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे की, राज्य शासनाचा प्रत्येक आदेश किंवा लेख यावर सचिव, अप्पर सचिव, सहसचिव, उपसचिव, अव्वर सचिव, सहायक सचिव किंवा त्याबाबतीत ज्यांना विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत अशांनी सही केली पाहिजे असेही स्पष्ट केले. सदर आदेश खोटा असल्याचे शासनाने कबुल केले असल्याने मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी व पोलीस निरीक्षक वारजे पोलिस ठाणे येथे पुणे येथील एका कार्यकर्त्याने आमदार राज पुरोहित, प्रकाश पाषाणकर, ललितकुमार जैन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली मात्र २६ जून १९ रोजी वारजे पोलिस ठाण्याचे निरीक्षक खांडेकर यांनी प्राधिकारी यांच्या लेखी तक्रारी शिवाय गुन्हा दाखल करता येणार नाही असे सांगितल्याचे जयंतराव पाटील यांनी यावेळी सांगितले.

## गोरगरीबांच्या २ हजार ८०८ हेक्टर जमीन बिल्डरांच्या घशात घालण्याचा सरकारचा डाव.. सरकारचा २० हजार कोटींचा घोटाळा-जयंत पाटील

**मुंबई : मुंबईतील गोरगरिबांची घरे बांधावयाच्या २ हजार ८०८ हेक्टर जमीन बिल्डरांच्या घशात घालण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप करतानाच सरकारने २० हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला असल्याचा संशय राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी आज विधानसभेत व्यक्त केला.**

दरम्यान या प्रकरणाची कागदपत्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत. ती मुख्यमंत्र्यांकडे देणार असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी आमदार जयंतराव पाटील यांनी केली. पुरवण्या मागण्यांसंदर्भात महसूल, नगरविकास खात्याच्या प्रश्नावर बोलताना जयंतराव पाटील यांनी सरकारचा आणखी एक घोटाळा उघडकीस आणला आहे.

बुधवारी पुणे येथील हवेली केसनंद देवस्थान व बालेवाडीतील भूखंड यातील ३४२ कोटींचा घोटाळा काढून महसुलमंत्र्यांना अडचणीत आणले आहे आणि आज भाजपा



आमदाराने राज्यपालांच्या पत्राचा गैरवापर केल्याचा मुद्दा उपस्थित केला तर मुंबईतील जमीनी बिल्डरांच्या घशात घालण्याचा घाट सरकारचा असल्याचा मुद्दा सभागृहात मांडला.

केंद्र शासनाने दिनांक १७ फेब्रुवारी १९७६ रोजी नागरी जमीन कमाल धारणा कायदा १९७६ लागू केला. सदर कायद्यांतर्गत मोठया प्रमाणावर काही ठराविक व्यक्तींकडे जमीन असल्याने गोरगरीब नागरीकांना राहण्याकरीता जमीन मिळावी. या उद्देशाने लागू करण्यात आला.

सदर कायद्यांतर्गत नागरी विभागातील जमीन धारकांना मुंबई शहरात ५०० स्क्वेअर मिटर व उपनगरात १००० स्क्वेअर मिटर जादा जमीन धारण केली असल्यास ही अतिरिक्त ठरविण्यात येत होती. अशी अतिरिक्त घोषित केलेली जमीन संबंधित मालकाने ना.ज.क.धा.१९७६ कलम २० अन्वये प्रस्ताव दाखल करुन आर्थिक दुर्बल घटकांकरीता गृह योजना बांधण्याची तयारी दर्शविल्यास शासन तशी परवानगी देत असे. अशा प्रकारे सन १९७६ – २००७ पर्यंत मुंबई येथील हजारो एकर जमीन अतिरिक्त घोषित करण्यात आली.

मात्र सेक्शन २३ मध्ये अशा जमिनी स्वतःकडे ठेवल्या व त्याचा वापर व्यापारी तत्त्वावर केला असता त्यावर शासनाने कार्यवाही केली पाहिजे. हायकोर्टाच्या बेंचने ३ सप्टेंबर २०१४ ला मुळ कायद्यातील सेक्शन ३ नुसार सेक्शन २० मधील अतिरिक्त जमीन शासनाकडे यावयास पाहिजे व सेक्शन २३ प्रमाणे कमर्शिअल वापर केला असला तर त्यावर कार्यवाही केली पाहिजे ही तरतूद मुळ कायद्यातील अस्तिवात ठेवली. त्यावर महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसिंग इंडस्ट्रीज यांनी सुप्रिम कोर्टामध्ये एसएलपी फाईल केली. सन २०१५ मध्ये सुप्रीम कोर्टाने यामध्ये रेग्युलर सिव्हल ॲपलीकेशन दाखल करा. तोपर्यंत कोणावरही कडक कारवाई करु नये अशी ऑर्डर केली. त्यावर ऑगस्ट २०१७ ला राज्य सरकारने श्रीकृष्ण समिती नेमली व १६ नोव्हेंबर २०१८ मध्ये मंत्रीमंडळाने श्रीकृष्ण समितीचा अहवाल स्वीकारला. ज्यामध्ये २८०८ हेक्टर म्हणजेच ७०२० एकर जमीन परस्पर विकण्याचा सल्ला दिला. दरम्यान सुप्रिम कोर्टासमोर २६ फेब्रुवारी २०१९ ला एमसीएचआय राज्य शासनाच्याबरोबर कन्सेट टर्म फाईल केली. परंतु नेरोलॅक वर्कर युनियनने त्यास हरकत घेतली व त्याची आता २ जुलैला तारीख आहे.

दरम्यानच्या काळात राज्य शासनाने १५ मे २०१९ ला ग्लॅक्सो स्मिथ कलाईंट फार्मासिटीकल लिमिटेड यांना पाचपाखडी येथे २ लाख ६७४ चौरस मीटर या जमीनीची विक्री, हस्तांतरण बदल व जमीन विकसित करण्याची परवानगी दिली. याप्रमाणे रेमंड, वायमन गार्डन, देवे फेन्डस, एलएनटी यांच्या जमिनीत अवाढव्य टॉवर मंजूर झालेले आहे असे समजते.

वंचित, दलितांच्या व गोरगरीबांच्यासाठी मुंबईत हक्काने राखीव ठेवलेली जमीन ही उद्योगपतींच्या व बिल्डरांच्या घशात घालण्याचे काम राज्य सरकार करीत आहे. यात २० हजार कोटींपेक्षा जास्त किंमतींचा व्यवहार झालेला आहे. असा संशय जयंत पाटील यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे लोकसभेच्या निवडणूकीच्या आधी १६ नोव्हेंबर २०१८ मध्ये मंत्री मंडळाने घेतलेल्या निर्णयाने राज्य शासनाने ही हजारो कोटी रुपयांची जमीन वेगवेगळया उद्योगांच्या ताब्यात नाममात्र किंमतीने देण्याची सुरुवात झाली असेहीे जयंत पाटील म्हणाले.

गोरगरिबांची घरे बांधण्यासाठी राखून ठेवलेल्या जागा मोठमोठ्या बिल्डर्सच्या घशात घालण्याचे काम सरकारने करून हजारो कोटींचा घोटाळा केला आहे.



महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या जमीन घोटाळ्याची माहिती मुंबईच्या विधान भवनातील वार्ताहार दालनात जयंत पाटील देत असताना, समोर चंद्रकांत पाटीलही येऊन बसले होते.



## बालेवाडीतील देवस्थान जमिनीचा गैरव्यवहार, महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांचा मागितला राजीनामा

**मुंबई : पुणे जिल्ह्यातील हवेली व बालेवाडीतील देवस्थान जमिनीचा गैरव्यवहार सभागृहात पुराव्यानिशी मांडला. त्यामध्ये चंद्रकांत पाटील यांचं नाव न घेता फक्त महसुलमंत्र्यांचा उल्लेख केला परंतु हे प्रकरण सभागृहाच्या पटलावरुन काढून टाकण्याची घोषणा विधानसभा अध्यक्षांनी केली याचा निषेध राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला.**

दरम्यान लोकशाहीत लोकशाहीची कशी गळचेपी करायची हे भाजपकडून शिकले पाहिजे असा टोला जयंतराव पाटील यांनी लगावला. सभागृहात दोन्ही गैरव्यवहाराची सर्व मांडणी झाल्यावर क्वॉशी ज्युडिशियलमध्ये खडसेंनी ऑर्डर केल्या त्या कसल्या होत्या. त्या क्वॉशी ज्युडिशियल मॅजेसिटीत केल्या. आतापर्यंत भ्रष्टाचाराचे आरोप झाले ते क्वॉशी ज्युडिशियलमध्येच झाले. हा भ्रष्टाचार करण्याची क्वॉशी ज्युडिशियल अधिकारात अधिकार मंत्र्यांना देण्याची व्यवस्था केली आहे का? असा सवालही जयंतराव पाटील यांनी केला.

जयंतराव पाटील यांची पत्रकार परिषद सुरु असतानाच महसुलमंत्री चंद्रकांत पाटील हे प्रेसमध्ये येवून बसले होते. विधानसभेत आम्ही आमचं म्हणणं मांडलं. त्यावेळी टोचण्यासारखं काही नाही, अनुदगार नाही, सगळं आदरयुक्त भाषण असताना तो सगळा मॅटर सभागृहाच्या पटलावरुन काढून टाकणे म्हणजे नाही हे सिध्द होते असेही जयंतराव पाटील म्हणाले. सभागृहात जयंतराव पाटील हे महसुल, वन, पशुसंवर्धन, मत्स्य, नगरविकास अतिरिक्त संकल्पाच्या अनुदान मागणीवर बोलत होते.

राज्य सरकार कशापध्दतीने या राज्यात नियमांची पायमल्ली करून बिल्डरांचा फायदा करुन देण्याचा प्रयत्न करतेय हे स्पष्ट होते आहे. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील केसनंद गावात देवस्थान जमीन हडप केल्याचे प्रकरण पुराव्यानिशी जयंतराव पाटील यांनी मांडले. १८६१ साली २३ एकर २२ गुंठे जमीन म्हतोबा देवस्थानच्या नावाने झाली. जमीन इनाम वर्ग - ३ च्या अटीवर देवस्थानाकडे देण्यात आली. १९३० साली सातबारा उतारा लेखन झाल्यावर २ ऑगस्ट १९५० साली वामन चिमणा साळी यांच्याकडे व्यवस्थापनासाठी देण्यात आली. वामन चिमणा साळी यांच्या निधनानंतर केशव, सदाशिव, महादेव, कृष्णा ही मुलं एकत्र कुटुंबामुळे केशव वामन साळी फेरफार क्रमांक २४४१ नुसार यांची नोंद झाली. २७१४ च्या फेरफारनुसार १५ एप्रिल १९५५ साली जमीन केरु मारुती सावंत यांच्या नावे नोंद करण्यात आली. सदर जमिनीची कुळकायदयाच्या ३२ ग नुसार चौकशी होवून तहसिलदारांनी जमीन इनाम वर्ग - ३ची खरेदी असल्याने जमीन देता येत नाही असा आदेश देवून कुळास वहिवाट करण्याचा आदेश दिला. म्हतोबा देवस्थानतर्फे वहिवाटदार केशव साळी यांनी २९ डिसेंबर १९५५ साली देवस्थानला नाव लावा असा अर्ज केला असल्याचे सांगितले.

पुण्यातील दोन भूखंडाच्या बाबतीत बिल्डरचा फायदा




करून देण्यासाठी महसुलमंत्र्यांनी निर्णय घेतला. तसेच एका निर्णयातून राज्य सरकारचे ४२ कोटी रुपयांचे नुकसान केले असा आरोपही जयंतराव पाटील यांनी केला.

राज्याच्या महसूलमंत्र्यांनी पुण्यातील तालुका हवेली केसनंद गावात देवस्थान जमीन बेकायदेशीरपणे हस्तांतरित करण्याची परवानगी दिली. देवस्थान जमीन कोणताही नजराणा न भरता अशी जमीन हस्तांतरित करता येत नाही. ही जमीन म्हतोबा देवस्थान यांच्याकडे होती. म्हतोबा देवस्थानने ही जमीन राधास्वामी सत्संग व्यास यांना विकली. राधास्वामी सत्संग देवस्थानने सदर व्यवहार नियमित करण्यासाठी अर्ज केला. त्यामध्ये त्यांनी मान्य केलं की नजराणा आकारावा असे नमूद केले. त्यांनी जमीन अकृषिक करण्यासाठी परवानगी मागितली मात्र नजराणा भरला नसल्याने जिल्हाधिकारी व त्यानंतर महसूल आयुक्त यांनीही तो अर्ज नामंजूर केला. त्यानंतर ते अपील महसुलमंत्र्यांकडे गेले असता, त्यांनी तो नजराणा माफ केला. ज्यातून राज्य सरकारला एकूण ४२ कोटींचा तोटा झाला. त्यानंतर ती जमीन ८४ कोटी रुपयांना विकण्यात आली. यातून महसुलमंत्र्यांनी केवळ एका बिल्डरच्या फायद्यासाठी ४२ कोटींचा नजराणा माफ करून त्या बिल्डरचा फायदा करून दिल्याचे स्पष्ट होत आहे. दुसऱ्या प्रकरणात बालेवाडी येथील सर्व्हे नंबर १८ /१ जागा होती, फाळणी नकाशात दिसतं की १९ मीटर रुंदी होती, उमेश कोठावदे वाणी याने ती जमीन खरेदी केली. त्याच्या बाजूला प्लॉट नंबर १७ होता. ती जमीन प्ले ग्राउंडसाठी राखीव होती.

मात्र उपअधीक्षक भूमी अभिलेख यांनी मोजणी करताना प्ले ग्राउंडसाठीची जागा व मूळ जागा एकत्र करून मोजणी करून दिली. त्यामुळे प्लॉट मूळचा प्लॉट वाढून ४६ गुंठ्यांचा झाला. तेथील स्थानिक लोकांनी त्याला आक्षेप घेतला. स्मिता गौड या अधिकाऱ्याकडे याबाबत खुलासा मागितला असता त्यांनी असा खुलासा दिला की, ती मोजणी चुकीची झाली आहे. त्यानंतर त्या प्रोजेक्टला स्थगिती देण्यात आली. त्यावर १० डिसेंबर २०१८ रोजी शिवप्रिया रिलेटर्स यांनी महसुलमंत्र्यांकडे अर्ज केला. त्या कागदाचे इन्व्हर्ट ११ ऑक्टोबर रोजी झालं. उपअधिक्षक यांनी जेव्हा सांगितले मोजणी चुकीची आहे. या गोष्टीला महसुलमंत्र्यांनी स्थगिती दिली व बिल्डरच्या बाजूने निर्णय घेतला. सध्या त्या जमिनीवर प्रोजेक्ट सुरू आहे. बिल्डरला त्याचा प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी महसुलमंत्र्यांनी पूर्ण मदत केली आहे असा आरोपही केला. दरम्यान सभागृहात जयंतराव पाटील यांनी राज्याच्या महसुलमंत्र्यांनी कर्तव्यात कसूर केली आहे, चूक केली आहे. त्यांना मंत्रीपदावर राहण्याचा अधिकार नाही त्यामुळे त्यांनी राजीनामा द्यावा व या दोन्ही गैरव्यवहाराची मुख्यमंत्र्यांनी चौकशी करावी अशी मागणी केली. मात्र गैरव्यवहार इतका जिव्हारी लागला की जयंतराव पाटील यांनी मांडलेले सर्व भाषण पटलावरुन काढून टाकण्यात आले त्यामुळे जयंतराव पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन ही दोन्ही प्रकरणे समोर आणली आणि त्यांनी उद्याही आणखी एक प्रकरण सभागृहात मांडणार असल्याचे सांगून सस्पेन्स वाढवून ठेवला.

## मराठा समाजातील विद्यार्थ्यांनी जातपडताळणीसाठी दाखल केलेल्या अर्जाचे टोकन ग्राह्य धरा-जयंत पाटील

**मुंबई : मराठा समाजातील विद्यार्थी एसी, बीसी या आरक्षण प्रवर्गातून प्रवेशासाठी अर्ज दाखल करत आहेत मात्र त्या विद्यार्थ्यांना ३० जून ही पडताळणीची अंतिम तारीख सांगण्यात येत असून त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले असून जातपडताळणीसाठी दाखल केलेल्या अर्जाचे टोकन ग्राहय धरण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी आज विधानसभेत केली.**

मराठा समाजातील विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी एसी, बीसी प्रवर्गातून अर्ज दाखल करत आहेत. अर्ज दाखल केल्यानंतर फॅसिलिटेशन सेंटरमध्ये सर्व कागदपत्रांची पूर्तता झाली की नाही हे पाहिले जाते. त्यात जातपडताळणी प्रमाणपत्र उशिरा मिळते. ज्या विद्यार्थ्यांनी जातपडताळणी साठी अर्ज केले आहे त्यांनी टोकन घेतले आहे ते टोकन ग्राहय धरावे असेही जयंतराव पाटील म्हणाले.

मात्र विद्यार्थ्यांना ३० जूनपर्यंत सर्व कागदपत्रे फॅसिलिटेशन सेंटरमध्ये पडताळणी करण्यासाठी जमा करावे असे सांगितले जात आहे ही बाब संबंधित मंत्र्यांच्या जयंतराव पाटील यांनी लक्षात आणून दिली. मराठा समाजातील असंख्य विद्यार्थ्यांना या आरक्षणाचा लाभ मिळण्यापासून वंचित रहावे लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यांना वर्षभराचा कालावधी देवून त्यांच्याकडून प्रमाणपत्र दाखल करुन घ्यावे असे आदेश द्यावेत अशी मागणीही जयंतराव पाटील यांनी केली.

## राज्याला ६ हजार ५९७ टँकर द्यावे लागतायत; लाज वाटायला हवी सरकारला - जयंत पाटील

**मुंबई : दुष्काळामध्ये तुम्ही राज्यात ६ हजार ५९७ टँकरद्वारे राज्याला पाणीपुरवठा करत होता ही काय भूषणावह गोष्ट आहे का ? तुम्हाला लाज वाटायला पाहिजे. 'राज्याला दुष्काळमुक्त करू' असं म्हणून तुम्ही सत्तेत आला होतात आणि आता पाच वर्षांनी तुम्हाला राज्याला ६ हजार टँकर रोज द्यावे लागतायेत. कशासाठी स्वतःची पाठ थोपटून घेताय ? असा संतप्त सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी सरकारला केला.**



हे बजेट केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केलेलं बजेट आहे. 'ऋण काढून सण साजरा करू नये' असं आपल्याकडे म्हणतात . मात्र निवडणुकीचा सण साजरा करण्यासाठी आमच्या सरकारने ऋण काढायचं ठरवलंय. एक दोन नव्हे तर या ग्रेट सरकारने २० हजार २९२ कोटी रुपये महसुली तुटीचा अर्थसंकल्प सादर केला आहे. एवढ्या मोठ्या महसुली तुटीचा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल सुधीरभाऊ, तुम्ही तुमच्या सगळ्या आमदारांना पार्टी दिली पाहिजे. म्हणजे राज्याचं सगळ्यात जास्त वाटोळं करणारा निर्णय तुम्ही घेतला असा जोरदार टोला सरकारला लगावला.

भाजपने आपल्या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये अनेक गोष्टी सांगितल्या पण एकाही गोष्टीला यांनी स्पर्श देखील केला नाही. गेल्या पाच वर्षांत किती नवीन सरकारी नोकऱ्या निर्माण झाल्या ? आणि नुकतंच शिक्षण पूर्ण केलेल्या किती तरुण किंवा तरुणींना या नोकऱ्या लागून त्यांनी जॉईन केलं ? गेल्या पाच वर्षांत किती नवीन खासगी नोकऱ्या निर्माण झाल्या आणि नुकतंच शिक्षण पूर्ण झालेल्या किती जणांना अशा नोकऱ्या लागल्या ? गेल्या पाच वर्षांत पेट्रोल डिझेलचे दर का कमी झाले नाहीत ?गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात किती नवीन उद्योग उभे राहून ते सुरु झाले ? गेल्या पाच वर्षांत महागाई का कमी झाली नाही ? असे अनेक प्रश्न उपस्थित करून जयंतराव पाटील यांनी सरकारला भांडावून सोडलं.

सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांच्या गोपनीयतेच्या शपथेचा भंग केला आहे. त्यांच्या ट्विटरवरून अधिकृत आणि वेरीफाइड ट्विटर पेजवरून, अर्थसंकल्पात काय आहे याच्या पोस्ट केल्या जात होत्या. हे महाराष्ट्रात पहिल्यांदा घडले. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प फोडला. आदल्या रात्रीच ग्राफिक्स डिझायनरला हे दिलं म्हणून इतके नीटनेटके ट्विट झाले. याची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे अशी मागणी जयंतराव पाटील यांनी केली. जनतेला फसवण्यासाठी कृत्रिम पावसाची योजना सरकारने आणली मात्र याने जास्त पाऊस पाडता येत नाही. या प्रयोगाला राज्य

सरकारने मान्यता दिलीये. जनतेच्या पैशांच कसं वाटोळे करावे हे यांच्याकडून शिकावे असेही जयंतराव पाटील म्हणाले.

गेली पाच वर्ष या लोकांनी राज्यात नक्की काय केलं की यांना निवडणुकीच्या तोंडावर 'नवा मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' जाहीर करावा लागतो आहे?असा सवालही जयंतराव पाटील यांनी केला.

प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेतून हे लोक रोजगार निर्माण करणार होते. स्टार्टअप योजनेतून रोजगार निर्माण करणार होते. राज्यात गुंतवणूक आणून रोजगार निर्माण करणार होते, जेव्हा हे सगळं काही फेल झालं तेव्हा यांना आता 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' निवडणुकांच्या तोंडावर सुचतो आहे. आमचे आधीचे कार्यक्रम फेल झाले हे सांगण्याचे धाडस सरकारमध्ये नाहीये हे तुम्ही मान्य करा असे जयंतराव पाटील यांनी सभागृहात सरकारला ठणकावले. जर राज्याची रोजगाराची स्थिती चांगली आहे. असा आपला दावा असेल, तर मंत्रालयातील वेटरच्या १३ जागांसाठी पाच हजार अर्ज का आले? असाही प्रश्न सरकारला सभागृहात विचारला.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम असताना गडचिरोली, गोंदिया, भंडारा भागात कौशल्य विकासाचा विशेष कार्यक्रम राबवणार सांगत आहात. या तीनही जिल्ह्यांतील मुलांना मुलींना अत्यंत उत्तम रोजगार मिळाला पाहिजे यात काहीही शंका नाहीये. पण प्रमोद महाजन कौशल्य विकास आहे, इतरही काही कार्यक्रम आहेत त्याची तरतूद वाढवून, त्यातल्या उणीवा काढून टाकून मुलांना तिथून संधी द्या. मुद्दाम निवडणुकीच्या तोंडावर मत आकर्षित करण्यासाठी म्हणून तुम्ही काहीतरी घोषणा कराल आणि त्या पूर्ण करणार नाहीत असं करू नका. त्या जिल्ह्यांमधल्या तरुणाईच्या स्वप्नांशी खेळू नका असा इशाराही जयंतराव पाटील यांनी दिला. कितीतरी योजनांमध्ये फोलपणा आहे हे आम्ही आधीपासून सांगतो आहोत. केवळ 'प्रधानमंत्री आवास योजनेतील' निधी न आल्याने तासगाव शहरातील पावणेपाचशे घरे अडकली आहेत. पहिला हफ्ता आला पुढचे हफ्तेच आले नाहीत याबाबतची माहिती सभागृहात दिली. दुष्काळ कसा हाताळू नये याचा वस्तुपाठ या सरकारने सगळ्यांना घालून दिलेला आहे. राज्य दुष्काळामध्ये होरपळत असताना मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्री राज्याचा विरोधी पक्षनेता फोडण्यात मग्न होते असा थेट आरोप जयंतराव पाटील यांनी केला.

अर्थमंत्री त्यांच्या भाषणात म्हणाले कि १८ हजार ६४९ गावांमध्ये जलयुक्त शिवारची कामे पूर्ण झाली आहेत. जर १८ हजार गावांत जलयुक्त शिवारची कामे पूर्ण झाली असतील, तर मग आज राज्यात पंधरा - वीस - पंचवीस हजार गावांमध्ये दुष्काळ का आहे ? असा सवालही जयंतराव पाटील यांनी केला. १५० कोटी रुपये महात्मा गांधी यांच्या जयंतीसाठी राखून ठेवले आहे. असं सरकार सांगत आहे परंतु आजही काही लोक गोडसेंचं उदात्तीकरण करत आहे त्याचं काय असा प्रश्न जयंतराव पाटील यांनी उपस्थित केला.

सरकार सर्व योजना श्रीमंतासाठी करत आहे.ट्रॅक्टर,शेती



**जलयुक्त शिवार योजनेत नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करून पाणी भूगर्भात मुरविण्याचा अशास्त्रीय प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे टँकर पुन्हा पुन्हा लागत आहे.**






अवजारे,

फवारणी यंत्रे, शेततळे आच्छादन

यांच्यावरचा GST पाच टक्यांनी कमी करण्याची गरज आहे. जीएसटी पाहता तुम्ही शेतकऱ्यांना जगवायला आहात की मारायला आलात तेच कळत नाही अशी शंकाही जयंतराव पाटील यांनी उपस्थित केली.

सत्ताधाऱ्यांनी राज्याचा कृषी विकासदर दोन आकडी करणार असल्याच्या बाता मारल्या होत्या. मात्र आज राज्याच्या कृषी विकासदर ०.८ इतका आहे. विकासदर किमान एक आकडी तरी करा ! अशी मागणी जयंतराव पाटील यांनी केली. विद्यार्थी चळवळीचा अभ्यास करण्यासाठी कै. बाळ आपटे सेंटर फॉर स्टडीज इन स्टुडट अँड युथ मुव्हमेंट नावाचे केंद्र मुंबई विद्यापीठात स्थापण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.मला हे गृहस्थ कोण आहेत याआधी माहिती नव्हते. ते भाजपाचे उपाध्यक्ष होते आणि राज्यसभा सदस्य होते आणि एक वकील होते. त्यांचे विद्यार्थी आणि युवक चळवळीत किती आणि काय योगदान आहे, याची माहिती मला मिळालेली नाहीये. त्यामुळे अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात त्याबद्दल माहिती द्यावी अशी मागणीही जयंतराव पाटील यांनी केली.

धनगर समाज या सरकार सोबत राहण्याचे काही कारणच राहिले नाही. शेवटच्या अधिवेशनातही यांनी धनगर आरक्षणाचा निर्णय घेतला नाही. दर महिना १ लाख ५२ हजार महिलांना आठवड्यातून सहा वेळा चौरस आहार देण्यात येतो आणि ८. ३७ लाख बालकांना आठवड्यातून चार वेळा अंडी, केळी, पोषण आहाराअंतर्गत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जर हे सत्य असेल तर मग २०१७- १८ आणि १८ - १९ मध्ये या राज्यात ३३ हजार ६०१ बालकांचा मृत्यू कसा झाला? तुमची एवढी चांगली योजना जर असेल तर इतके बालमृत्यू कसे आणि का होतायत ? असा संतप्त सवाल जयंतराव पाटील यांनी सरकारला केला.

राज्यात 'पर्यटन पोलीस' ही संकल्पना राबवण्यात येईल.असे जाहीर करण्यात आले. म्हणजे केवळ बातमी व्हावी म्हणून काहीही करायचं का ? आपली आहे ती पोलीस यंत्रणा सक्षम केली पाहिजे. आज पोलिसांचे आरोग्याचे अत्यंत गंभीर प्रश्न आहेत ते सोडवले पाहिजेत. त्यांना त्यांच्या कुटुंबांना चांगलं जीवन जगता येईल याचा विचार केला पाहिजे ते राहिलंय बाजूला हे असे नवीन नवीन उद्योग हे लोक करत राहतात असा टोला सरकारला लगावला. बऱ्याच महापुरुषांची स्मारके तयार करण्याचे प्रस्तावित आहे. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि डॉ. बाबासाहेबांच्या स्मारकाला एकही रुपया का दिलेला नाही हे मात्र कळलं नाही. गडचिरोली भागात बिरसा मुंडाचे एक मोठे स्मारक

असावे अशी मागणी जयंतराव पाटील यांनी केली.

बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाला सुद्धा एक रुपयाही या अर्थसंकल्पात नाहीये. ज्या अर्थसंकल्पात बाळासाहेबांच्या स्मारकाला एक रुपया सुद्धा नाहीये, तो अर्थसंकल्प तुम्हाला मान्य आहे का ? अशी विचारणा शिवसेना सदस्यांना जयंतराव पाटील यांनी केली. आणखी एका गोष्टीच्या बाबतीत सरकारच अभिनंदन केलं पाहिजे कि त्यांनी अटल बिहारी वाजपेयींच स्मारक मुंबईत बनवण्याचा निर्णय घेतला. ही बाब प्रशंसनीय आहे, सोबतच अटल बिहारी वाजपेयी यांचे जीवन आणि विचार यांचीही सविस्तर माहिती आणि अभ्यास या सरकारने केला पाहिजे, असं मला वाटतं. मी काय कोणाचे नाव घेणार नाही पण अटल बिहारी वाजपेयी यांची कारकीर्द आणि त्यांचे उत्तराधिकारी म्हणून जे मिरवतात त्यांची कारकीर्द यांच्यात जमीन अस्मानाचे अंतर आहे असा टोला जयंतराव पाटील यांनी मोदी यांचे नाव न घेता लगावला.

## आता देवसुद्धा या देवेंद्र फडणवीस सरकारला वाचवू शकणार नाही - जयंत पाटील

**मुंबई – जलयुक्त शिवारच्या माध्यमातून १५ हजार गावे दुष्काळमुक्त झाली मग २५ हजार गावे दुष्काळग्रस्त का? ६२ हजार शेततळी बांधली त्याचा दुष्काळग्रस्त भागाला लाभ होणार आहे परंतु ही शेततळी बांधली असती तर राज्यावर दुष्काळाची भयानक वेळ आली नसती... महापरीक्षा पोर्टलबाबत स्पर्धा परीक्षा देणारा विद्यार्थी तक्रार करतोय. यामध्ये मास कॉपी व भ्रष्टाचार झाल्याची असंख्य उदाहरणे व तक्रारी आल्या आहेत. अशा बदनाम पोर्टलचा व वरील विषयांचा राज्यपाल भाषणात गौरवपूर्ण उल्लेख करत असतील तर आता देवसुद्धा या देवेंद्र फडणवीस सरकारला वाचवू शकणार नाही असा इशारा विधीमंडळातील राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते व प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी दिला.**

राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना जयंतराव पाटील यांनी सरकारच्या कारभारावर व राज्यपालांनी मांडलेल्या मुद्द्यावर कडाडून टीका केली शिवाय सरकारमधील जुन्या नव्या मंत्र्यांना व शिवसेनेच्या मंत्र्यांना चिमटे काढले. गेल्या पाच वर्षांत राज्यपालांनी जी भाषणे केली त्यामधील सगळ्या भाषणात 'माझ्या सरकारने याव करायचं ठरवलंय', 'माझ्या सरकारने त्याव करायचं ठरवलंय' हे सोडून महामहीम राज्यपाल काहीही बोललेले नाहीत. केवळ आणि केवळ ह्यांच सरकार काय करणार हेच राज्यपालांनी सांगितलं आहे. तुम्हाला सगळ्यांना इथे का बोलावलंय ह्याचा या भाषणांमध्ये कुठेही उल्लेख नाही आणि असलाच तर तो एका ओळीत आहे असा आरोपही जयंतराव पाटील यांनी केला.

राज्यपालांचे भाषण म्हणजे फक्त सरकारचे इरादापत्रक आहे कि काय असं गेल्या पाच वर्षांतली भाषणे वाचून वाटते.यावेळचं राज्यपालांच भाषण पाचव होतं. अशी अपेक्षा होती कि किमान यावेळी तरी राज्यपाल 'आम्ही काय करणार' यापेक्षा 'आम्ही काय केलं' हे सांगतील. मात्र याहीवेळी राज्यपालांनी माझं सरकार काय करणार आहे याचीच टिमकी वाजवली. या सरकारने अजून काही करायला हे सरकार आता राहणार आहे का, हा मुख्य मुद्दा आहे असा टोलाही जयंतराव पाटील यांनी लगावला. राज्यपालांची गेल्या पाच वर्षांतली सगळी भाषणे पाहिली तर त्यात एकूण सगळे मिळून ६५० मुद्दे आहेत आणि त्यापैकी जवळपास ९० टक्के मुद्दे हे आम्ही हे करणार, ते करणार याबद्दलचे आहेत.

स्वतःचा जीव धोक्यात घालून दुसऱ्यांचा जीव वाचवणाऱ्या शूर बालकांना माझे शासन 'हुतात्मा तुकाराम ओंबाळे बालवीर पुरस्काराने' सन्मानित करेल. आज पाच वर्ष उलटून गेली. गेल्या पाच वर्षांत तुम्ही किती मुलांना हा पुरस्कार दिला. इथे तुम्ही शूर तुकाराम ओंबळेच नाव वापरताय आणि तेही काम तुम्ही केलं नाही. हा केवळ जवानांच्या शौर्याचाच नाही तर या सार्वभौम सभागृहाचाही अपमान आहे असा आरोपही जयंतराव पाटील यांनी केला.

कोळसा उद्योग, वीटभट्टी, सफाई कामगार यांच्यासाठी एक स्वतंत्र धोरण तयार करू. कुठे आहे धोरण ?तीवर संवर्धन प्रतिष्ठान स्थापन करू, कुठेय ते प्रतिष्ठान ? माझे शासन नद्या आणि जलाशयांच्या मधील प्रदूषण कमी करण्यासाठी एक महत्वाकांक्षी योजना सुरु करेल. कुठेय अशी योजना? या सरकारने जिजाऊ माँसाहेबांचा अपमान केला आहे.माझे शासन महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींसाठी आधुनिक सुविधांनी युक्त अशी जिजाऊ वसतिगृहे उभारेल. आज २०१९ आहे. २०१४ ची ही घोषणा आहे. कुठे आहेत अशी वसतीगृहे? दाखवा तरी आम्हाला. माझे शासन 'मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र उभारेल' कुठे आहेत अशी केंद्र ? असा सवालही



जयंतराव पाटील यांनी सरकारला विचारला.

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,मुंबईचे कोल्हापूर, पुणे,नाशिक आणि अमरावतीला बेंच असणार असे सांगितले परंतु आजही अशी बेंच झालेली नाहीत. चार वर्ष झाली या घोषणेला.औरंगाबाद आणि नागपूर येथेही राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन करणार, तेही अजून झालेले नाही. कितीतरी गोष्टी आज अशा आहेत. ज्यांची केवळ घोषणा केली पण काम शून्य आहे असेही जयंतराव पाटील म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील स्मारक २०१९ च्या आत पूर्ण करण्याची सरकारची इच्छा आहे. आज २०१९ चा जून महिना सुरु आहे. अजून तिथे एक वीटही रचलेली नाहीये. कदाचित हे काम करण्याची सरकारचीच इच्छा नसावी. असंच स्पष्ट दिसत आहे असा टोलाही लगावला.

लोकसेवा हक्क कायद्याचा उल्लेख करण्यात आला आहे. या कायद्याअंतर्गत आजपर्यंत किती अधिकाऱ्यांना शिक्षा झाल्यात? राज्याच्या गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त भागात नक्षलवादी प्रतिबंधक मोहीम राबवल्यामुळे नक्षलवादी





कारवायांना प्रभावी आळा बसला आहे पण अगदी परवा १ मे रोजी आमच्या १६ पेक्षा अधिक जवानांना नक्षलवादी हल्ल्यात जीव गमवावा लागला आहे. त्याच्याआधी देखील अनेक छोटे मोठे हल्ले झालेत आणि त्यात आमच्या शूर जवानांना जीव गमवावा लागला असा सवाल जयंतराव पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना केला.

युवकांमध्ये आवश्यक ती कौशल्ये विकसित होण्यासाठी मोठ्या उद्योगसमूहांच्या सोबत ३४ सामंजस्य करार करण्यात आले असून त्यापैकी २८ करार कार्यान्वित करण्यात आले आहेत. यामुळे पुढील तीन वर्षांत ७ लाख इतक्या युवकांना कौशल्य प्राप्त होऊन त्यांना रोजगार मिळेल. आता दोन वर्ष दोन महिने झालेले आहेत, किमान पाच लाख मुलांना तरी आता रोजगार मिळायला हवा होता. त्यामुळे ज्या पाच लाख मुलांना रोजगार मिळाला होता त्यांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवा अशी मागणीही जयंतराव पाटील यांनी केली.

महारेराचा उल्लेख आहे. या महारेराला अनेक ठिकाणी जज नाहीयेत,नीट स्टाफ नाहीये. कुठलंही त्यांच काम नीट होत नाहीये. एकतर सरकारला कोणीतरी चुकीची माहिती देतंय किंवा सरकार राज्यपालांना चुकीची माहिती देतंय. एखादी गोष्ट राज्यपालांच्या तोंडून आली तर ती लोकांना खरी वाटेल कारण आपण काहीही बोललो तरी ते खरं वाटण्याची शक्यता तशीही नाहीये म्हणून बहुधा सरकार राज्यपालांच्या तोंडी कोणतीही वाक्य जबरदस्तीने टाकत असेल असा टोलाही जयंतराव पाटील यांनी लगावला.

महाराष्ट्र कर्नाटक राज्यात असलेल्या सीमाभागाच्या प्रश्नाच्या बाबतीत शासन संवेदनशील आहे असं विधान राज्यपालांनी केलंय. महाराष्ट्र कर्नाटक सीमाभागाच्या वादाची केस आज सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. महाराष्ट्र सरकारने भाषावार प्रांतरचना आणि भौगोलिक सलगता या दोन मुद्द्यांच्या आधारे ही केस कर्नाटक सरकार आणि भारत सरकारला पार्टी करून लावली आहे. अहो निष्क्रियतेला कुठेतरी एक सीमा असते आणि निष्क्रिय राहूनही सक्रीय असल्याची वाक्य थेट राज्यपालांच्या तोंडी घालणे म्हणजे हद्द झाली ! निर्लज्जपणाचा कळस झाला ! अशी जोरदार टिकाही जयंतराव पाटील यांनी

केली.

चंद्रकांत पाटील यांना महाराष्ट्र सरकारने सीमा भाग समन्वयमंत्री म्हणून नियुक्त केलं आहे. मात्र हे चंद्रकांत पाटील आजपर्यंत एकदाही बेळगावात गेलेले नाहीत. हे चंद्रकांत पाटील आजपर्यंत या प्रकरणाशी संबंधित एकाही वकिलाला एकदाही भेटलेले नाहीत. या विषयाशी संबंधित मंत्रीच जर या विषयावर काहीही करत नसेल तर सरकार कोणत्या तोंडाने या प्रश्नावर संवेदनशील असल्याचा दावा करते आहे ? त्याहून महत्वाचं म्हणजे केंद्र सरकारने या प्रश्नावर आपल्या राज्याच्या विरोधात दोनदा प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात दिले आहे. केंद्रसरकार आपल्या विरोधात प्रतिज्ञापत्र देत असताना देवेंद्र फडणवीस आणि चंद्रकांत पाटील झोपले होते काय ? असा संतप्त सवालही जयंतराव पाटील यांनी केला.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रती क्विंटल आम्ही २०० रुपये देणार असे सांगितले निवडणुका झाल्याच्या दुसऱ्या दिवशी हे अनुदान या सरकारने बंद केलंय.कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम या सरकारने केले आहे. हा कांदा उत्पादक शेतकरी येणाऱ्या निवडणुकीत तुम्हाला कसा रडवतो ते बघाच असा इशाराही जयंतराव पाटील यांनी दिला.

शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास वर्गासाठी १६ टक्के आरक्षणाची तरतूद केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. यामध्ये मराठा असा थेट उल्लेख केलेला नाही, तो का केलेला नाही याची कारणं सभागृहाला कळायला हवीत. सरकारने हे आरक्षण मोठा गाजावाजा करत दिलं. मात्र आज या आरक्षणाचा कोणताही उपयोग मराठा समाजाला होत नाहीये. मराठा समाजाच्या कल्याणाचं कोणतंही उद्दिष्ट यातून साध्य झालेलं नाहीये असेही जयंतराव पाटील म्हणाले.

धनगर, परीट, वडार, कुंभार आणि कोळी यासारख्या वंचित समाजाच्या मागण्याही हे सरकार पूर्ण करणार आहे. अहो पण करणार कधी ? आता तुमचं सरकार जायची वेळ आली की असा टोला लगावतानाच या साऱ्या मागण्या सप्टेंबरमध्ये आमचं सरकार आल्यावर आम्हीच पूर्ण करू असे आश्वासनही जयंतराव पाटील यांनी दिले. शिवसेनेला खुश करण्यासाठी या भाषणात प्लास्टिक बंदीच्या निर्णयाचे कौतुक केलंय. अहो जरा रस्त्यावर फिरा म्हणजे तुम्हाला कळेल कि किती प्लास्टिक बंदी झालीये आणि कशी झालीये ते असा टोलाही जयंतराव पाटील यांनी लगावला. माता मृत्यू दर आणि अर्भक मृत्यू दर कमी झाल्याबद्दल राज्यपालांनी आनंद व्यक्त केलाय. २०१७-१८ आणि १८ -१९ मध्ये या राज्यात ३३ हजार ६०१ बालकांचा मृत्यू झालाय. कसला आनंद साजरा करताय ? थोडी जनाची नाहीतर मनाची तरी बाळगावी या सरकारने ! अशी संतप्त प्रतिक्रियाही जयंतराव पाटील यांनी व्यक्त केली.

राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे मुख्यमंत्र्यांचे निवडणुकीतील राजकीय भाषण गेल्या पाच वर्षांत बनले आहे. या सरकारने घटनात्मक पदांशी खेळ चालवला आहे. तो खेळ थांबवावा अशी विनंतीही जयंतराव पाटील यांनी केली.

जयंतराव पाटील यांनी आपल्या भाषणात सध्या विस्तार करण्यात आलेल्या मंत्रीमंडळातील मंत्र्यांबाबत जोरदार टोलेबाजी केली. कधी शिवसेनेला तर कधी भाजपाला चिमटे काढत सभागृहात वातावरण हेल्दी ठेवले.

## अर्थसंकल्प फुटीची सर्वकष व सायबर क्राईमच्या माध्यमातून चौकशी करावी - जयंत पाटील

**मुंबई – राज्याचा अर्थसंकल्प सभागृहात मांडण्याऐवजी तो बाहेर अगोदरच फुटलेला होता त्यामुळे या प्रकरणाची सर्वकष व सायबर क्राईमच्या माध्यमातून चौकशी झाली पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केली.**

अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प विधानसभेत मांडला परंतु त्याची माहिती अगोदरच बाहेर पडली. ही बाब आम्ही निदर्शनास आणून दिल्यावर अध्यक्षांनी व सभापतींनी चौकशी करण्याचे काम केलेले नाही असेही जयंतराव पाटील म्हणाले. विधानसभेत मांडलेला अर्थ संकल्प अगोदरच ट्वीटच्या माध्यमातुन बाहेर समजत होता. त्याची जाहिरात जी करण्यात आली ती बाहेर कुणाला तरी सांगून करण्यात आली होती असा आरोपही जयंतराव पाटील यांनी केला. सभागृहात मांडलेला अर्थ संकल्प फुटण्याचे हे महाराष्ट्रातील पहिले प्रकरण आहे आणि हा अर्थसंकल्प फोडण्याचे काम अर्थमंत्री व मुख्यमंत्री यांनी ट्वीटच्या माध्यमातुन केले आहे. हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारे नाही असेही जयंतराव पाटील म्हणाले. अर्थसंकल्प फुटणे हे साधे प्रकरण नाही. मुख्यमंत्री कितीही समजून सांगत असले तरी ते त्यांनी कधी केले आणि याची माहिती कोणाला दिली या सगळ्याची सर्वकष चौकशी झाली पाहिजे. ट्वीट जे करत होतात तेसुद्धा वेळेच्या आत लोकांपर्यंत पोचत होते. विशेष म्हणजे त्यांचे ट्वीट आमच्याकडे घोषणा होण्याअगोदर पोचत होते. यामध्ये काळंबेरं नक्की आहे का? यामध्ये कुणाचा फायदा करुन देण्याचे काम झाले का? याची विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी चौकशी करावी अशी मागणीही जयंतराव पाटील यांनी केली.

## अर्थमंत्र्यांनी गोपनीयतेच्या शपथेचा भंग केल्याचा आणि सभागृहाचा अपमान केल्याचाही गंभीर हल्लाबोल

**मुंबई – या अर्थसंकल्पात कोणत्याही क्षेत्राच्याबाबतीत गंभीरपणे तरतूद केलेली दिसत नाही. केवळ निवडणुकीच्या तोंडावर आपल्यावर नाखूष अशा क्षेत्रांना खूश करू पाहण्याचा**

**केविलवाणा प्रयत्न केलेला आहे अशी जोरदार टीका राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते जयंत पाटील यांनी केली आहे.**

अर्थमंत्र्यांनी मांडलेला अंतरिम अर्थसंकल्प हा अपुरा आणि अर्धवट आहे. कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत गंभीरपणे तरतूद केलेली दिसत नाही. दैनंदिन कामकाज असणाऱ्या गोष्टींचाही अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख करून प्रसिद्धी मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला आहे. ज्या गोष्टी गेली पाच वर्षे करणे अपेक्षित होत्या त्यांची घोषणा आत्ता करून जनतेची दिशाभूल करण्याचा हा डाव आहे असा आरोपही जयंतराव पाटील यांनी केला. या अर्थसंकल्पात रचनात्मक असे काहीच नाही. महिला, आदिवासी, दलित आणि अल्पसंख्याक यांच्या भल्यासाठी इथे काहीही नाही. केवळ रस्ते आणि पूल बांधणे म्हणजे विकास कसा? आमच्या काळात मांडलेले अंतरिम अर्थसंकल्प आणि आत्ताचा अंतरिम अर्थसंकल्प यांची तुलना केली तर हा अर्थसंकल्प किती बोगस आहे हे लक्षात येईल, असेही जयंतराव पाटील म्हणाले. अर्थसंकल्प हा अत्यंत गोपनीय दस्तऐवज असतो मात्र हा अर्थसंकल्प आधीच फुटलेला होता, कारण अर्थमंत्री सभागृहात अर्थसंकल्प सादर करत असताना अर्थमंत्र्यांच्या आणि मुख्यमंत्र्यांच्या ट्विटर अकाउंटवर अगदी काही क्षणात ग्राफिक्स इमेज पोस्ट होत होत्या, याचा अर्थ हे ग्राफिक्स आधीच तयार करून ठेवले होते असेही जयंतराव पाटील म्हणाले. अर्थसंकल्प आधीच फोडून अर्थमंत्र्यांनी त्यांच्या गोपनीयतेच्या शपथेचा भंग तर केला आहेच पण हा सभागृहाचा देखील अपमान आहे असाही हल्लाबोल जयंतराव पाटील यांनी केला.

## राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प फुटला; अशा बेजबाबदार वर्तणुकीला जबाबदार कोण - जयंत पाटील

**मुंबई – महाराष्ट्राच्या इतिहासात अर्थसंकल्प सादर होण्याआधीच सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रकाशित करण्याचं काम यापूर्वी कधी झालं नव्हतं अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि विधिमंडळ गटनेते जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सरकारवर ताशेरे ओढले.**

राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प फुटला? अशा बेजबाबदार वर्तणुकीला जबाबदार कोण? असा सवालही जयंतराव पाटील यांनी केला.विधिमंडळात अर्थसंकल्प मांडत असताना महाराष्ट्राचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या स्वत:च्या ट्वीटर अकाऊंटवरून अर्थसंकल्पाच्या तरतूदी जाहिरातींसह प्रकाशित होत होत्या. यामुळे विधानसभा आणि विधान परिषद अशा दोन्ही सभागृहांचा अवमान झाला आहे असेही जयंतराव पाटील म्हणाले.

अर्थसंकल्प सभागृहात मांडण्याअगोदरच सोशल मीडियावरून फुटल्याचे अजित पवार पत्रकारांना दाखविताना, शेजारी जयंत पाटील, शशिकांत शिंदे, राजेश टोपे, नसीम खान व इतर आमदार




महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अशा बेजबाबदार वर्तणूकीमुळे राज्याला आर्थिक दुष्परिणामांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे या हलगर्जीपणाबद्दल दोघांनीही आपल्या पदाचा राजीनामा द्यायला हवा, अशी मागणीही जयंतराव पाटील यांनी केली.

# महिला धोरणाची पंचविशी

आदरणीय पवार साहेबांनी २५ वर्षांपूर्वी महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात समान स्थान मिळावे आणि त्यांना सर्व क्षेत्रात कर्तृत्व मार्गक्रमण करता यावे यासाठीचे महत्वाचे पाऊल म्हणजे महाराष्ट्रासाठी जाहिर केलेले  महिला धोरण. गेल्या २५ वर्षात पवार साहेबांच्या या दूरदृष्टीच्या निर्णयाचे केवळ स्वागतच नाही तर सबंध देशभरात त्याचे अनुकरण करण्यात आले आणि आज आपण महिलांच्या सक्षमीकरणाबाबत त्यांनी घेतलेल्या उत्तुंग भरारीबाबत अभिमानाने नोंद घेत असतो. संरक्षण दलात महिलांचा प्रवेश, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के प्रतिनिधीत्वाची संधी इथपासून अनेक विविध कार्यक्रम सक्षमीकरणाच्या माध्यमातून राबविण्यात आले. या सगळ्याचा मूळ पाया हा आदरणीय पवार साहेबांनी घातला. अनेक क्षेत्रात महिला आता धैर्याने परिस्थितीला सामोरे जाऊ लागल्या. वेळप्रसंगी रणरागिणी बनून आपल्या निर्धाराच्या जोरावर समाजातल्या अपप्रवृत्तींवर घाला घालून व्यापक समाज सुधारणेच्या दृष्टीने सुद्धा खूप मोठी कामगिरी हया २५ वर्षात साध्य झाली. आज हया महिला धोरणाला २५ वर्षे पूर्ण झालेली असताना एक डॉक्टर महिलेची धैर्याची गोष्ट मला सांगायची आहे.

सन २००७ मध्ये पनवेलमधील एका उच्चशिक्षित कुटुंबातील डॉक्टर तरुणीचा विवाह पेण तालुक्यातील एक डॉक्टर तरुणासोबत झाला होता. मात्र आपल्या नवऱ्याला वैद्यकीय शिक्षण कुठे झाले ? याबाबत विचारले असता तो नेहमी टाळाटाळ करीत असे. या धैर्यवान डॉक्टर महिलेने सततचा पाठपुरावा केला आणि आपला डॉक्टर नवरा बोगस डीग्रीवर सर्व समाजाची फसवणूक करीत आहे हे तिला समजले. केवळ तिचीच फसवणूक नव्हे तर बोगस डॉक्टर म्हणून समाजाची फसवणूक होत आहे आणि ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. जरी त्याच्याशी लग्नगाठ बांधलेली होती तरी या महिलेने समाजाचा विचार करुन स्वतःच्या नवऱ्याविरुद्ध पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदविली. या गुन्ह्याबाबत डॉक्टर पतीला आता अटक करण्यात आली आहे. लक्षात घ्या एक डॉक्टर झालेली तरुणी ११ वर्षे संसार केलेला पती व त्यानंतर जी काही परिस्थिती येईल त्या परिस्थितीला सामोरे जाण्याची जिद्द दाखवत स्वतःच्या






नवऱ्याला बेडया ठोकू शकते त्यापेक्षा वेगळे महिला सबलीकरण काय असू शकते. ही नारी शक्ती समाजाच्या भल्यासाठी नेहमीच आवश्यक राहील हा विश्वास २५ वर्षांपूर्वी साहेबांनी व्यक्त केला होता. या महिला डॉक्टरच्या सत्य कथेनंतर तो विचार अंमलात आणला जातो आहे याचे खूप समाधान आहे.

## शेवटचे पान

